सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १७ डिसेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ४१ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### आठवड्याच्या पहिल्याच सत्रात घसरण

**मुंबई** : देशातील शेअर बाजारांत सोमवारी घसरण झाली. विशेषतः धातू आणि आयटी शेअर्स घसरणीचा बाजाराला फटका बसला. या आठवड्याच्या अखेरीस होणाऱ्या



अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या पतधोरण बैठकीपूर्वी गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतली आहे. फेड रिझर्व्हकडून यावेळी २५ बेसिस पॉईंटची व्याजदर कपातीची व्यक्त केली जात आहे. या पृष्ठभूमीवर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ३८४ अंकांच्या घसरणीसह ८१,७४८ वर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १०० अंकांनी घसरून २४,६६८ या पातळीवर स्थिरावला. क्षेत्रीय निर्देशांकातील स्थावर मालमत्ता ३ टक्क्यांनी वाढले. मीडिया निर्देशांक १.५ टक्के आणि पीएयू ०.५ टक्के वाढला. आयटी, मेटल, ऑईल आणि गॅस निर्देशांक घसरले. आज भारतीय आयटी कंपन्यांचे शेअर्स एक टक्क्यांपर्यंत खाली आले.

### घाऊक महागाई तीन महिन्यांच्या नीचांकावर

**नवी दिल्ली** : स्वस्त खाद्यपदार्थांमुळे घाऊक किमतीवर आधारित चलनवाढ नोव्हेंबरमध्ये १.८९ टक्क्यांच्या तीन महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आली आणि तज्ज्ञांनी फेब्रुवारीत धोरण आढाव्यात रिझर्व्ह बँकेद्वारे ०.२५ टक्के व्याजदर कपातीचा अंदाज वर्तवला. स्वस्त खाद्यपदार्थांमुळे घाऊक किमतीवर आधारित चलनवाढ नोव्हेंबरमध्ये १.८९ टक्क्यांच्या तीन महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आली आणि तज्ज्ञांनी फेब्रुवारीत धोरण आढाव्यात रिझर्व्ह बँकेद्वारे ०२.५ टक्के व्याजदर कपातीचा अंदाज वर्तवला. आकडेवारीनुसार नोव्हेंबरमध्ये खाद्यपदार्थांची महागाई ८.६३ टक्क्यांवर घसरली, जी ऑक्टोबरमध्ये १३.५४ टक्के होती. भाजीपाल्याच्या महागाईत घसरण झाल्याने ही घसरण २८.५७ टक्क्यांवर होती.

### शक्ती कपूर यांच्या अपहरणाचा कट फसला

**बिजनौर** : अभिनेता मुश्ताक खान यांच्या अपहरणाचे प्रकरण समोर आल्यानंतर आता उत्तरप्रदेश पोलिसांनी धक्कादायक खुलासा केला आहे. ज्या टोळीने मुश्ताक खान यांचे अपहरण केले होते, त्याच टोळीने प्रसिद्ध अभिनेते शक्ती कपूर यांचेही अपहरण करण्याचा कट आखला होता. या टोळीने शक्ती कपूर यांना एका कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ५ लाख रुपयांचा प्रस्ताव दिला होता. या कार्यक्रमाला आल्यानंतर त्यांचे अपहरण करण्याचा टोळीचा प्रयत्न होता. पण, शक्ती कपूर यांनी पाच लाख रुपयांचा प्रस्ताव अमान्य केल्याने हा कट फसला. या टोळीचा दुसऱ्या कोणत्या अभिनेत्याच्या अपहरणात सहभाग होता का, याचाही तपास पोलिसांनी सुरू केला आहे. या टोळीतील सदस्यांनी कथितपणे अभिनेते मुश्ताक खान यांचे दिल्ली विमानतळावरून अपहरण केले होते. त्यानंतर त्यांनी मुश्ताक खान यांना उत्तरप्रदेशातील बिजनौरला नेले होते.

# लाडक्या बहिणींसाठी १४०० कोटी

● बळीराजा वीज सवलत योजनेवर ३,१५० कोटींची तरतूद ● ३५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

| विभागनिहाय तरतुदी | उद्योग, ऊर्जा, कामगार<br>४,११२ कोटी | जलसंपदा<br>२,१६५ कोटी | कृषी आणि पदुम<br>२,१४७ कोटी | आदिवासी विकास<br>८३० कोटी |
|---|---|---|---|---|
| सार्वजनिक बांधकाम<br>७ हजार कोटी | इतर मागास बहुजन कल्याण<br>२,६०० कोटी | महिला आणि बालविकास<br>२,१५५ कोटी | ग्रामविकास<br>२ हजार ७ कोटी | सहकार, पणन, वस्त्रोद्योग<br>१,३७७ कोटी |

◆ **नागपूर, १६ डिसेंबर**

हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ३५ हजार ७८८ कोटी ४० लाख ५७ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. यात विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी कमालीच्या गेमचेंजर ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १,४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहात २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ३५ हजार ७८८ कोटी ४० लाख ५७ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर



करण्यात आल्या. या पुरवणी मागणीत सर्वाधिक ७,४९० कोटी सार्वजनिक बांधकाम विभागासाठी तरतूद करण्यात आली. मुंबईतील मेट्रो प्रकल्पांसाठी राज्य सरकारचे दुय्यम कर्ज आणि समभागासाठी १,२१२ कोटी तर मोदी आवास घरकुल योजनेसाठी १,२५० कोटी रुपयांची तरतूद आहे.

शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी विधानसभेत पुरवणी मागण्या सादर केल्या. विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना महायुती सरकारने जुलै महिन्यातील अधिवेशनात विक्रमी ९४ हजार कोटी रुपयांच्या मागण्या सादर केल्या होत्या. यावेळी सरकारने पुरवणी मागणीतून आपल्या शेवटच्या कार्यकाळात सुरू केलेल्या योजनांना प्राधान्याने निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेसाठी ५१४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

३५,७८८ कोटींच्या पुरवणी मागण्यांपैकी ८,८६२ कोटींच्या मागण्या या अनिवार्य खर्चाच्या, तर २१,६९१ कोटींच्या मागण्या कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या आहेत. सरकारने ५,२३४ कोटींचा निधी हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने उपलब्ध करून दिला आहे. यात केंद्र सरकारच्या विशेष सहाय्य योजनेच्या अंतर्गत ५० वर्षासाठी बिनव्याजी कर्ज योजनेसाठी ३,७१७ कोटी, विविध पाटबंधारे महामंडळाना भाग भांडवल अंशदान म्हणून १,९०८ कोटी रुपये, मोदी आवास घरकुल योजनेसाठी १,२५० कोटी रुपयांची तरतूद पुरवणी मागणीत आहे. मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेसाठी ३,१५० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. (तभा वृत्तसेवा)



फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद जिंकल्यानंतर सिंगापूरहून चेन्नई येथे परतल्यावर भारतीय ग्रॅण्डमास्टर १८ वर्षीय डी. गुकेशचा पत्रकार परिषदेदरम्यान भावपूर्ण सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी विमानतळावर डी. गुकेशचे चाहत्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले

# एका घराण्यासाठी केल्या घटनादुरुस्त्या

## राज्यसभेत निर्मला सीतारामन् यांचा काँग्रेसवर घणाघाती हल्ला

◆ **नवी दिल्ली, १६ डिसेंबर**

लोकशाही मजबूत करण्यासाठी नाही, तर एका घराण्याला राजकीयदृष्ट्या ताकदवान करण्यासाठी काँग्रेसने आतापर्यंत घटनेत अनेक दुरुस्त्या केल्या, असा आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी आज राज्यसभेत केला.

भारतीय संविधानाचा ७५ वर्षांचा गौरवशाली प्रवास या विषयावर राज्यसभेत चर्चेला प्रारंभ करताना आपल्या अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद भाषणातून सीतारामन् यांनी काँग्रेस तसेच नेहरू-गांधी घराण्यावर हल्ला चढवला. ज्या लोकांनी विरोधी पक्षनेत्यांना तुरुंगात डांबून भारतीय संविधानाच्या चिंधड्या उडवल्या, तेच लोक आज संविधानाच्या गोष्टी करीत आहेत.



विरोधी पक्षांचे नेते सोडा पण काँग्रेसने कवींनाही तुरुंगात टाकले. १९४९ मध्ये गिरणी मजुरांसाठी आयोजित सभेत मजरुह सुल्तानपुरी यांनी एक कविता वाचली, जी पंडित नेहरूंच्या विरोधात होती. या मुद्यावर माफी मागण्यास नकार दिल्यामुळे संतप्त काँग्रेसने मजरुह सुल्तानपुरी आणि बलराज साहनी यांना तुरुंगात डांबले होते, अशी आठवण सीतारामन् यांनी करून दिली.

काँग्रेसचा आजपर्यंतचा इतिहास संविधानविरोधीच राहिला. काँग्रेसने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर नेहमीच अंकुश लावण्याचा प्रयत्न केला. मायकेल एडवर्डसद्वारा लिखित नेहरूंवरील चरित्रात काही भाग आक्षेपार्ह असल्यामुळे काँग्रेसने या पुस्तकावर बंदी आणली होती.

दुसऱ्या विश्व युद्धानंतर जगातील ५० देश स्वतंत्र झाले, या सर्व देशांनी आपापल्या देशांसाठी घटना तयार केली. मात्र, नंतर यापैकी अनेक देशांनी आपल्या घटनेत अनेक सुधारणा केल्या. या सुधारणा करताना त्यांना घटनेचा मूळ गाभाच बदलवावा लागला. याउलट, आपल्या संविधानात अनेक सुधारणा झाल्यानंतरही त्याच्या मूळ गाभ्याला कधी धक्का लागला नाही, ते काळाच्या कसोटीवर उतरले आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. (तभा वृत्तसेवा)

### काँग्रेस महिलाविरोधी

काँग्रेस हा महिलाविरोधी पक्ष आहे. १९८६ मध्ये शहाबानो खटल्यात सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतर काँग्रेसने घटनादुरुस्ती करीत हा निकालच बदलवून टाकला, मुस्लिम महिलांवर अन्याय केला. दुसरीकडे, आम्ही नारीशक्ती वंदन विधेयक आणले. राजीव गांधींच्या काळात काँग्रेसचे लोकसभेत ४२६ खासदार होते, तर राज्यसभेत १५९. तरीसुद्धा ते महिला आरक्षण विधेयक आणू शकले नाही, ते आमच्या सरकारने आणले . काँग्रेस हा नेहमीच महिलाविरोधी पक्ष राहिला आहे, असा आरोप सीतारामन् यांनी केला.

## सुकमात १३ नक्षलवाद्यांना अटक

◆ **सुकमा, १६ डिसेंबर**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात १३ नक्षलवाद्यांना अटक करून त्यांच्या ताब्यातून स्फोटके जप्त करण्यात आली, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली.

त्यापैकी सहा जणांना शुक्रवारी चिंतलनारमधील मुरकम गावातून सीआरपीएफ आणि स्थानिक पोलिसांनी ताब्यात घेतले, असे अधिकाऱ्याने सांगितले. सहापैकी माडवी भीमा हा बेकायदेशीर माओवादी चळवळीचा आरपीस पंच समितीचा अध्यक्ष आहे.

मडकम बाजीराव हा माओवाद्यांच्या जागरगुंडा क्षेत्र समिती अंतर्गत स्थानिक संघटना पथकाचा सदस्य आहे. त्यांच्याकडून जिलेटिनच्या २२ कांड्या, २० रिकामे डिटोनेटर्स, २० लाकडी स्पाईक होल, १२ स्पाईक होल, १० डिटोनेटर्स, ४ पेन्सिल शेल, एक टिफिन आणि पाईपबॉम्ब जप्त केला. (वृत्तसंस्था)

# भारत-श्रीलंका वाढवणार संरक्षण, ऊर्जा, व्यापार संबंध

## मोदी-दिसानायके यांच्यात चर्चा

◆ **नवी दिल्ली, १६ डिसेंबर**

भारत आणि श्रीलंकेने भागीदारी बळकट करण्यासाठी भविष्यवादी दृष्टिकोन स्वीकारला आहे. एक संरक्षण सहकार्य करार पूर्ण करण्याचा संकल्प केला असून, वीज ग्रीड जोडणी आणि बहुउत्पादन पेट्रोलियम पाईपलाईन स्थापित करून ऊर्जा संबंध वाढवण्याचा निर्णय घेतला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांच्यात झालेल्या व्यापक चर्चेदरम्यान हे निर्णय घेण्यात आले. भारत-श्रीलंका आर्थिक भागीदारीसाठी गुंतवणुकीत वाढ आणि जोडणीवर भर देण्याचा निर्णय दोन्ही बाजूंनी घेतला. भौतिक, डिजिटल आणि ऊर्जा जोडणी हे सहकार्याचे प्रमुख स्तंभ असतील, असे मोदी म्हणाले.

वीज ग्रीड जोडणी आणि बहुउत्पादन पेट्रोलियम पाईपलाईन स्थापित करण्यासाठी काम केले जाईल. भारत श्रीलंकेच्या वीज प्रकल्पांना नैसर्गिक वायूचा पुरवठा करेल, असे मोदी म्हणाले. दोन्ही देशांतील जोडणी वाढवण्यासाठी रामेश्वरम् आणि तलाईमनारमध्ये फेरी सेवा सुरू केली जाईल, अशी घोषणा नरेंद्र मोदी यांनी केली. आमचे सुरक्षा हितसंबंध परस्परांशी जुळलेले आहेत, हे दोन्ही देशांनी मान्य केले. (वृत्तसंस्था)

# संविधान मजबुतीसाठी तुम्ही काय केले? : खडगे

◆ **नवी दिल्ली, १६ डिसेंबर**

११ वर्षांच्या शासनकाळात संविधान मजबूत करण्यासाठी तुमच्या सरकारने काय केले, ते आधी सांगा, या शब्दांत राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी आज सत्ताधारी पक्षावर हल्ला चढवला.

भारतीय संविधानाचा ७५ वर्षांचा गौरवशाली प्रवास या विषयावर राज्यसभेत आज सुरू झालेल्या चर्चेत सहभागी होताना



खडगे यांनी अनेक मुद्यांवर काँग्रेसचा बचाव करीत सत्ताधारी पक्षावर हल्ला चढवला. पंतप्रधानांपासून संरक्षण मंत्र्यापर्यंत अनेक नेत्यांनी दुसऱ्या सभागृहात घटनापरिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच अन्य नेत्यांनी केलेल्या भाषणाचे संदर्भ दिले. मात्र, तुमच्या नेत्यांनी त्या बैठकीत काय म्हटले, ते कोणीच सांगितले काही. एखादी खोटी गोष्ट शंभरवेळा सांगितली, तर ती लोकांना खरी वाटू लागते, असा उल्लेख करीत खडगे म्हणाले की, संविधानाच्या मजबुतीसाठी तुम्ही ११ वर्षांत काय केले, ते सांगा.

पंडित नेहरूंनी १९५१ मध्ये पहिली घटनादुरुस्ती केली, असा आरोप सत्तापक्षातर्फे करण्यात आला होता. तो खोडून काढताना खडगे म्हणाले की, मद्रास उच्च न्यायालयाने आरक्षणावर एक निकाल दिला होता. त्यामुळे ती घटनादुरुस्ती आणावी लागली. या मुद्यावर सरदार पटेल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहरूंसोबत होते. डॉ. आंबेडकरांनी तर लोकसभेत दोन तास भाषण करीत या घटनादुरुस्तीचे समर्थन केले होते. आज तुम्ही त्यांचा अपमान करीत आहे. (तभा वृत्तसेवा)

## ऑडीने ३१, पोर्शने १७६ इलेक्ट्रिक वाहने परत मागवली

**नवी दिल्ली** : लक्झरी कार उत्पादक ऑडी आणि पोर्शने तांत्रिक बिघाडांमुळे त्यांची इलेक्ट्रिक वाहने परत मागवली आहेत. कंपन्यांनी सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्सला सांगितले की, परत मागवलेल्या वाहनांच्या बॅटरी मॉड्यूल सप्लायर सिस्टममध्ये दोष आला आहे. यात ९ जानेवारी २०२० ते १६ फेब्रुवारी २०२४ दरम्यान उत्पादित ऑडीच्या ऑडी ई-ट्रॉन जीटी आणि आरएस ई-ट्रॉन जीटी मॉडिल्सचा समावेश आहे. २१ ऑक्टोबर २०१९ ते ४ मार्च २०२४ दरम्यान उत्पादित पोर्शच्या १७६ मॉडिल्सचा समावेश आहे.

# 'जहां नहीं चैना, वहां नहीं...'

## छगन भुजबळांची संतप्त प्रतिक्रिया

## अजितदादांची साथ सोडणार?

◆ **नागपूर, १६ डिसेंबर**

मंत्रिमंडळ विस्तारात वगळण्यात आल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ संतप्त झाले आहेत. ते आज विधानसभा सभागृहात आले असता विरोधी बाकावर बसलेले दिसले. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. परंतु, सत्ताधारी सदस्यांची संख्या अधिक झाल्याने जागा नव्हती. त्यामुळे सत्ताधारी सदस्य विरोधकांच्या बाजूला बसल्याचे सांगण्यात आले.

देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाचा रविवारी विस्तार झाला. यात छगन भुजबळ, तानाजी सावंत, सुधीर मुनगंटीवार आणि अब्दुल सत्तार यांच्यासारख्या ज्येष्ठ आणि अनुभवी नेत्यांना मंत्रिमंडळातून वगळण्यात आले. त्यामुळे काही नेते नाराज झाले आहेत. छगन भुजबळही मंत्रिपद न मिळाल्याने नाराज झाले आहेत. कालपासूनच भुजबळ यांनी नाराजी बोलून दाखवण्यास सुरुवात केली. भुजबळ समर्थकांनी तर नाशिकमध्ये हिंसक आंदोलनही केले. भुजबळांचा वापर केवळ ओबीसी मते मिळवण्यापुरता झाल्याचा आरोप अनेक ओबीसी नेत्यांनी केला. छगन भुजबळ यांनी आजही या सर्व प्रकरणावर उघड नाराजी व्यक्त केली.

मंत्रिपदापासून वंचित ठेवल्याने छगन भुजबळ प्रचंड नाराज आहेत. आज प्रसार माध्यमांशी बोलताना त्यांनी मनातील खदखद बोलून दाखविली. तुम्हाला मंत्रिपद मिळाले नाही, तुम्ही अधिवेशनात थांबणार नाही का, तुमची पुढील भूमिका काय राहील, आदी प्रश्न भुजबळ यांना विचारण्यात आले. त्यावर त्यांनी स्वतःच्या



स्टाईलने एकाच वाक्यात उत्तर दिले. आता बघू, 'जहां नहीं चैना वहां नहीं...' असे सूचक विधान केले.

भुजबळ यांच्या या विधानाचे अनेक अर्थ लावले जात आहेत. भुजबळ हे अजितदादांची साथ सोडणार असल्याचे संकेत यातून मिळत आहेत तसेच पुन्हा शरद पवार यांच्या गटात जाणार असल्याच्याही चर्चा आता सुरू झाल्या आहेत. त्यामुळे भुजबळ आगामी दिवसांत काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. (तभा वृत्तसेवा)

# एसटीला ९४१ कोटी रुपयांचे विक्रमी उत्पन्न

**दररोज सरासरी ६० लाख प्रवाशांची वाहतूक**

◆ **मुंबई, १६ डिसेंबर**

दिवाळी सणाच्या निमित्ताने प्रवाशांचा चढ-उतार वाढल्यामुळे तब्बल ९४१ कोटी रुपये इतके यंदाच्या वर्षातील सर्वाधिक उत्पन्न नोव्हेंबर महिन्यात एसटी महामंडळाला मिळाले आहे. या महिन्यात एसटीने दररोज ६० लाख प्रवाशांची वाहतूक करून ३१.३६ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले.

मागील वर्षाच्या याच काळातील उत्पन्नापेक्षा हे उत्पन्न सुमारे २६ कोटी रुपयांनी जास्त आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षी दिवाळीच्या काळात १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्यात आली होती. यंदा ही भाडेवाढ नसतानाही वाढलेले विक्रमी उत्पन्न हे एसटीवर सर्वसामान्य प्रवाशांनी दाखवलेले विश्वासाचे द्योतक आहे, असे प्रतिपादन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी केले.

एसटीचे प्रवासी उत्पन्न वाढलेले असले तरी, त्या प्रमाणात एसटीचा खर्चदेखील वाढलेला आहे. इंधनाचे वाढते दर, कर्मचाऱ्यांची वेतनवाढ, टायर व सुट्या भागांच्या दरात झालेली वाढ याचा प्रतिकूल परिणाम होऊन एसटीचा खर्च वाढला आहे. त्यामुळे संचित तोटा ११ हजार कोटी रुपयांर्यंत पोहोचला आहे. नोव्हेंबर महिन्यात नियमित खर्चासोबतच कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट दिल्यामुळे सुमारे ५२ कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा एसटीच्या तिजोरीवर पडला आहे. (तभा वृत्तसेवा)



### दरवाढीचा प्रस्ताव

यावरोबरच कर्मचाऱ्यांच्या वाढीव वेतनाची हजारो कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित आहे. या सर्वांचा विचार करून नाईलाजास्तव उत्पन्न आणि खर्चातील ताळमेळ राखण्यासाठी एसटीने तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला असून, तसा प्रस्ताव शासनाला पाठविला आहे.

# दोन बसवर अज्ञाताकडून दगडफेक; काच फुटल्याने बसचे नुकसान

## सम्राट चौक आणि हायवेवरील डीमार्ट जवळील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

परभणी येथील घटनेचे पडसाद राज्यात उमटण्यास सुरुवात झाली आहे. संविधान विटंबना केल्याप्रकरणी परभणी येथे घडलेल्या घटनेवरून सोलापूर शहरात आज मोर्चा काढण्यात आला. तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने बंद पाळण्याचे आवाहन करण्यात आले होते. दिवसभर शहरात या अनुषंगाने कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मात्र काही अज्ञात समाजकंटकांनी एसटी बसेसला लक्ष केले. सोलापूर आगार, शिवाजीनगर पुणे आगार, आणि तुळजापूर आगाराच्या तीन एसटी बसेसच्या काचा फोडल्यामुळे, एसटी महामंडळाचे सुमारे ४० हजाराचे नुकसान झाले आहे. सुदैवाने या दगडफेकीमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.





तुळजापूरहून सोलापूरच्या दिशेने येणाऱ्या बसवर कारंबा नाका डीमार्ट जवळ व साताऱ्याकडे जाणाऱ्या बसवर सम्राट चौक येथे अज्ञातांनी दगड फेक केली. यामध्ये दोन बसच्या काच फुटल्याने अर्थिक नुकसान झाले आहे. रात्री उशिरापर्यंत अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

तुळजापूर आगाराची बस(एमएच ११ बीएल ९३६१)ही तुळजापूरहून सोलापूरच्या दिशेने येत होती.कारंबा नाका,डीमार्ट जवळ बस आल्यानंतर बसच्या डाव्या बाजूला प्रवाशी दरवाज्यावरील दुपारी साडे तीनच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने बसवर दगड मारला. बसमधील दोन प्रवाशी किरकोळ जखमी झालेत. सदर प्रवाशांना उपचारासाठी घेवून जातो असे वाहकांनी विचारणा केल्यानंतर ते स्वतः उपचार घेतो म्हणून निघून गेलेत. काच फुटल्याने बसचे दोन हजाराचे नुकसान झाले आहे.

दुसरी बस (एमएच १४ बीटी ४९५२) ही सोलापूर आगाराची बस, सोलापूर ते सातार या मार्गावर धावण्यासाठी निघाली होती. त्यावेळी सायंकाळी पाच च्या सुमारास बस च्या समोरील कोचवर अज्ञातांनी दगड मारल्याने काच फुटून १५ हजाराचे नकुसान झाले आहे. या बसमध्ये कोणालाही जखम झालेली नाही. याबाबत रात्री उशिरा फौजदार चावडी पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत

### पोलीस बंदोबस्तात बसेस सोडल्या

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ पोलिसांना पाचारण केले. पोलीस घटनास्थळी दाखल झाल्यानंतर पंचनामा करून सदरच्या बसेस पोलीस बंदोबस्तात मार्गस्थ झालेल्या आहेत. त्यानंतर सोलापूर बस स्टॅन्ड वर आणि एसटी सोबत पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. पोलीस याबाबत अधिक माहिती घेत आहेत.


**- उत्तम जुंदळे, आगार व्यवस्थापक सोलापूर आगार.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा शुभंकर 'माउली'

**नवी दिल्ली :** आगामी २८ जानेवारी ते २५ फेब्रुवारी या कालावधीत उत्तराखंडमध्ये ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून रविवारी केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते लोगो आणि शुभंकराचे अनावरण करण्यात आले. उत्तराखंडचा राज्य पक्षी मोनलपासून प्रेरणा घेऊन या शुभंकराला 'माउली' असे नाव देण्यात आले आहे. या स्पर्धेत 'संकल्प से शिखर तक' असे घोषवाक्य असेल. खेळ हे क्रीडापटूंचे प्रतीक आहेत. हे खेळ खिलाडूवृत्ती, एकता आणि उत्कृष्टतेच्या भावनेचे प्रतीक आहेत. लोगो आणि शुभंकर राज्याची समृद्ध संस्कृती आणि नैसर्गिक सौंदर्य प्रतिबिंबित करतात, असे खडसे यावेळी म्हणाल्या. विशेष म्हणजे योग आणि मल्लखांब हे दोन देशी खेळ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत समाविष्ट करण्यात आले. भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) अध्यक्ष पी. टी. उषा यांनी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांच्या प्रस्तावाला मंजुरी दिलेली आहे. मुख्यमंत्र्यांनी राज्यातील क्रीडा पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी ५०० कोटी गुंतवणुकीची घोषणा केली. या निधीतून जलतरण तलाव, स्टेडियम, शूटिंग रेंज आणि सायकलिंग ट्रॅक अद्ययावत करण्याचा हेतू आहे.



### राष्ट्रीय वरिष्ठ गट बॅडमिंटन स्पर्धा १८ डिसेंबरपासून

**बंगळुरू :** येथील कर्नाटक बॅडमिंटन संघटनेच्या कोर्टवर १८ ते २४ डिसेंबर दरम्यान ७७ वी आंतर-झोनल आणि ८६ वी वरिष्ठ गट राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धा खेळवली जाणार आहे. या स्पर्धेसाठी ५० लाख रुपयांचे बक्षीस आहे, ज्यामध्ये सांघिक विजेतेपदासाठी १० लाख रुपयांचा समावेश आहे. २० डिसेंबरपासून पुरुष एकेरी विजेता चिराग सेन व महिला एकेरी विजेती अनमोल खरब हे विजेतेपदाचे प्रबळ दावेदार असून ते आपापले मुकुट कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे. २० डिसेंबरपासून वैयक्तिक स्पर्धेसह आंतर-झोनल सांघिक स्पर्धांसह स्पर्धेची सुरुवात होईल. चेतन आनंदने २००६-०७ आणि सायना नेहवाल (२००६-०७ आणि २०१७-१८) मध्ये पराक्रम गाजवल्यापासून कोणताही पुरुष एकेरी खेळाडू विजेतेपद राखू शकला नाही, यावरून वरिष्ठ नागरिक किती स्पर्धात्मक आहेत याचा अंदाज लावला जाऊ शकता. संबंधित कालावधीत सायना ही सलग विजेतेपद जिंकणारी एकमेव महिला एकेरी खेळाडू आहे.

### एएफआय पुरुषांचा रिले संघ विसर्जित करणार

**नवी दिल्ली :** भारतीय अ‍ॅथ्लेटिक्स महासंघ (एएफआय) जमैकाचे प्रशिक्षक जेसन डॉसन यांच्याशी झालेल्या मतभेदामुळे भारताचा प्रतिष्ठित ४ बाय ४०० मीटर रिले संघ विसर्जित करण्याच्या तयारीत आहे. मुहम्मद अनस, मोहम्मद अजमल, अमोज जेकब व राजेश रमेश यांचा समावेश असलेल्या भारतीय संघाने २०२३ मध्ये हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर भारतीय चौकडीने अंतिम फेरीत पाचवे स्थान मिळवून २०२३ मधील जागतिक अ‍ॅथ्लेटिक्स स्पर्धेत आपली सर्वोत्तम कामगिरी केली. भारताने अंतिम फेरीत २:५९:९२ सेकंद अशी वेळ नोंदवली, मात्र पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अंतिम फेरीसाठी पात्र ठरण्यात त्यांना अपयश आले.भारतीय चौकडीने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ३:००.५८ सेकंदांपर्यंत सर्वोत्तम कामगिरी केली आणि यजमान फ्रान्स, बेल्जियम व इटली संघानंतर चौथे स्थान मिळविले, परिणामी त्यांचे अंतिम फेरीतील स्थान हुकले. त्यांचे नवीन प्रशिक्षक डॉसन यांच्या नेतृत्वाखाली, खेळाडूंनी ओव्हरट्रेनिंगची तक्रार केली आहे. या पृष्ठभूमीवर एएफआयचे अध्यक्ष आदिल सुमारीवाला म्हणाले की, महासंघाने पॅरिस ऑलिम्पिकमधून धडा घेतला आहे आणि पुढील वर्षीच्या सुरुवातीला नवीन रिले संघ तयार केला जाईल. नवीन संघ त्रिवेंद्रम येथील ४०० मीटर शिबिरात सहभागी होईल.

### किर्गिओस, जोकोविच ब्रिस्बेनमध्ये एकत्र खेळणार

**ब्रिस्बेन :** निक किर्गिओस आणि नोवाक जोकोविच पुढील वर्षी ब्रिस्बेन आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीत एकत्र खेळू शकतात. दोन वर्षांहून अधिक कालावधीत केवळ एक एटीपी टूर सामना खेळल्यानंतर स्पर्धात्मक टेनिसमध्ये पुनरागमन करणाऱ्या किर्गिओसने समाजमाध्यमावर लिहिले की, मी ब्रिस्बेन स्पर्धेत पुरुष दुहेरीत जोकोविचसोबत खेळणार आहे. ब्रिस्बेन इंटरनॅशनल टेनिस स्पर्धा २९ डिसेंबर २०२४ ते ५ जानेवारी २०२५ या कालावधीत होणार आहे. २९ वर्षीय किर्गिओस २०२२ च्या अमेरिकन ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीपासून करिअरसाठी धोकादायक असलेल्या मनगटाच्या आणि गुडघ्याच्या दुखापतींमुळे टेनिसपासून दूर राहिला होता. एटीपी टूरवर सात विजेतेपद पटकावणाऱ्या किर्गिओसने गुडघ्याच्या दुखापतीमुळे २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपनमधून उशीरा माघार घेतली होती.

# ऑस्ट्रेलियन गोलंदाजांकडून भारताला धक्का

**ऑस्ट्रेलिया पहिला डाव ४४५**

**भारत पहिला डाव ४ बाद ५१**

### पावसामुळे ८ वेळा खेळ थांबला

◆ **ब्रिस्बेन, १६ डिसेंबर**

कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील पावसामुळे सर्वात स्टॉप-स्टार्टी दिवस नोंद होत असताना भारत व ऑस्ट्रेलिया दरम्यानच्या तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या तिसऱ्या दिवशी तब्बल ८ वेळा खेळ थांबवावा लागला व त्यामुळे केवळ ३३.१ षटकांचा खेळ शक्य झाला.

गॅबा मैदानावर ७ बाद ४०५ धवांवरून खेळास सुरुवात केल्यानंतर ऑस्ट्रेलियाने ४० धावांची भर घालत पहिल्या डावात एकूण ११७.१ षटकांत सर्वबाद ४४५ धावा उभारल्या. भारतीय संघ प्रत्युत्तर देत असताना सामन्यादरम्यान अनेकदा पावसाने अल्पकाळासाठी आपली हजेरी लावली. याचदरम्यान ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांनी भारताची आघाडीची फळी उद्ध्वस्त केली. मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड आणि पॅट कमिन्सने अव्वल फळीतील फलंदाजांना झटपट हेरून तंबूत परत पाठवले. वाईट प्रकाश व हवामानामुळे खेळ थांबला तेव्हा भारताची १७ षटकांत ४ बाद ५१ धावा अशी स्थिती झाली होती. ऑस्ट्रेलियाने गॅबा येथे दोन दिवस शिल्लक असताना मालिकेत २-१ अशी आघाडी घेण्याच्या आपल्या आशा जिवंत ठेवल्या.



गॅबा मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळताना के. एल. राहुल

भारत अजून ३९४ धावांनी पिछाडीवर पडला असून भारताला फॉलो-ऑनची नामुष्की टाळण्यासाठी कसोटी सामना पुन्हा सुरू झाल्यावर आणखी २४६ धावांची गरज आहे व हेच त्यांचे पहिले लक्ष्य असेल.

सामन्याच्या चौथ्या व पाचव्या दिवशीही पाऊस अपेक्षित आहे, त्यामुळे ऑस्ट्रेलियाला पुन्हा फलंदाजी करण्यास भाग पाडले गेले तर सामना करण्याची वेळ येऊ शकते.

ऑस्ट्रेलियाला पहिल्या डावात ४४५ धावांत गुंडाळताना जसप्रीत बुमराहने ७६ धावांत ६ बळी टिपण्याची सर्वोत्तम कामगिरी केली.

दुसऱ्या दिवशी स्टीव्ह स्मिथ व ट्रॅव्हिस हेडने झळकावलेल्या शतकांनंतर तिसऱ्या दिवशी अ‍ॅलेक्स कॅरीने ८८ चेंडूत ७० धावांची जबरदस्त खेळी केली.

ऑस्ट्रेलियाच्या ४४५ धावांना प्रत्युत्तर देताना भारताच्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली. ऑस्ट्रेलियाच्या मिचेल स्टार्कने यशस्वी जयस्वाल (४) व शुभमन गिलला (१) मिचेल मार्शकडून झेलबाद केले, तर हेझलवूडने विराट कोहलीला (३) व पॅट कमिन्सने ऋषभ पंतला (९) तंबूचा रस्ता दाखवला. भारताने १३.५ षटकांत ४४ धावांत चार महत्त्वपूर्ण मोहरे लवकरच गमावले. सलामी जोडीदार केएल राहुल (नाबाद ३३) वगळता भारताच्या एकाही आघाडीच्या फलंदाजाने लढण्याचे धाडस दाखवले नाही. वाईट प्रकाशामुळे निर्धारित वेळेच्या एका तासाआधी खेळ थांबवण्यात आला, तोपर्यंत भारताने १७ षटकांत ४ बाद ५१ धावांपर्यंत मजल मारली होती. त्यावेळी केएल राहुल नाबाद ३३ धावांवर, तर कर्णधार रोहित शर्मा शून्यावर खेळत होते. *(वृत्तसंस्था)*

# जगज्जेता डी. गुकेशचे चेन्नईत उत्स्फूर्त स्वागत

◆ **चेन्नई, १६ डिसेंबर**

नवीन विश्व बुद्धिबळ विजेता डी. गुकेश सोमवारी सिंगापूरहून चेन्नईच्या कामराज विमानतळावर पोहोचला, तेव्हा तामिळनाडू सरकार, राष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाचे पदाधिकारी व त्याच्या शेकडो चाहत्यांनी त्याचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. गुकेशवर गुलाब पुष्पाची उधळण करण्यात आली.

१८ वर्षीय गुकेशने गत आठवड्यात सिंगापूरमध्ये चीनच्या डिंग लिरेनचा ७.५-६.५ असा पराभव करून फिडे विश्व बुद्धिबळ विजेतेपद पटकावले व याबरोबरच त्याने रशियाच्या गॅरी कास्पारोव्हचा दीर्घकाळ टिकून राहिलेला विक्रम मोडून काढत आतापर्यंतचा सर्वात तरुण विश्वविजेता झाला. पाचवेळचा विश्वविजेता विश्वनाथन् आनंद नंतरचा तो विश्वविजेता होणारा दुसरा भारतीय ठरला. आनंदने येथील आपल्या अकादमीमध्ये किशोरवयीन गुकेशला घडवण्यात मोलाची भूमिका बजावली.

**गुकेशने मानले सर्वांचे आभार**

भारतात विश्वचषक परत आणणे खूप अर्थपूर्ण आहे. हे खरोखरच आश्चर्यकारक आहे. तुमच्या पाठिंब्यामुळे मला खूप ऊर्जा मिळाली. जगज्जेतेपद जिंकणे ही एक चांगली भावना आहे. या स्वागतासाठी धन्यवाद, असे गुकेश म्हणाला.

तमिळनाडूच्या क्रीडा विकास प्राधिकरणाने व त्याच्या शाळेच्या वेलामल विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी विमानतळावरील विश्रामगृहात त्याच्याभोवती शाल पांघरून देऊन त्याचे स्वागत केले. गुकेशने मोगप्पैर येथील वेलाम्मल शाळेतून बुद्धिबळाचा प्रवास सुरू केला. या स्पर्धेदरम्यान गुकेशसोबत त्याचे वडील सर्जन डॉ. रजनीकांत होते, तर त्याची आई- सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ पद्मावती अंतिम फेरीनंतर सिंगापूरमध्ये त्यांच्यासोबत सहभागी झाली.

चाहत्यांना अभिवादन केल्यानंतर गुकेश फुलांनी सजवलेल्या कारमधून मिरवणुकीद्वारे आपल्या निवासस्थानाकडे रवाना झाला.



कामराज विमानतळावर डी. गुकेशचे स्वागत करताना चाहते

**तामिळनाडू सरकारकडून गुकेशला ५ कोटी रुपयांचे बक्षीस**

मंगळवारी विश्वविजेत्या डी. गुकेशचे वल्लाहजाह रोड येथील कलाईवनार अरंगम येथे आयोजित विशेष समारंभात भव्य स्वागत करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन उपस्थित राहण्याची अपेक्षा असून त्यांच्या हस्ते तामिळनाडू सरकारकडून त्याला पाच कोटी रुपयांच्या धनादेश प्रदान करण्यात येणारा आहे. *(वृत्तसंस्था)*

# भारतीय महिलांचा क्षेत्ररक्षण सुधारण्यावर भर

### भारत-वेस्ट इंडीज महिला दुसरा टी-२० सामना आज

◆ **नवी मुंबई, १६ डिसेंबर**

तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात ४९ धावांनी विजय मिळविल्यानंतर आता भारतीय महिला संघ मंगळवारी येथे वेस्ट इंडीजविरुद्ध दुसरा सामना खेळणार आहे. या सामन्यात विंडीजविरुद्ध लढत असताना आपल्या क्षेत्ररक्षणातील त्रुटी कायमच्या दूर करण्याचा प्रयत्न करणार आहे.

डी. वाय. पाटील स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-२० सामन्यात भारताने फटकावलेल्या ४ बाद १९५ धावांच्या प्रत्युत्तरात वेस्ट इंडीजला ७ बाद १४९ धावांपर्यंतच मजल मारता आली. या विजयाबरोबरच भारताने टी-२० मध्ये वेस्ट इंडीज संघाविरुद्ध आपली विजयी मालिका नऊ पर्यंत वाढवली. भारताची जेमिमाह रॉड्रिग्स (७३) व सलामीवीर स्मृती मंधानाने (५४) दमदार फलंदाजी केली, तर वेस्ट इंडीजला ७ बाद १४६ धावांवर रोखताना तितस साधूने ३ बळी व दीप्ती शर्मा व राधा यादवने प्रत्येकी २ बळी टिपलेत. वेस्ट इंडीजच्या डावादरम्यान जेमिमाह व स्मृती मंधानासह सायमा ठाकोरने प्रत्येकी एक झेल सोडला. त्यामुळे भारतीय संघाच्या क्षेत्ररक्षण क्षमतेवर प्रश्नचिन्ह उभा झाला आहे.

२८ चेंडूत ५२ धावा करणाऱ्या डियाण्ड्रा डॉटिनला जेमिमाह व मंधानाने प्रत्येकी एकवेळा जीवदान दिले. हरमनप्रीत कौरची जागा घेणाऱ्या मिन्नू मनूनेही झेल सोडल्या.

भारताच्या विजयानंतर थोड्याच वेळात प्रशिक्षक स्टाफने प्रिया मिश्रा, रघवी बिश्त व नंदिनी कश्यप या युवा खेळाडूंसोबत झेल पकडण्याचा सराव करायला सुरुवात केली.

आता १-० ने आधीच आघाडी मिळविणारा भारतीय संघ दुसऱ्या सामन्यातील विजयासह तीन सामन्यांच्या मालिकेत वर्चस्व गाजवण्यास उत्सुक आहे. *(वृत्तसंस्था)*

# इंग्लंडला विजयासाठी ६४० धावांची गरज

◆ **हॅमिल्टन, १६ डिसेंबर**

येथे सुरू असलेल्या तिसऱ्या व अंतिम कसोटी क्रिकेट सामन्यात तिसऱ्या दिवशी न्यूझीलंडने इंग्लंडसमोर विजयासाठी ६५८ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले आहे. दिवसअखेर इंग्लंडने ६ षटकांत २ गडी गमावत १८ धावा केल्या आहेत. अजून दोन दिवस शिल्लक असून इंग्लंडला आणखी ६४० धावा काढण्याची गरज आहे.

सध्या तीन सामन्यांची ही कसोटी मालिका इंग्लंडने आधीच २-० ने जिंकली आहे.

न्यूझीलंडने ३ बाद १३६ धावांवरून तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. कालचा नाबादवीर केन विल्यम्सनने आपल्या नाबाद अर्धशतकी खेळीला दीडशतकी खेळीत परिवर्तित केले, मात्र रचिन रवींद्र आपल्या अर्धशतकाच्या वाटेवर असतानाच त्याला पॉट्सने कारसेकडून झेलबाद केले. रचिनने ९० चेंडूत ४ चौकार व एका षट्कारसह ४४ धावांची खेळी केली. केन विल्यम्सनने २०४ चेंडूत १५६ धावांचे योगदान दिले, यात त्याने तब्बल २० चौकार व एक षट्कार खेचला. डॅरील मिचेलने ६० धावांची, मिचेल सॅण्टनरने ४९ धावांची, तर टॉम ब्लण्डेलने नाबाद ४४ धावांची भर घातली. न्यूझीलंडचा दुसरा डाव १०१.४ षटकांत ४५३ धावांवर आटोपला.



न्यूझीलंडच्या केन विल्यम्सनची झंझावाती खेळी

इंग्लंडकडून जेकब बेथेलने ३ बळी, बेन स्टोक्स व शोएब बशीरने प्रत्येकी २ बळी, तर जो रूट, मॅथ्यू पॉट्स व गस अ‍ॅटकिन्सनने प्रत्येकी एक बळी टिपला. पहिल्या डावात २०४ धावांची आघाडी मिळविणाऱ्या न्यूझीलंडने इंग्लंडला विजयासाठी ६५८ धावा काढण्याचे आव्हान दिले.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना इंग्लंडने दिवस अखेर दुसऱ्या डावांत ६ षटकांत २ बाद १८ धावांची नोंद केली आहे. खेळ थांबला तेव्हा जेकब बेथेल ९ धावांवर, तर जो रूट शून्यावर खेळत होते. झॅक क्रॉवली (५) व बेन डकेट (४) ही सलामी जोडी लवकरच तंबूत परतली. *(वृत्तसंस्था)*

# वालचंदच्या वरुण दोरनाल व ईश्वर गड्डम यांचा चौकार

### महाविद्यालयीन जलतरण स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा वरूण दोरनाल व ईश्वर गड्डम यांनी प्रत्येकी चार सुवर्ण पदके पटकावली.

सोनी महाविद्यालयाच्या वतीने ही स्पर्धा पार्क मैदान येथील सावरकर जलतरण तलावावर आयोजित केली होती.



वरुण दोरनाल



ईश्वर गड्डम



शुभम अंगडी

**कामगिरी :** वरुण दोरनाल (चार सुवर्ण, एक रौप्य व तीन कांस्य), ईश्वर गड्डम (चार सुवर्ण), श्रीकांत कोंढारे (तीन सुवर्ण व दोन रौप्य रौप्य (तिघे वालचंद अभियांत्रिकी), महादेव गड्डमने (दोन सुवर्ण, ३ रौप्य, दयानंद महाविद्यालय), शुभम अंगडी (एक सुवर्ण, तीन रौप्य व तीन कांस्य, शिवदारे कॉलेज ऑफ फार्मसी), गुरुराज कुरापाटी (१ सुवर्ण व एक रौप्य, हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालय), मन्नान नदाफ (एक सुवर्ण , एक रौप्य व कांस्य, सोनी महाविद्यालय), ऋषिकेश शिंदे ( तीन कांस्य), समर्थ भोसले (एक कांस्य, दोघे सांगोला महाविद्यालय).

# लोकमंगल प्रशालेत क्रीडा सप्ताह उत्साहात



**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

अवंतीनगर येथील लोकमंगल माध्यमिक प्रशालेत क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. याचे उद्घाटन ज्ञान प्रबोधिनीचे सहकार्यवाह अमोल गांगजी यांच्या हस्ते रोप मल्लखांबच्या क्रीडांगणाचे पूजन व क्रीडा ज्योत प्रज्वलित करून करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी ध्वज संचलन केले. मुख्याध्यापिका शुभांगी साठे यांच्या हस्ते अमोल गांगजी, पी एस इंग्लिश मीडियम स्कूल क्रीडाशिक्षक रोहन घाडगे, सहिने प्रशालेचे क्रीडा शिक्षक वीरेश अंगडी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी योगासनाची प्रात्यक्षिक दाखवली. यावेळी कबड्डी, खो-खो, क्रिकेट, धावणे, लगोरी असे विविध खेळ घेण्यात आले. रतिकांत म्हमाणे यांनी प्रास्ताविक केले. राहुल कांबळे यांनी आभार मानले.

# स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयास दुहेरी मुकुट





### ह. दे. प्रशाला सुवर्ण महोत्सवी वर्ष क्रीडा महोत्सव : जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

शिक्षण प्रसारक मंडळी पुणे संचलित हरीभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त झालेल्या क्रीडा महोत्सवातील जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयीन गटात जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाने मुले व मुलींच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

स्वामी विवेकानंद प्रशालेने शालेय ८वी ते १० या मुले व मुलींच्या गटातही विजेतेपद पटकावित चार प्रकारात विजेतेपदाचा मान मिळविला आहे. ह. दे. प्रशालेने ही स्पर्धा सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित केली होती. ह. दे.च्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेतील अंतिम सामन्यात मुलांच्या गटात स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाने संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचा पराभव केला. मुलींच्या गटात त्यांनी ह. दे. कनिष्ठ महाविद्यालयास हरविले.

या स्पर्धेसाठी सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे पंच मंडळ सचिव गोकूळ कांबळे, तांत्रिक समिती सचिव उमाकांत गायकवाड, सदस्य अजित शिंदे, मोहन रजपूत, संतोष कदम, पंच आनंद जगताप श्रीकृष्ण कोळी यांचे सहकार्य लाभले.

# आपली फलटण मॅरेथॉन स्पर्धा ५ जानेवारीला

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

जागतिक अस्थिरोग दिनानिमित्त दर वर्षी आपली फलटण मॅरेथॉन होत असते. यंदाचे ७ वे वर्ष आहे. ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ६ वाजता सजाई गार्डन येथून सुरू होणारी ही स्पर्धा पुरुष व महिला सह तीन गटात होणार आहे. यासाठी प्रथम तीन क्रमांकाना १०, ७ व ५ हजार अशी पारितोषिके देण्यात येणार आहे. इच्छुक खेळाडूंनी www.joshihospitalpvtltd.com या वेबसाईट २० डिसेंबरपर्यंत नोंदणी शुल्क रुपये ७०० भरून करावी, असे आपली फलटण मॅरेथॉन संघ, फलटण रोबोटिक्स सेंटर व जोशी हॉस्पिटल फलटण यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### ठाण्यात १.८५ कोटी रुपयांची बनावट औषधे जप्त


**ठाणे** : अन्न व औषध प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांनी ठाणे जिल्ह्यातील दोन ठिकाणी छापे टाकल्यानंतर १.८५ कोटी रुपयांची बनावट औषधे जप्त केली, असे अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले. भिवंडीतील एका गोदामावर आणि मीरा रोड परिसरातील आणखी एका आस्थापनावर गेल्या काही महिन्यांत छापे टाकण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. याप्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्यांनी दिली. आरोपी बनावट औषधे तयार करून त्यांची विक्री करीत होते तसेच ती औषधे मूळ उत्पादकांची असल्याचा खोटा दावा करीत होते, असे तपासात दिसल्याचे एका अधिकाऱ्याने तक्रारीत म्हटले आहे. तक्रारीनुसार ही औषधे अनेक राज्यांमध्ये वितरित करण्यात आली, ज्यामुळे रुग्णांची फसवणूक झाली, असे ते म्हणाले. पोलिसांनी शनिवारी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. या बनावट औषधांच्या निर्मितीची ठिकाणे, पॅकेजिंग मटेरियलचा स्रोत आणि वितरण चॅनेल तसेच एफडीए तपास करीत होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### पद्मश्री पुरस्कार प्राप्त जोधय्याबाई यांचे निधन

**भोपाळ** : मध्यप्रदेशातील पद्मश्री पुरस्कार प्राप्त प्रसिद्ध बैगा आदिवासी कलाकार जोधय्याबाई यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्या ८६ वर्षांच्या होत्या. बेगा आदिवासी कलेला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. जोधय्याबाई यांना कला क्षेत्रातील त्यांच्या विशेष योगदानाबद्दल २०२३ मध्ये देशाचा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मश्री प्रदान करण्यात आला होता. सोमवारी लोढा गावात जिल्हाधिकारी धरनेंद्र कुमार जैन, पोलिस अधिक्षक निवेदिता नायडू, इतर अधिकारी आणि राजकीय नेत्यांच्या उस्थितीत त्यांच्यावर अन्त्यसंस्कार पार पडला. मुख्यमंत्री मोहन यादव यांनी त्यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. देशाने एक महान कलाकार गमवला, ज्याने देश आणि विदेशातील आदिवासी संस्कृती, कला आणि परंपरांवर आधारित चित्रांना ओळख मिळवून देण्यासाठी संपूर्ण आयुष्य वेचले, असे यादव यांनी एक्सवर पोस्ट करीत म्हटले आहे.

### गायक, संगीतकार पंडित संजय मराठे यांचे निधन

**ठाणे** : प्रख्यात शास्त्रीय गायक आणि पेटीवादक पंडित संजय राम मराठे यांचे ठाणे शहरातील रुग्णालयात निधन झाल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी सोमवारी सांगितले. ते



६८ वर्षांचे होते. त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यानंतर त्यांना ठाण्यातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, तेथे रविवारी रात्री त्यांचे निधन झाले, असे कुटुंबीयांनी सांगितले. दिग्गज संगीतकार पंडित राम मराठे यांचे ते जेष्ठ पुत्र होते. पंडित संजय मराठे यांनी भारतीय शास्त्रीय संगीत आणि रंगभूमीवर आपली छाप सोडली आहे. पेटी सूर आणि मधूर गायनातील त्यांच्या कौशल्यासाठी ते औळखले जात होते. यावर्षी त्यांच्या वडिलांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये ते सहभागी होते. त्यांचे धाकटे भाऊ मुकुंद मराठे यांच्या सहकार्याने पंडित संजय मराठे यांनी त्यांच्या वडिलांच्या शताब्दीनिमित्त 'संगीत मंदारमाला' हे प्रसिद्ध मराठी संगीत नाटक पुन्हा रंगभूमीवर आणले. पारंपारिक मराठी संगीत रंगभूमीचे सार जपत त्याच्या नाविण्यपूर्ण प्रयोगांसाठी या निर्मितीला सर्वत्र वाहवा मिळाली. पंडित संजय मराठे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, नातवंडे असा परिवार आहे.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८१,७४८.५७ (-३८४.५५) |
| निफ्टी | २४,६६८.२५ (-१००.०५) |

### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ७७,८९० रु. |
| चांदी (प्रतिकिलो) | ९२,५०० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३३.० | ११.५ |
| अमरावती | ३०.४ | १०.६ |
| भंडारा | २७.८ | १०.० |
| बुलडाणा | ३०.६ | ११.४ |
| चंद्रपूर | २८.२ | १०.४ |
| गडचिरोली | २७.० | ९.० |
| गोंदिया | २७.४ | ७.४ |
| नागपूर | २९.० | ८.४ |
| वर्धा | २९.५ | ९.४ |
| वाशीम | ३०.६ | १३.० |
| यवतमाळ | २६.० | -.- |

# प्रियांकांना बोलण्यासाठी पुरेसा वेळ दिला नाही

## काँग्रेस आणि द्रमुक सदस्याचा लोकसभेत सभात्याग

**नवी दिल्ली, १६ डिसेंबर**

काँग्रेसच्या प्रियंका वढेरा यांना आज लोकसभेत शून्य तासात बोलण्यासाठी पुरेसा वेळ दिला नसल्याचा आरोप करीत काँग्रेस आणि द्रमूक सदस्यांनी सभात्याग केला.

बांगलादेशात अल्पसंख्यकांवर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात तसेच १९७१ मध्ये भारतीय लष्करासमोर पाकिस्तानी सैनिक शरणागती पत्करत असल्याबाबतचे छायाचित्र लष्करी मुख्यालयातून हटवण्यात आल्याबाबत पिठासीन सभापती संध्या राय यांनी आज विजय दिवसानिमित्त लोकसभेत शून्य तासात प्रियांका वढेरा यांना बोलण्याची परवानगी दिली.

१९७१ मध्ये बांगलादेश मुक्तीच्या लढ्याचा उल्लेख करीत प्रियांका वढेरा म्हणाल्या की, मी भारतीय सैनिक आणि त्यावेळचे आपले नेतृत्व यांच्या पाठिशी उभे राहिल्याबद्दल तेव्हाच्या जनतेचे आभार मानते. त्यावेळी भारत जगात एकाकी पडला होता, कोणीही भारताच्या बाजूने नव्हते. बांगलादेशातील आपल्या बंगाली बंधू-भगिनींचा आवाज ऐकायला कोणी तयार नव्हते. मात्र, मी तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे आभार मानते. त्यांच्या नेतृत्वात भारताने बांगलादेश मुक्तीची लढाई जिंकली. आज मी



अफगाणी बॅग घेऊन संसदेत आलेल्या काँग्रेस नेत्या प्रियांका वढेरा

दोन मुद्यांवर माझी चिंता व्यक्त करायला उभी आहे.

बांगलादेशात अल्पसंख्यक हिंदू आणि ख्रिश्चनांवर होत असलेल्या अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध सरकारने बांगलादेश सरकारशी चर्चा केली पाहिजे. माझा दुसरा मुद्दा लष्करी मुख्यालयातून बांगला देश युद्धाच्या वेळचे पाकिस्तानी सैनिकांच्या शरणागतीचे छायाचित्र हटवण्याबाबतचा आहे, असे त्या म्हणाल्या.

प्रियांका वढेरा बोलत असताना त्यांचा वेळ संपल्यामुळे राय यांनी बोलण्यासाठी दुसऱ्या सदस्याचे नाव पुकारले. त्यामुळे काँग्रेस सदस्य संतप्त झाले आणि आपल्या जागेवर उभे होत विरोध दर्शवू लागले. प्रियांकांना आपले म्हणणे मांडण्यासाठी आणखी वेळ द्या, अशी मागणी ते करू लागले. मात्र प्रियांकांना वेळ वाढवून न दिल्यामुळे काँग्रेस आणि द्रमूक सदस्यांनी 'शहिदों का अपमान नही सहेंगे' म्हणत सभात्याग केला. लष्करी मुख्यालयातून पाकिस्तानी सैनिकांच्या शरणागतीचे छायाचित्र हटवण्यात आल्याच्या मुद्यावरून काँग्रेसचे मणिकम टागोर यांनी आज स्थगनप्रस्तावाची सूचना दिली होती; मात्र ती फेटाळून लावण्यात आली. *(तभा वृत्तसेवा)*

# काय हे धाडस; वाघालाच डिवचण्याचा प्रयत्न!

## अवघ्या २० फुटांवरून घेतले फोटो-व्हिडीओ



**भंडारा, १६ डिसेंबर**

समोर वाघ दिसताच देवाचा धावा करणारे आपण पाहिले आहेत. मात्र, सध्या लोकांमध्ये एवढे धाडस वाढले की, वाघासोबत फोटो काढण्याचा पराक्रम केला जात आहे. आठ दिवसांत अड्याळ वनपरिक्षेत्रांतर्गत दुसरी घटना घडली आहे. वाघाला घेराव घालून फोटो व व्हिडीओ काढण्याचा तसेच शांत बसलेल्या वाघाला डिवचण्याचा प्रकार पुढे आला आहे.

काही दिवसांपासून पवनी तालुक्यात अड्याळ वनपरिक्षेत्रांतर्गत मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना समोर येत आहेत. रविवारी मांगली गावाजवळ तलावाच्या काठावर वाघ दिसल्याच्या वृत्ताने खळबळ उडाली. तलावात सांबराची शिकार करून वाघ निवांत विश्रांती घेत असताना दिसताच काही वेळातच तलावाजवळ गर्दी जमली. काही गावकरी अगदी वाघा जवळ आले. अवघ्या १० ते २० फूट अंतरावरून फोटो आणि व्हिडीओ घेत व्याघ्र दर्शनाचा आनंद लुटत होते. हा प्रकार वन विभागाच्या नियमांना मोडीत काढणारा होता.

परिस्थिती चिघळण्यापूर्वीच वन विभागाचे रक्षक घटनास्थळी पोहोचले. त्यांनी गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आतषबाजी केली आणि वाघाला हाकलले. लोकांच्या गराड्यातून वाघ जंगलात निघून गेल्यावर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सुटकेचा श्वास घेतला. आधीच मानव आणि वन्य प्राणी यांच्यातील संघर्षाच्या घटना वाढत आहेत. अशावेळी फोटो सेशनच्या नावाखाली केला जाणारा प्रकार त्यात भर घालणारा आहे.

**पोलिसांनाही धक्काबुक्की**

व्याघ्र समितीचे अध्यक्ष नुरूल हसन हे जिल्हा पोलिस अधीक्षक असताना त्यांच्याच कर्मचाऱ्यांना लोक धक्काबुक्की करताना दिसत होते. ही गंभीर बाब आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी योग्य ती कारवाई करावी म्हणून लेखी तक्रार पोलिस अधीक्षक आणि उपवन संरक्षक राहुल गवई यांना दिल्याचे माजी वन्यजीव संरक्षक नदीम खान यांनी सांगितले. *(तभा वृत्तसेवा)*

# झाकिर हुसैन यांच्या निधनाने संगीत जगताचे मोठे नुकसान : राष्ट्रपती

**नवी दिल्ली, १६ डिसेंबर**

तबलावादक उस्ताद झाकिर हुसैन यांचे निधन संगीत जगताचे मोठे नुकसान आहे, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटले आहे. झाकिर हुसैन यांच्या निधनाने संगीत क्षेत्रात मोठी हानी झाली आहे. ते त्यांच्या विलक्षण सर्जनशीलतेसाठी आणि कल्पकतेसाठी प्रसिद्ध होते. त्यांनी जगभरातील संगीत प्रेमींच्या पिढ्यांना मंत्रमुग्ध केले, असे मुर्मू यांनी एक्सवर म्हटले आहे. ते भारत आणि पश्चिमात्य संगीतपरंपरा यांच्यातील दुवा होते. त्यांना पद्मविभूषण बहाल करण्याचे सौभाग्य मिळाले. मी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना आणि त्यांच्या असंख्य चाहत्यांसाठी शोक व्यक्त करते, असे त्या म्हणाल्या.

**झाकिर हुसैन खरे प्रतिभावंत : नरेंद्र मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रसिद्ध तबलावादक झाकिर हुसैन यांना श्रद्धांजली वाहिली. भारतीय शास्त्रीय संगीताच्या जगात क्रांती घडवणारा खरा प्रतिभावंत म्हणून त्यांचे कायम स्मरण केले जाईल, असे पंतप्रधान म्हणाले. त्यांनी तबला जागतिक स्तरावर आणला आणि लाखो लोकांना त्यांच्या अतुलनीय तालाने मंत्रमुग्ध केले. याद्वारे त्यांनी भारतीय शास्त्रीय परंपरांचे जागतिक संगीताशी मिलाप केला, त्यामुळे ते सांस्कृतिक ऐक्याचे प्रतीक बनले, असे मोदी म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

# रेल्वे लहानग्यांसाठी अधिक सुरक्षित होणार

## आरपीएफची बाल तस्करीवर कार्यशाळा

**मुंबई, १६ डिसेंबर**

बाल तस्करीला आळा घालण्यासाठी आणि तस्करीस बळी पडलेल्या बालकांच्या पुनर्वसनासाठी शासनाचे विविध विभाग तसेच य क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्था यांच्यात समन्वय आवश्यक आहे. लहान मुलांसाठी रेल्वे अधिकाधिक सुरक्षित करण्यासाठी आम्ही प्रयत्नरत आहोत, असे प्रतिपादन विशेष पोलिस महानिरीक्षक अस्वती दोरजे (भापोसे) यांनी केले.

बाल तस्करीचे समूळ उच्चाटन या विषयावर रेल्वे पोलिस मुख्यालयात आयोजित कार्यशाळेला त्या संबोधित करत होत्या. त्या म्हणाल्या, तस्करीला बळी पडलेल्या अल्पवयीन मुला-मुलींना मुक्त करून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या कार्यास राज्यात भरघोस यश लाभले आहे. कोलमडून पडलेले ते किशोर आता सावरले आहेत, समाजाच्या मुख्य प्रवाहात सहज वावरू लागले आहेत आणि सन्मानाने जगत आहेत, असेही दोरजे म्हणाल्या.

दोन दिवसांत विविध चर्चासत्रांदरम्यान निरनिराळ्या मुद्यांवर तज्ज्ञांनी माहिती दिली व पोलिस कर्मचाऱ्यांचे अनुभव जाणून घेतले. तस्करीला बळी पडलेली बालके तसेच तस्करांना त्यांच्या देहबोलीचे निरीक्षण करून कसे ओळखावे व तस्करी कशी रोखावी, यावर प्रसिद्ध देहबोली तज्ज्ञ गौरव गिल यांचे सत्र झाले. अधिवक्ता सीमा अदाते यांनी तस्करी रोखण्यासाठी शासनाच्या विविध विभागात एकसूत्रता कशी आणावी, यावर मार्गदर्शन केले. प्रकृती संस्थेच्या तज्ज्ञांनी तस्करीच्या बदलत्या स्वरूपावर माहिती दिली. मानसशास्त्रज्ञ अंकिता रायपुरे यांनी तस्करीला बळी पडलेली बालके तसेच तस्करांचे समुपदेशन याबाबत माहिती दिली. *(वृत्तसंस्था)*




यवतमाळ : हिवाळी अधिवेशनानिमित्त विधानभवन परिसरात काढलेल्या दोन रांगोळ्या प्रत्येकाचे लक्ष वेधून घेत आहे. सचिवालयातील महारांगोळी २५ फूट बाय १२ फूट आकाराची आहे. तिचे भव्य रूप राज्यभरातून आलेले प्रत्येक जण नजरेत कैद करून घेत होता. विदर्भातील कलावंतांनी ही रांगोळी सतत चार दिवस मेहनत घेत साकारली आहे. विधानभवन येथे ४ फूट बाय ६ फूट आकाराची रांगोळी साकारली आहे. या कलावंतांमध्ये नागपूर येथील सुनील तरारे व राणी तरारे यांच्यासह यवतमाळ येथील प्रसिद्ध रांगोळी पोर्ट्रेट कलावंत रणजित वनकर, अरुण लोणारकर आणि संजय सांबजवार यांचा सहभाग आहे.

### अजित डोवाल लवकरच चीनच्या दौऱ्यावर जाणार

**नवी दिल्ली, १६ डिसेंबर**

जवळपास पाच वर्षांच्या कालावधीनंतर मोठ्या सीमाप्रश्नावर होणाऱ्या विशेष प्रतिनिधी संवादाच्या नवीन फेरीत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल लवकरच बीजिंगला जाण्याची शक्यता आहे.

विशेष प्रतिनिधी संवादाची अखेरची फेरी डिसेंबर २०१९ मध्ये नवी दिल्ली येथे झाली होती. २३ ऑक्टोबर रोजी कझान येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात झालेल्या बैठकीत संवाद यंत्रणा पुनरुज्जीवित करण्याचा निर्णय घेण्यात आला..

२३ व्या विशेष प्रतिनिधी चर्चेसाठी अजित डोवाल चीनला जाणार आहेत, असे सूत्रांनी सांगितले. विशेष प्रतिनिधी चर्चा या महिन्यात किंवा जानेवारीत सुरुवातीला होण्याची शक्यता आहे. मात्र, या चर्चेच्या स्थानाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. ५ डिसेंबर रोजी झालेल्या राजनयिक चर्चेदरम्यान भारत आणि चीनने विशेष प्रतिनिधी चर्चेची तयारी केली होती. *(वृत्तसंस्था)*

# मंत्रीपदात डावल्याने महायुतीतील जेष्ठांमध्ये नाराजीचे धुमारे!

## ११ आमदारांची उघड नाराजी

**तभा वृत्तसेवा/जमीर काझी**
**मुंबई,दि.१६ डिसेंबर:**

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारात ३३ कॅबिनेटसह ३९ जणांना ताण देण्यात आले असले तरी तिन्ही पक्षातील अनेक दिग्गज व ज्येष्ठ नेत्यांना डावलण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्याकडून उघड व अप्रत्यक्षपणे नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. त्यांच्याकडून पक्ष नेतृत्वाला एक प्रकारे इशारा देण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ यांनी तर सम र्थकांचा मेळावा घेऊन पुढील भूमिका ठरवणार असल्याचे सांगून एकप्रकारे पक्षप्रमुख व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना इशारा दिला . प्रकाश सोळंके यांनी धनंजय मुंडे ऐवजी आपल्याला मंत्रिमंडळात स्थान मिळाला हवे होते अशी उघडपणे नाराजी बोलून दाखवली .

भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांच्यासह सदाभाऊ खोत यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे.तर

यामध्ये शिवसेना शिंदे गटाच्या विजय शिवतारे,तानाजी सावंत, दीपक केसरकर, प्रकाश सुर्वे यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली. शिवतारे यांनी अडीच वर्षांनंतर मंत्रीपद दिले तरी ते घेणार नाही, असे सांगत खदखद जाहीरपणे मांडली.

मंत्रिमंडळ विस्तारात आधी मंत्री असलेल्या अनेक बड्या नेत्यांना डच्चू देण्यात आला आहे. त्यामध्ये भाजपाने मुनगंटीवार, विजयकुमार गावित या जेष्ठांसह सदा खोत, गोविंद पडळकर,रवी राणा नाराज आहेत.

शिवसेना शिंदे गटातील अब्दुल सत्तार, तानाजी सावंत, दीपक केसरकर, विजय शिवतारे, प्रकाश सुर्वे यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. त्यामुळे नेत्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे.तसेच पवनी विधानसभा मतदारसंघाचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांना मंत्रिपद न मिळाल्यानं त्यांनी काल उघड नाराजी व्यक्त करत त्यांनी शिवसेना उपनेते पदाचा राजीनामा देखील दिला. त्यांचं पक्षात काहीच योगदान नाही अशांना देखील मंत्रिपद मिळाले ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, त्यांना देखील मंत्रिपद मिळालं, जर मला जनतेला न्याय देता येत नसेल तर पदावर राहून काय उपयोग असा सवाल भोंडेकर यांनी केला आहे.

मंत्रिपद न मिळाल्युळे तानाजी सावंत नाराज झाले आहेत. नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाला न थांबता ते पुण्यातील बालाजी नगर येथील कार्यालयात परतले आहेत. माध्यमांसमोर येण्यासाठी तानाजी सावंत यांनी नकार दिला आहे. राष्ट्रवादीच्या छगन भुजबळ यांनी 'जहा नही चैना वहा नही रहना ,असे म्हणत पक्षातून बाहेर पडण्यात चा सुतवा दिला आहे येवल्यात पक्ष कार्यकर्ते समर्थकांचा मेळावा घेऊन ते पुढील भूमि का जाहीर करणार आहेत.

त्यांच्यासह अनिल पाटील यांनाही मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नाही तर प्रकाश साळुंके इच्छुक असून त्यांना डावलण्यात आल्याने त्यांनी उघडपणे नाराजी दर्शवित अधिवेशनात हजर न आणण्याचा निर्णय घेतला आहे.

# संभलच्या मंदिराजवळ सापडल्या खंडित मूर्ती, स्वस्तिक काढलेल्या विटा

## खोदकामातून समोर आला इतिहास

**संभल, १६ डिसेंबर**

अतिक्रमण करून ४६ वर्षांपासून दडवून ठेवलेल्या मंदिराजवळच्या विहिरीचे खोदकाम संभलमध्ये सुरू करण्यात आले. खंडित मूर्ती, स्वस्तिक काढलेल्या विटा या विहिरीच्या खोदकामातून निघाल्या आहेत. या विहिरीतही इसिहास दडला असल्याची चर्चा आता सुरू झाली असून, कार्बन डेटिंगच्या माध्यमातून वास्तव जाणून घ्यावे, अशी मागणी केली जात आहे.

संभलच्या खग्गू सराय परिसरात ४६ वर्षानंतर एक शिवमंदिर उघडण्यात आल्यानंतर येथील विहिरीतून तीन मूर्ती सापडल्या. या पार्वती, गणेश आणि कार्तिकेयाच्या असल्याचे सांगितले जात आहे. संभल येथे १९७८ मध्ये झालेल्या जातीय हिंसाचारानंतर बंद करण्यात आलेले हे मंदिर पोलिस आणि प्रशासनाने नुकतेच उघडले आहे.

अतिक्रमण आणि वीजचोरीच्या विरोधात कारवाई करीत एक पथक येथे पोहोचले, त्यावेळी या मंदिराची माहिती समोर आली. हे प्राचीन शिवमंदिर असल्याचे सांगितले जात आहे. विहिरीचे खोदकाम केल्यास, त्यात आणखी मूर्ती सापडतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. मूर्ती खंडित होऊ नये, या भीतीमुळे सध्या खोदकाम बंद करण्यात आले आहे. मूर्ती सापडल्यानंतर स्थानिक हिंदूंनी आनंद व्यक्त केला आहे.

**कार्बन डेटिंगसाठी पाठवले पत्र**

४६ वर्षांनंतर उघडलेले मंदिर आणि विहिरीचे कार्बन डेटिंग केले जावे, यासाठी भारतीय पुरातत्त्व विभागाला पत्र पाठवण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा न्यायदंडाधिकारी राजेंद्र पेन्सिया यांनी दिली.

**मंदिर एका रात्रीत प्रकटलेले नाही : आदित्यनाथ**

संभलमध्ये १९७८ मध्ये झालेलया जातीय दंगलीनंतर बंद असलेले मंदिर प्रशासनाने पुन्हा उघडल्याच्या मुद्यावर उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. हे मंदिर एका रात्रीत प्रकटले नाही. उलट आमचा वारसा आणि इतिहासाच्या वस्तुस्थितीचे प्रतिनिधित्व ते करीत आहे, असे आदित्यनाथ यांनी म्हटले. *(वृत्तसंस्था)*

# हिवाळी अधिवेशनांची ऐतिहासिक वाटचाल ग्रंथांत अधोरेखित होणार

## ज्येष्ठ संपादक सुधीर पाठक यांच्या अध्यक्षतेत संपादकीय मंडळ

**नागपूर, १६ डिसेंबर**

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने विदर्भ विकासासह अनेक सामाजिक प्रश्नांवर सभागृहात झालेल्या चर्चा ते लोकाभिमुख निर्णयांपर्यंतचा एक मैलाचा टप्पा नागपूर विधानभवनाने अनुभवला. येथील कापूस उत्पादक शेतकऱ्यांपासून ते अनुशेषापर्यंत अत्यंत अभ्यासपूर्ण चर्चा हिवाळी अधिवेशनात झाल्या आहेत. याचा आढावा घेणारा परिपूर्ण संदर्भ ग्रंथ साकारावा असा मानस आहे. येथील तिन्ही पिढ्यांचा सहभाग असलेले सशक्त संपादक मंडळ या ग्रंथाची दिलेल्या मुदतीत अभ्यासपूर्ण निर्मिती करेल, असा विश्वास विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केला.



हिवाळी अधिवेशनाचे वृत्तांकन करणारे ज्येष्ठ पत्रकार, संपादकांची विशेष बैठक डॉ. गोऱ्हे यांनी निमंत्रित केली होती. विधानभवनातील राष्ट्रकुल समिती सभागृहात झालेल्या या बैठकीस विधानभवनचे सचिव-२ (कार्यभार) विलास आठवले, वि. स. पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्राचे संचालक नीलेश मदाने, माहिती संचालक डॉ. गणेश मुळे, माजी संपादक सुधीर पाठक, नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्रा, ज्येष्ठ संपादक श्रीमंत माने, श्रीपाद अपराजित, तरुण भारतचे संपादक गजानन निमदेव, रमेश कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर दुपारे, आनंद निर्वाण, विश्वास इंदुरकर, शैलेश पांडे, महेश उपदेव, रवी गुळकरी, विकास वैद्य, वैभव गांजापुरे व इतर पत्रकार उपस्थित होते. नागपूर येथील हिवाळी अधिवेशने-विधान परिषदेतील ऐतिहासिक पाऊलखुणा' या ग्रंथाच्या परिपूर्ण निर्मितीसाठी संपादकीय मंडळ निश्चित करण्याचा सर्वांच्या वतीने निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ज्येष्ठ पत्रकार सुधीर पाठक यांच्या अध्यक्षतेखाली संपादकीय मंडळ बैठकीत जाहीर करण्यात आले. *(तभा वृत्तसेवा)*

## अग्रलेख...

# अलौकिकाचे लेणे...

साक्षात्काराची असंख्य रूपे असतात. कधी ती रूपे मनास अनुभवता येतात, कधी डोळ्यांस दिसतात तर कधी त्याच्या केवळ श्रवणानुभवाने कर्णसंपुटे संतुष्ट होतात. एखाद्या शांत, समयी, वाऱ्याची एखादी झुळूक आसमंतात झोके घेऊ लागते, तिच्या लडिवाळ स्पर्शाने झाडे, वेलींची पाने आनंदाने डोलू लागतात आणि त्यांचा तो आनंद ध्वनीतून व्यतीत होतो. आसपासच्या कोलाहलाची माणसास अलिकडे एवढी सवय झालेली असते की, शांततादेखील कधी कधी असह्य होत असल्याने शांततेचा सहवास फार काळ सहन होत नाही; अशा स्थितीत असा अनुभव येणे आणि त्या ध्वनीमधून उमटणाऱ्या संगीताचा साक्षात्कार होणे ही मनाची एक अत्युच्च अनुभवावस्था असते. निसर्गाच्या प्रत्येक कृतीला लय, ताल, सूर आणि संगीत असते, असे म्हणतात. पहाटेच्या मंद वाऱ्याच्या झुळुकीमधील संगीत, किलबिलाट करणाऱ्या पक्ष्यांच्या कूजनातील संगीत, झऱ्याच्या खळखळाटातील संगीत अशा प्रत्येक संगीतलहरींचा नाद कानात साठविण्याच्या क्षमता कानांना लाभली की, कानाच्या माध्यमातून अध्यात्माच्या मार्गाकडे जाण्याची थोडीफार क्षमता साधता येते. म्हणूनच कसलेल्या कानांची निर्मिती करण्याकरिता निसर्गानेच चहुबाजूंनी संगीत, सूर, लय आणि तालाची निर्मिती केलेली असते. अलिकडे शहरीकरणाच्या गजबजाटात त्या संगीताचे सूर कानापर्यंत पोहोचणे जवळपास अवघडच झालेले असल्याने, ते संगीत शोधण्याचा सोपा मार्ग निसर्गाने निर्माण केला. त्याला मानवी प्रतिभेतून उमलणाऱ्या कलांचे रूप दिले आणि माणसाच्या गळ्यात, हातात, बोटात प्रतिभेचे लेणे चढविले. पक्ष्यांच्या कूजनातून उमटणाऱ्या संगीताचा अनुभव देणारा एखादा कोकिळकंठी गळा पिढ्यान्‌पिढ्यांना निसर्गातील त्या मुकलेल्या अनुभवाचा साक्षात्कार देऊन मने समृद्ध करू लागला, कोणा प्रतिभाशाली कलावंताच्या कसलेल्या बोटांनी छेडलेल्या तारेतून उमटणाऱ्या मंजुळ ध्वनीच्या श्रवणातून अध्यात्माचा साक्षात्कार होऊ लागला, तर कधी एखाद्या चर्मवाद्यातून उमटणाऱ्या तालावर मान डोलू लागली की आपोआपच ब्रह्मानंदी टाळी लागून त्याच अध्यात्माची अनोखी अनुभूती मनावर राज्य करू लागली... अशा अनोख्या अध्यात्माचा आधार मिळाला की मन खंबीर होते, समस्यांचे ओझे हलके वाटू लागते आणि त्यांना सामोरे जाण्याची मानसिक क्षमता वाढते, असा आपला अनुभवसिद्ध विश्वास आहे. प्रत्येक माणसास अध्यात्माची ती अवस्था साधता यावी यासाठी निसर्गाने संगीत तर निर्माण केलेच; पण ज्याप्रमाणे निसर्गाच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या पक्ष्यांच्या, वाऱ्यांचा, झऱ्यांच्या सुरातून संगीत पेरले, तसे संगीत माणसांच्या मनात, ओठात, गळ्यात आणि बोटातही पेरण्याचे बहुमोल काम निसर्गानेच करून ठेवले. एवढेच करून निसर्ग थांबला नाही, तर या संगीतकलेचा वारसा समृद्ध करण्याची जबाबदारी पेलणारे कलावंतही निर्माण केले. असे कलावंत घडविता येत नाहीत. निसर्गाचा आशीर्वाद घेऊन ते जन्मालाच आलेले असतात. अगोदर त्यांना त्यांच्यातील कलेचा साक्षात्कार होतो, तिच्या अस्तित्वाची पालखी ते श्रद्धेने खांद्यावर घेतात आणि कलेची उपासना सुरू होते. कठोर साधनेतून कला प्रसन्न झाली की, कलावंत सिद्ध होतो आणि निसर्गाने खांद्यावर दिलेली पालखीची पुढची वाटचाल सुरू होते.

संगीतातील जी घराणी अशाच परंपरेतून निर्माण झाली, त्यामध्ये उस्ताद झाकिर हुसैन यांच्या 'घराण्या'चा उल्लेख करावाच लागतो. उस्ताद अल्लारखाँ नावाच्या श्रेष्ठ कलावंताच्या बोटांनी तबल्यासारख्या चर्मवाद्यावर थाप दिली की, त्यातून उमटणाऱ्या स्वर्गीय ध्वनीचा अनुभव घेऊन रसिकांच्या पिढ्यांच्या कसलेल्या कानांना त्या अनुभवाचा पुढेदेखील कधीच विसर पडू नये, यासाठी निसर्गाने तो वारसा त्यांच्या सुपुत्राकडे, उस्ताद झाकिर हुसैन यांच्या सुपूर्द केला आणि कलेच्या वारशाची ती पालखी नम्रपणे आपल्या खांद्यावर घेऊन झाकिर हुसैन यांनी तालवाद्याची, तबल्याची उपासना सुरू केली. वारसा आणि तपश्चर्या यांचा संगम झाला की, त्यातून सिद्ध होणारी कला अजोड असते, हे उस्ताद झाकिर हुसैन यांच्या तबलावादनाने सिद्ध करून दाखविले. कठोर तपश्चर्येतून तावून-सुलाखून सिद्ध झालेल्या कसलेल्या बोटांची थाप एकदा पडली की, तबल्याच्या चामड्यातून साक्षात उमटणारे बोल अनुभवण्याचा आनंद अध्यात्माच्या आनंदाहून वेगळा नसतो, हे उस्ताद झाकिर हुसैन यांच्या कलेने दाखवून दिले. तबल्यावर थिरकणाऱ्या त्यांच्या कलावंत बोटांतून उमटणाऱ्या प्रत्येक बोलानजीक, श्रोत्यांच्या मुखातून प्रत्येक समेवर उमटणारी 'वाहवा'ची दाद हा त्या अध्यात्मानुभवाचाच पुरावा असतो. उस्ताद झाकिर हुसैन यांचा जन्म ज्या कलोपासकाच्या घराण्यात झाला, त्या घराण्याने तर संगीताच्या माध्यमातून मनामनामध्ये अध्यात्म रुजविण्यासाठीच जणू अवतार घेतला असावा. पिता अल्लारखाँ, भाऊ तौकिफ कुरेशी, फझल कुरेशी स्वतः झाकिर हुसैन अशा कलावंतांची मांदियाळीच निसर्गाने जन्माला घातली आणि संगीतसाधनेचा वारसा त्यांच्याकडे सोपवून मानवी मने समृद्ध करण्याची जबाबदारी दिली. झाकिर हुसैन यांच्या तबल्याचे सूर पोहोचले नाहीत, असा एखादाही कोपरा आज जगाच्या पाठीवर शोधावाच लागेल आणि त्या तालसुरांनी तृप्त झाले नाहीत, असा एकही कान शोधूनही सापडणार नाही. त्या ध्वनिलहरींची रसिकमनावरची जादू वर्षानुवर्षे बहरत गेली. कोणत्याही ढंगाचे संगीत असो, लाडिक, मधाळ सुरांतून उमटणाऱ्या गीताची धून असो, भक्तिरसाने ओथंबलेले सूर असोत, तपश्चर्येतून सिद्ध झालेल्या गळ्यातून उमटणारा अधिकारी स्वर असो, पाश्चात्त्य संगीताची झाक असलेले गीत असो किंवा विरह व्यथांच्या व्याकुळतेने ओथंबलेला आवाज असो, झाकिर हुसैन यांच्या बोटांनी तबल्यावर उमटलेल्या ध्वनींच्या साथीने त्या प्रत्येकास जिवाभावाची साथ दिली आणि संगीताचा प्रत्येक स्वर समृद्ध केला. हिंदुस्तानी संगीतातील अढळ स्थानी असलेल्या तबल्यावर झाकिर हुसैन यांच्या जादुई बोटांनी जवळपास सहा दशके अधिराज्य गाजविले आणि तबल्याची प्रतिष्ठा उंचावून ती जगाच्या पाठीवर अढळ स्थानी नेऊन ठेवली. जिथे जिथे त्या ध्वनीची उधळण झाली, तिथे तिथे अक्षरशः सुरांचे चांदणे फुलले. या ध्वनीने गायनकळा, वादनकळा धन्य केली आणि संगीताला स्वर्गसुख दिले. कानाच्या माध्यमातून मनामनांत बरसणाऱ्या या ध्वनीतून माणसाच्या मनाला आणि शरीराला ताजेपणा बहाल केला आणि संगीत हा माणसाच्या जगण्याचा अविभाज्य भाग ठरवून जगण्याला आनंदाचा अर्थ दिला. झाकिर हुसैन यांच्या जादुभरल्या बोटांनी तबल्यावर स्वर्गीय ध्वनीच्या लगडी उलगडू लागल्या की कान जागे होतात, मन खुलत जाते, शरीर ठेका धरू लागते आणि या आनंदात विहरणारी सारी मने, एका अनोख्या नात्याने एकमेकांशी जोडली जातात. एखाद्या समेवर एकाच क्षणी असंख्य श्रोत्यांच्या मुखातून उमटणारी दाद हा त्या नात्याचाच प्रत्यक्ष पुरावा असतो. पद्मविभूषण, ग्रॅमी पुरस्कारांचे विजेते, संगीत क्षेत्रात आपल्या कलेने अढळ स्थान प्राप्त केलेला ध्रुवतारा आणि कला समृद्ध करण्याच्या जबाबदारीची पालखी नम्रपणे खांद्यावर वाहतानाही आपल्यातील माणूसपण हरवणार नाही, याचे विनम्रभान असलेला उस्ताद झाकिर हुसैन नावाच्या सच्चा कलावंताने जगाचा निरोप घेतल्याच्या दुःखद वार्तेने संगीत क्षेत्राचे सूर हळवे झाले आहेत. झाकिर हुसैन यांच्या बोटांतून निघणारे जिवंत सूर यापुढे अनुभवता येणार नाहीत हे खरे असले, तरी त्यांच्या साधनेतून सिद्ध झालेले असंख्य जिवंत सूर अजरामरपणे संगीत क्षेत्रावर अधिराज्य गाजवत राहणार आहेत. तबल्याची साधना करणाऱ्या प्रत्येकास उपासनेचा वारसा बहाल करून झाकिर हुसैन यांनी जगाचा निरोप घेतला आहे. असे म्हणतात की, कोणताही ध्वनी वातावरणातून कधीच नष्ट होत नसतो. झाकिर हुसैन यांच्या जादूगार बोटांतून तबल्यावर उमटताना जन्माला येणारा प्रत्येक ध्वनी तर अजरामरत्व घेऊनच या वातावरणात दाखल झालेला असल्याने त्यांचे नाव आणि तो ध्वनी तर अजरामर राहणारच आहे. आपल्या अस्तित्वावर सोपविली गेलेली संगीत साधनेच्या संस्काराची आणि वारशाची पालखी समृद्ध करून झाकिर हुसैन नावाचे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे; पण त्यांनी मागे ठेवलेल्या कलेचा आवाज पुढच्या असंख्य पिढ्यांना आनंद देत राहील, अध्यात्माची अनुभूती देत राहील आणि कानाच्या माध्यमातून मनेही समृद्ध करत राहील. एका अलौकिक कलावंताने आपला अवतार संपविला असला, तरी त्याचे कार्य मात्र अजरामर होऊन राहिले आहे.

## आंतरराष्ट्रीय

# सीरियातील मुलखावेगळा संघर्ष

**वसंत गणेश काणे**

बशर अल-असद हे सीरिया देशाचे राष्ट्राध्यक्ष, सैन्य दलाचे प्रमुख आणि सत्तारूढ बाथ पार्टीचे जनरल सेक्रेटरी होते. त्यांच्या अगोदर बशर यांचे वडील हाफिज अल-असद हेही सलग ३० वर्षे सीरियाचे राष्ट्राध्यक्ष होते. त्यांच्यानंतर बशर सीरियाचे सर्वेसर्वा झाले. अशाप्रकारे सीरियावर गेली अनेक वर्षे असद कुटुंबाची सत्ता होती. बंडखोरांनी ही सत्ता ८ डिसेंबर २०२४ ला उलथून टाकली. यासाठी गेली १३ वर्षे ते संघर्ष करीत होते. आत्ता-आत्ता तर या संघर्षाला गृहयुद्धाचे स्वरूप आले होते. असद यांनी सहकुटुंब सहपरिवार रशियात पलायन केले आहे. रशियाने मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांना आश्रय दिला आहे. आश्रय घेण्यासाठी असद यांनी रशियाची निवड करावी ही नोंद घ्यावी अशी बाब आहे. इस्लामी बंडखोरांनी रशिया आणि इराण या दोन राष्ट्रांनाही या निमित्ताने दणका दिला आहे, असे राजकीय निरीक्षक मानतात. याचे कारण हे आहे की, ही दोन राष्ट्रे सीरियातील असद राजवटीला पाठिंबा देत होती. रशियाने २०२२ मध्ये युक्रेनवर चढाई केली होती. त्यामुळे रशिया यावेळी असदला फारशी मदत करू शकला नाही. इराण हिजबुल्लाहमार्फत असदला मदत करीत असे. पण इस्रायलने हिजबुल्लाहलाच सध्या सुरू असलेल्या युद्धात पुरते नामोहरम केले आहे. त्यामुळे बंडखोरांना नामी संधी मिळाली आणि ते विजयी झाले असे दिसते. दुसरे असे की, सीरियातील जनतेतही असदविरोधात अगोदरच असलेला असंतोष वाढीस लागला होता. त्यांची सहानुभूती आता बंडखोरांकडे वळली. अशाप्रकारे बंडखोरांचा उठाव शेवटी गृहयुद्धात परिवर्तित झाला. असद यांची कारकीर्द ही जगातली सर्वांत मोठी जुलमी राजवट मानली जाते. ती सर्वांत जास्त काळ चालली. त्या मानाने तिचा बोभाटा मात्र फारसा झाला नाही. ती आता संपली. नवीन राजवट कशी येते ते पाहायचे.

सीरिया प्रकरणी रशिया, इराण, तुर्कस्तान, अमेरिका आणि इस्रायल ही राष्ट्रे आपापले हेतू समोर ठेवून भाग घेत होती. रशियाने असदची सतत पाठराखण केलेली आहे. युक्रेनमध्ये रशिया स्वतः जायबंदी झाला नसता तर त्याने सीरियाला आणखी मदत नक्कीच केली असती. इतर आव्हानांचा सामना करण्यात गुंतलेल्या इराणने तर प्रत्यक्ष युद्ध कुणाशीच केले नाही. त्याचे मुख्य वैर इस्रायलशी होते आणि आहे. यासाठी इराणने लेबनॉनमधील हिजबुल्लाह गटाला हाताशी धरले होते. पण हिजबुल्लाह गट इस्रायलसमोर टिकाव धरू शकला नाही. त्यामुळे इराणला हिजबुल्लाहकरवी सीरियात काही करता आले नाही. तुर्कस्तान आणि हयात तहरीर अल-शाम (एचटीएस) यांच्यात फारसे सख्य कधीच नव्हते. तुर्कस्तानला कुर्दिशांना ठोकून काढायचे होते. त्याचे हल्ले तेवढ्यापुरतेच मर्यादित असत. अमेरिका सीरियात तळ ठोकून होती ती यासाठी की, तिला मुख्यतः इसिसला पायबंद घालायचा होता. इस्रायलचे हल्ले लेबनॉनमधील हिजबुल्लाह गटाच्या विरोधात होते. या हल्ल्यातच हिजबुल्लाहला प्रचंड हानी सहन करावी लागली त्यामुळे हिजबुल्लाहमध्ये असदला मदत करण्याइतके त्राणच उरले नव्हते. अशा या अजब संघर्षाचे जगातले हे पहिलेच उदाहरण असावे.

या गृहयुद्धाची सुरुवात तशी २०११ मध्येच झाली, असे म्हटले पाहिजे. यात लाखापेक्षा जास्त लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. सीरियातच निदान सहा भागांत जणू स्वतंत्र राजवटी सुरू झाल्या होत्या. काहींचे नियंत्रण देशातील प्रभावी गट करीत असत तर काहींचे नियंत्रण देशाबाहेरील सूत्रधारांच्या हाती होते. हे गृहयुद्ध इतके लांबले की, शेवटी त्याचा जगाला जणू विसरच पडला होता. २०११ चा उठाव लोकशाहीवादी घटकांचा होता. तो देशव्यापी होता; पण असदशी एकनिष्ठ असलेल्या सैन्याने तो चिरडून टाकला. २०१२ साली संघर्षाची परिणती गृहयुद्धात झाली. सरकारी फौजा, फ्री सीरियन आर्मी (एफएसए), जिहादी गट असे तीन गट निरनिराळ्या भागांवर नियंत्रण करू लागले. २०१३ मध्ये सीरियातील कुर्दिश डेमोक्रॅटिक पार्टीने कुर्दबहुल उत्तर भागावर नियंत्रण मिळविले आणि 'रोजावा' या नावाचा स्वायत्त प्रशासकीय प्रदेश स्थापन झाला. २०१४ मध्ये इराक लेव्हंट (आयएसआयएल) यांनी सीरियावर नियंत्रण मिळविले आणि खिलाफत स्थापन केले. ('इस्लामिक स्टेट्स ऑफ इराक ॲण्ड लेव्हंट' किंवा 'इस्लामिक स्टेट्स ऑफ इराक ॲण्ड सीरिया' ही एक आंतरराष्ट्रीय अतिरेकी संघटना व स्वयंघोषित खिलाफत आहे. इस्लाम धर्मातील सुन्नी पंथाच्या वहाबी/सलाफी विचारांच्या कट्टर अतिरेक्यांद्वारे चालवली जात असलेली ही संघटना प्रामुख्याने पश्चिम आशियातील इराक व सीरिया या देशांमध्ये कार्यरत आहे.) २०१५ मध्ये सीरियन असंतोषाचे आंतरराष्ट्रीयीकरण झाले, असे म्हणता येईल. रशियाने असद सरकारची बाजू घेत ठिकठिकाणी बंडखोरांविरुद्ध मदत म्हणून बॉम्बहल्ले केले. यामुळे असद शासनाचे बळ वाढले आणि त्याचा हुरूपही वाढला. त्यांनी अलेप्पो शहर जिंकून घेतले. आशिया व युरोपला जोडणाऱ्या रेशीम मार्गावरील अलेप्पो हे शेवटचे शहर आहे/होते. २०१७ मध्ये अमेरिकेने कुर्दिशांच्या सीरियन डेमोक्रॅटिक फोर्सेसना (पार्टीला) पाठिंबा दिला. त्यांनी रक्का हे शहर जिंकून घेतले. रक्का हे अलेप्पोच्या पूर्वेला सुमारे १६० किलोमीटर अंतरावर युफ्रेटिस नदीच्या उत्तर तीरावरील सीरियामधील एक शहर आहे. २०१६ मध्ये असदच्या फौजांनी पूर्वेकडील घौटा आणि दारा हे प्रदेश जिंकून पश्चिम सीरिया आपल्या नियंत्रणाखाली आणला. पूर्वी असद यांच्या सैन्याने २१ ऑगस्ट २०१३ च्या पहाटे घौटा येथे रासायनिक हल्ला केला होता, म्हणून हे शहर जगाला प्रथम माहीत झाले होते. जॉर्डनच्या सीमेच्या उत्तरेस दारा या शहरी हौरान प्रदेशाची राजधानी आहे. २०२० मध्ये तुर्कस्तानने हस्तक्षेप करायला सुरुवात केली. तुर्कस्तानचे वैर कुर्दिशांशी होते. तुर्कस्तानचे हल्ले सीरियाच्या कुर्दिशबहुल उत्तर भागापुरतेच मर्यादित होते. तुर्कस्तानमधील कुर्दिश लोकांचा सीरियातील कुर्दिश लोकांशी संपर्क होऊ नये, हा तुर्कस्तानचा हेतू होता. कारण हे दोन्ही प्रदेश एकत्र येऊन स्वतंत्र कुर्दिस्तान निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून होते. २०२० ते २०२३ या काळात संघर्षाला काहीसा विराम मिळाला. डिसेंबर २०२४ मध्ये बंडखोरांनी एकदम उचल खाल्ली. त्यांना हयात तहरीर अल-शाम (एचटीएस) यांचे सक्रिय साहाय्य मिळाले. हयात तहरीर अल-शाम किंवा तहरीर अल-शाम ही एक सुन्नी इस्लामवादी राजकीय आणि सशस्त्र संघटना आहे. त्यांच्या साह्याने बंडखोरांनी अलेप्पो तर जिंकलेच; शिवाय होम्स आणि दमास्कसही जिंकून असद यांना पलायन करण्यास भाग पाडले. होम्स हे पश्चिम सीरियामधील एक महत्त्वाचे शहर आहे. ओरोंटेस नदीवर स्थित होम्स हे सीरियातील अन्य शहरांना जोडणारे आणि भूमध्य सागरी किनाऱ्यावरील मध्यवर्ती शहरही आहे. दमास्कस ही सीरिया देशाची राजधानी आहे. दमास्कस हे मानवाने अखंडपणे वसाहत केलेले जगातील सर्वांत जुने शहर आहे, असे मानतात. सीरियात जे घडले ते समजून घ्यायचे असेल तर हा सर्व इतिहास समोर ठेवूनच विचार करावा लागतो. म्हणून हा तपशील महत्त्वाचा ठरतो. तो आज जगभर अभ्यासला जातो आहे. कारण सीरियाची कहाणी ही एक मुलखावेगळी कहाणी मानली जाते.

९४२२८०४४३०

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# परग्रहवासी, विज्ञान आणि तर्क-वितर्क

भौतिक जगाने विज्ञानाच्या जोरावर आजपर्यंत अनेक शोध लावलेत. हे शोध कुठल्याही चमत्कारापेक्षा कमी नाहीत. परंतु, आजही विज्ञानाला जीवनाच्या उत्पत्तीचा उलगडा करता आलेला नाही. किंबहुना जीवनाचा पूर्ण उलगडा होण्याची शक्यता भविष्यातही कुठल्याच अंगाने वाटत नाही. कारण, मनुष्याच्या कल्पनेलासुद्धा एकप्रकारची मर्यादा आहे आणि जीवनाच्या उत्पत्तीचा शोध घेणे, ही बाब मनुष्य कल्पनेच्या आवाक्यात नाही. किंबहुना या बाबीचा शोध घेण्यात मनुष्य पूर्णतः असमर्थ आहे. ज्या ठिकाणी मनुष्याची कल्पनाशक्ती संपते तिथूनच भारतीय अध्यात्माचा उगम होतो. आज विज्ञानाने जे शोध लावले आहे त्यातील बऱ्याच बाबी हिंदूंच्या धर्मग्रंथांत प्राचीन काळापासूनच नमूद आहे. त्यामुळे विज्ञान आणि अध्यात्माची सांगड घालणे काळाची गरज ठरते. परंतु, आजपर्यंत तरी तसा प्रयत्न झालेला नाही. अमेरिकेची नासा ही संशोधन संस्था अनेक वर्षांपासून परग्रहवासी अर्थात एलियन्सचा माग काढण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु, आजपर्यंत तरी एलियन्सच्या अस्तित्वाचा कुठलाच पुरावा शास्त्रज्ञांना सापडलेला नाही. तरीही आकाशात उडत्या तबकड्या पाहिल्याचा दावा अधूनमधून होत असतो. डिसेंबर २०२१ मध्ये मात्र नासाने एक अहवाल सादर करून यात कुठलेच तथ्य नसल्याचे स्पष्ट केले होते.

इंग्लंडचे थोर शास्त्रज्ञ स्टिफन हॉकिंग यांनी मनुष्याने एलियन्सचा शोध थांबवला पाहिजे, असे मत व्यक्त केले होते. हॉकिंग यांनी ब्रह्मांडातील जीवनाचे तीन स्तर मांडले आहेत. पृथ्वीवरील जीवन यादृष्टीने पहिल्याच चरणात असल्याचे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळेच एलियन्स आपल्यापर्यंत पोहोचले तर ते पृथ्वीवासीयांना नष्ट करतील, अशी भीती त्यांच्या मनात होती. परंतु, त्यांच्या दाव्याला कुठलाही ठोस आधार नाही. कारण, भौतिक शरीर घेऊन एलियन्स पृथ्वीपर्यंत पोहोचू शकतच नाही, हे विज्ञानानेच अनेकदा सिद्ध केलेले आहे. हॉकिंग निरीश्वरवादी होते. अर्थातच त्यांना ईश्वराचे अस्तित्व मान्य नव्हते. परंतु, जिथे मनुष्याची कल्पनाशक्ती संपते तिथूनच ईश्वराच्या अस्तित्वाला सुरुवात होते, असा तर्क भारतीय अध्यात्माने मांडलेला आहे. हिंदू तत्त्ववेत्त्यांनी आणि भारतीय धर्मग्रंथांनी भौतिक देहाचा नाही, तर त्यातील चैतन्यशक्ती आणि या चैतन्यशक्तीच्या निर्मात्याचा विचार मांडलेला आहे. विश्वातील कुठलीच गोष्ट विनाकारण अस्तित्वात येऊ शकत नाही. त्यामुळेच सृष्टीचे सूत्रसंचालन करणारा नायक आहेच, यावर अध्यात्माचा ठाम विश्वास आहे.

पृथ्वीवरील जीवसृष्टी पंचतत्त्वांपासून अस्तित्वात आलेली आहे आणि हे पंचतत्त्व ब्रह्मांडातूनच पृथ्वीने प्राप्त केलेले आहे. त्यामुळे परग्रहवासीयांचे अस्तित्व नाकारणे, ही बाब सयुक्तिक ठरू शकत नाही. आपल्या आकाशगंगेचा विस्तार १ लाख प्रकाश वर्षे इतका आहे. अर्थातच प्रकाशाच्या वेगाने आपण प्रवास केला तरी संपूर्ण आकाशगंगा फिरण्यासाठी १ लाख वर्षे लागतील आणि ही बाब केवळ अशक्य आहे. पृथ्वी सूर्यापासून १४ कोटी ९६ लाख किलोमीटर अंतरावर आहे. या स्थितीला हेबिटेबल झोन म्हणून गणले जाते. जे जीवनाच्या उत्पत्तीसाठी अत्यंत आवश्यक आहे. या विशाल ब्रह्मांडात जिथे जिथे अशी स्थिती असेल आणि इतर आवश्यक तत्त्वे अस्तित्वात आली असेल तर त्या प्रत्येक ठिकाणी जीवनाची उत्पत्ती झाल्याशिवाय राहू शकत नाही.

आपल्या सौरमंडळात गुरू ग्रहाचा चंद्र युरोपावर जीवसृष्टी असल्याचा तर्क अनेकदा मांडला जातो. यास काही ठोस कारणेसुद्धा आहेत. गुरूच्या या उपग्रहावर बर्फाचा समुद्र आढळून आल्याने बर्फाखाली जलचरांचा अधिवास असण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु, ही जीवसृष्टी पृथ्वीच्या तुलनेत खूपच मागासलेली असेल. कारण, पाण्याच्या बाहेर पडण्याची गरज जोपर्यंत तेथील जीवांना वाटणार नाही, तोपर्यंत तरी त्यांचा विकास होऊ शकत नाही. शनिच्या एका चंद्रावरही पाण्याची वाफ आढळून आल्याचे सांगितले जाते. परंतु, अद्याप तरी या दोन्ही ठिकाणी जीवन असल्याची पुष्टी होऊ शकलेली नाही. मंगळ ग्रहावर वातावरण आहे. शिवाय तिथे कधी काळी समुद्र होता, असा तर्क मांडला जातो. त्यामुळेच तिथे कधी काळी जीवन असावे, असा अंदाज बांधण्यात आला आहे. परंतु, तसा ठोस दावा आजपर्यंत कुठल्याही संशोधन संस्थेने केलेला नाही. भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात्‌ इस्रोने मागील १५ वर्षांत गगनभरारी घेतली आहे. जे नासासारख्या प्रगत संस्थेलाही जमले नाही, अशा अनाकलनीय बाबींचा उलगडा इस्रोने करून दाखविला आहे. भविष्यात इस्रोच्या जोरावर भारत संपूर्ण जगाचा मार्गदर्शक ठरेल, यात दुमत नाही.

९८८१७१६०२७


## इतस्ततः

# श्रीमद्‌भगवद्‌गीता व आधुनिक व्यवस्थापन

**दत्तात्रेय आंबुलकर**

महाभारतातील कौरव विरुद्ध पांडवांच्या कुरुक्षेत्रावरील युद्धात भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश म्हणजे श्रीमद्‌भगवद्‌गीता. आध्यात्मिक आणि तात्त्विक पातळीवरही अनन्यसाधारण महत्त्व लाभलेला हा ग्रंथ व्यवस्थापकीय कौशल्याच्या दृष्टिकोनातूनही तितकाच मार्गदर्शक ठरावा. नुकत्याच संपन्न झालेल्या गीता जयंतीनिमित्ताने श्रीमद्‌भगवद्‌गीता व आधुनिक व्यवस्थापनाची सांगड घालणारे हे विवेचन महत्त्वपूर्ण ठरावे.

महाभारताच्या पृष्ठभूमीवर व प्रत्यक्ष युद्धभूमीवर अर्जुनाला मोह, भ्रम, अनिश्चितता यातून बाहेर पडून भयमुक्त होऊन युद्धाला सामोरे जाण्याचा संदेश व प्रेरणा देणारी 'श्रीमद्‌भगवद्‌गीता' म्हणजे आधुनिक व्यवस्थापन व व्यवस्थापनशास्त्र या उभय क्षेत्रांत सर्व संबंधितांना मार्गदर्शन करणारा व्यवस्थापन ग्रंथ होय. गीतेचा प्रत्येक अध्याय व श्लोक व्यक्तिगतच नव्हे, तर व्यवस्थापकीय स्तरावरदेखील तितकाच मार्गदर्शक ठरतो. याचा उपयोग गीतेचे अभ्यासक-अनुयायांना केवळ नोकरी-रोजगारच नव्हे, तर करीअरव्यतिरिक्त व्यक्तिगत व सामाजिक जीवनातील प्रगतीसाठी उपयुक्त ठरतो. सकृद्दर्शनी पाहता, पांडवांपेक्षा कित्येक पटीने अधिक सैन्य व भीष्म, द्रोण, कर्ण यांसारखे अजेय बाहुबली कौरव सेनेत असताना पण, केवळ आपले लक्ष्य आणि उद्दिष्ट यावरच लक्ष केंद्रित करून संघर्षपूर्ण व आव्हानपर परिस्थितीवर मात करून उद्दिष्टप्राप्ती कशी केली जाऊ शकते, याचा चिरकालीन व प्रेरणादायी संदेश गीतेतूनच मिळू शकतो.व्यवस्थापन पद्धतीच्या चाकोरी वा रचनेमध्ये मनुष्य म्हणजेच कर्मचारी हा नेहमीच महत्त्वाचा घटक असतो. सर्वसाधारणपणे व्यवस्थापन क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञांच्या मते, व्यवसाय-व्यवस्थापन प्रक्रियेला खऱ्या अर्थाने यशस्वी करण्यासाठी व्यक्ती व व्यक्ती समूह अधिकाधिक सक्षमपणे व यशस्वी पद्धतीने काम करणे ही बाब सर्वोपरी ठरत असते. नेमकी हीच बाब गीतेमध्ये 'योगः कर्मसु कौशलम्' या सूत्रामध्ये सांगितली आहे. याचाच अर्थ म्हणजे, आपले कार्य आणि कामकाज यामध्ये अधिक कौशल्य वा कुशलता प्राप्त करणे हेच यशस्वी जीवनाचे लक्ष असायला हवे. त्याचप्रमाणे गीतेला काम आणि कार्य याप्रति समर्पण भावनेचे जनक मानले जाते. गीतेमध्ये हीच भाव-भूमिका महत्त्वाची ठरते. याचे कारण गीता तत्त्वज्ञानात काम करणाऱ्यांचे त्यांच्या कामाप्रति संपूर्ण समर्पण असावे, यावर भर दिला जातो व त्याचे सकारात्मक परिणाम होत जातात. व्यवस्थापन क्षेत्रात ज्याला 'मॅनेजमेंट बाय ऑब्जेक्टिव्हज' म्हटले जाते, त्या व्यवस्थापन संकल्पनेचे मूळ 'ध्येय साधना' स्वरूपात दिसते, हे लक्षणीय आहे.



याशिवाय भगवद्‌गीतेतील विविध अध्याय, श्लोक इत्यादींमध्ये नमूद केलेले दृष्टांतवजा विवेचन, मार्गदर्शन इत्यादी मुद्दे युवावर्गाला शिक्षण-रोजगारापासून जीवन वा व्यवसायातील प्रगती त्यासाठी आवश्यक अशी कौशल्यप्राप्ती यश मिळविण्यासाठी विविध आव्हानांचा करावा लागणारा यशस्वी सामना यासाठी जे मार्गदर्शक-विवेचन केले आहे, त्याचा प्रमुख गोषवारा पुढीलप्रमाणे-

**आळस व भीतीचा त्याग करणे** : भगवान श्रीकृष्णांनी गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील तिसऱ्या श्लोकात नमूद केल्यानुसार, 'क्लैब्यं मा स्म गमः' म्हणजेच व्यक्तीने यशप्राप्तीसाठी आपल्या आयुष्यातील आळस व भीती म्हणजेच दुबळेपणाचा त्याग करणे आवश्यक ठरते. पुढे श्रीकृष्णांनी म्हटल्यानुसार, 'क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परन्तप' म्हणजे आपल्या हृदयात व्याप्त तुच्छ दुबळेपणा, कमजोर प्रवृत्तीचा त्याग केल्याशिवाय मनुष्याला यशाच्या पायरीवरही पाय राखणे शक्त होत नाही. व्यावसायिक जीवनाचा हाच तर मूलमंत्र आहे.

**जीवनातील अविचलपणा** : दीर्घकालीन उद्दिष्टासह यशप्राप्ती करायची असेल, तर जीवनात सातत्य हवे. अस्थिर व चंचल मनोवृत्ती याठिकाणी उपयोगाची नसते. गीतावचनानुसार, 'गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिताः' म्हणजेच हर्ष वा शोक याहून दूर राहून प्रत्येक स्थितीत तटस्थ वा भयस्थ वृत्तीने आपण पुढेच मार्गक्रमण करायला हवे.

**स्थिर बुद्धीसह ध्येयसाधना** : गीतेतील विशेष व्यवस्थापन तत्त्व म्हणजे, जीवनातील यशापयशानुसार व्यक्तीने गौरवान्वित वा हताश होऊ नये. उलट व्यवस्थापकाने नेहमीच स्थिर बुद्धीसह ध्येयप्राप्तीच्या दिशेकडे अग्रेसर व्हायला हवे. श्रीकृष्णांनी नमूद केल्यानुसार आपल्या ध्येयानुरूप इच्छित फलप्राप्तीमध्येच यशस्वी जीवनाचे सार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यवस्थापकाने आपल्या उद्देश आणि उद्दिष्टांप्रति व त्यांच्या प्राप्तीसाठीच निर्धारित व नियोजित असायला हवे.

**एकाग्र चित्त व संपूर्ण समर्पण** : श्रीकृष्णांनी म्हटल्यानुसार, मानवी जीवन हे मन आणि आत्मा यामध्ये असणारे एक द्वंद्व स्वरूपाचे आहे. त्यांच्यानुसार मनुष्याला आपले मन वा चित्त स्थिर ठेवून प्राप्त परिस्थितीचे विश्लेषण-विवेचन करायला हवे. त्याचवेळी मनुष्य योग्य वा संयत निर्णय घेऊ शकतो. याचाच पुढचा व मार्गदर्शक टप्पा म्हणजे, 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हा गीतेतील श्लोक म्हणजे व्यक्ती म्हणून व्यवस्थापकाने आपल्या कर्म म्हणजेच कामाची चिंता न करता, आपल्या कर्तव्य व कर्तव्यपरायणतेचा मार्ग चोखाळायला हवा.

**संस्थागत व संघटनेच्या हिताचेच काम** : श्रीकृष्णांनी अर्जुनाला आपल्या स्वतःशी संबंधित व मर्यादित स्वरूपातील मुद्द्यांपेक्षा सर्वांच्या म्हणजेच समाजहिताचा विचार करून निर्णय घेण्यासाठी प्रेरित केले. याचाच अर्थ संस्था-संघटना अथवा व्यवसायाच्या संदर्भात निर्णय घेताना स्वतःचे नव्हे, तर सर्वांचे व्यापक हित लक्षात घेऊन निर्णय घेणेच निर्णायक क्षणी महत्त्वाचे असते.

**आपले काम आपली ओळख** : गीतेतील प्रत्येक व्यक्तीपासून व्यवस्थापक-व्यवस्थापनापर्यंतच्या सर्वांसाठी असणारा महत्त्वाचा बोध म्हणजे कुठल्याही व्यक्तीची ओळख त्याचे कुटुंब-जाती वा यानुसार नव्हे, तर त्याचे कर्म म्हणजेच कामकाजावर आधारित असायला हवी. यासाठी परस्पर संबंध व कार्याधारित व्यवहार या मुद्द्यांवर भर दिला गेला आहे. व्यवस्थापकांच्या कामकाज, व्यवहार व कार्यबद्धता इ. संदर्भात हे मुद्दे आजही लागू होतात.

**सतत निरंतर प्रयास** : व्यवस्थापनाच्या संदर्भात सातत्यपूर्ण प्रयत्नांना पर्याय नसतो. प्रसंगी व्यवसाय-व्यवस्थापनातील चढ-उतार वा यशापयशाचा सामना करूनच अपेक्षित यश निश्चितपणे मिळत असते. त्यामुळे यश न मिळाल्यास निराश न होता मार्गक्रमण करावे, याची प्रेरणाच भगवद्‌गीतेतून मिळते.

**बदल आणि बदलांबद्दल** : बदल ही निरंतर होणारी प्रक्रिया आहे. ही बिरुदावली निरंतर वापरली जाते. व्यवस्थापनांतर्गत तर आज एक विशेष व आवश्यक बाब म्हणून 'बदलांचे व्यवस्थापन व व्यवस्थापनातील बदलाचे महत्त्व' यावर विशेष भर दिला जातो. यासंदर्भात श्रीकृष्णांनी गीतेत नमूद केलेली बाब म्हणजे, बदलांपासून वा बदलाला सामोरे जाताना घाबरणारी व्यक्ती प्रसंगी अनावश्यक वा अनैतिक कार्य करण्यास प्रवृत्त होते. ही बाब व्यवस्थापकांनी प्रकर्षाने टाळायला हवी. या आणि यांसारख्या अनेक व्यावहारिक दृष्टांतांसह आपल्याला भगवद्‌गीतेतून व्यवस्थापन पद्धतीचे नेमके व मार्गदर्शक दर्शन होते.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### व्यंग्यचित्रकार मनोहर सप्रे यांना अभिवादन

चंद्रपूर येथील प्रसिद्ध व्यंग्यचित्रकार मनोहर सप्रे यांचे निधन झाल्याचे वर्तमानपत्रातून समजले. ते अतिशय खट्याळ तरीही मार्मिक असे व्यंग्यचित्रकार होते. चंद्रपूर येथे १९७९ साली त्याना भेटलो होतो. काही मित्रांसमवेत ताडोबा राष्ट्रीय अभयारण्यात पहिल्यांदा गेलो होतो. त्यात मनोहर सप्रेही होते. खूप हळहळ आणि दुःख वाटते की मराठी जनमानस एका, सहज सुंदर आणि जनसुलभ प्रतिभावंत कलावंतास मुकले आहे. आडगावी राहून, निखळ हास्यनिर्मिती करणारी व्यंग्यचित्रे त्यांनी रेखाटली होती. प्रचलित राजकीय आणि सामाजिक स्थितीवरीलही त्यांची मिस्किल प्रतिक्रिया, सर्वसामान्य वाचकांना साहित्यिक अनुभूती देणारी खमंग भेट होती. प्रदीर्घ काळ त्यांनी महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आणि सांस्कृतिक जीवन अभिरुचिसंपन्न आणि समृद्ध केले होते. दिवंगत मनोहर सप्रे यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

**जयंत गायकवाड**/वरळी, मुंबई

### हा तर जनतेचा अपमान

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत जनतेने भरभरून महायुतीच्या आमदारांना मतदान केले. हे मतदान अत्याधुनिक ईव्हीएमच्या साहाय्याने झाले. ईव्हीएम तपासणीपासून तर ती वापरेपर्यंतच्या सर्व प्रक्रिया सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर, संपूर्ण महाराष्ट्रात पार पडल्या असतानाही, विरोधी महाविकास आघाडीचे पुढारी ईव्हीएमवर अविश्वास व्यक्त करून आपल्या मशीन व तिच्या प्रोग्रामिंगच्या अज्ञानाचे प्रदर्शन करत आहेत. सोबतच निवडणूक आयोगावर अविश्वास दर्शवत आहेत. संपूर्ण राज्यात एकाचवेळी सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी मतदान केंद्रात मतदान प्रक्रियेकडे दुर्लक्ष करणे वा झोपून राहणे अशक्य आहे. जनतेने सार्वमताने दिलेला हा कौल नाकारणे म्हणजे जनमताचा अपमान करण्यासारखेच आहे. पुढच्या मतदान प्रक्रियेत याचा परिणाम अकारण ओरडणाऱ्यांच्या विरोधात जाऊ शकतो, हे या नेत्यांच्या लक्षात येत नसेल काय?

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

### हिंदुराष्ट्र स्थापनेत सनातन आश्रमाचे मोलाचे योगदान!

नुकताच ऑनलाइनच्या माध्यमातूनच एक आध्यात्मिक कार्यक्रम बघण्यात आला. हे वर्ष परमपूज्य गोविंददेव गिरी महाराज यांचे अमृत महोत्सवी वर्ष तर सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. हा दुग्धशर्करा योग जुळून आला. त्यानिमित्त गोमंतकाच्या पुण्यभूमीत आध्यात्मिक स्तरावर अतिशय सुंदर कार्यक्रम मोठ्या प्रमाणात संपन्न झाला. त्यावेळी मार्गदर्शन करतांना गोविंददेव गिरी महाराजांनी सनातन संस्थेने केलेल्या भगीरथ प्रयत्नांचे कौतुक केले. प्रवाहाविरुद्ध पोहण्याचे धाडस सनातन संस्थेने केले. ज्या काळी हिंदू म्हणवून घेण्याची सुद्धा कुणाची हिंमत होत नव्हती त्या काळात समाजमनात सनातन धर्म, संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न केला. सनातन संस्थेचे आणि सनातनच्या रामनाथी आश्रमाचे हिंदुराष्ट्र स्थापनेत मोलाचे योगदान असणार आहे. त्यांचे गोडवे गावे तितके थोडेच आहे, अशा शब्दांत कौतुक सुमनांची माळ आशीर्वाद स्वरूपात सनातन संस्थेला मिळाली.

खरंच हा सोहळा म्हणजे हिंदुराष्ट्रासाठी कार्य करणाऱ्या प्रत्येकाला नवसंजीवनी देणारा होता. गोविंददेव गिरी महाराजांच्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता तसेच सनातन संस्थेला रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शुभेच्छा!

**रमा देशमुख**/नागपूर

### राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाने राष्ट्रभक्तीचा जागर

संवेदना परिवाराचे हे राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाचे पाचवे पुष्प. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कीर्तनकार चारुदत्तबुवा आफळे यांच्या अमोघ व अभ्यासू वाणीतून, दमदार आवाज, संगीताची उत्तम जाण मनस्वी अभिनय हे सर्व आफळेबुवांच्या अंगचे गुण प्रेक्षकांना तासन्‌तास खिळवून ठेवतात. यावेळी देखील पश्चिम नागपूर नागरिक संघाने नेहमीप्रमाणे यथायोग्य सहकार्य केले. उत्तरप्रदेशातील, वंग भूमीतील, महाराष्ट्रातील क्रांतिकारकांचे कार्य व त्याला जोडून रामायणातील अशीच पात्रे हा फारच मोठा चिंतनाचा आगळा विषय आफळेबुवांनी फार सुंदररीत्या मांडला. स्वातंत्र्यवीर सावरकर व सावरकर परिवाराचे योगदान हा त्यांचा हातखंडा विषय. तरुण क्रांतिकारकांच्या हौतात्म्याने राष्ट्रभक्ती जागवली, त्या तिघींनी डोळ्यात पाणी आणले तर तात्यारावांच्या जीवनप्रवासाने अंगावर रोमांच उभे राहिले. या कीर्तन महोत्सवाचे आगळेपण म्हणजे पारंपरिक पेटी, तबल्याऐवजी तरुणाईला आकर्षित करणारा आधुनिक वाद्यवृंद व गीत- रामायणातील अजरामर गीते मराठी, हिंदी देशभक्तिपर लोकप्रिय व हिंदी सिनेगीते सुद्धा. पाचही दिवस आपापल्या क्षेत्रातील दिग्गजांनी छान मार्गदर्शन केले. पण कायम स्मरणात राहतील ते सात्यकी सावरकरांचे प्रखर बोलणे. उत्कृष्ट नियोजन, शिस्त, व्यवस्थितपणा यासाठी आयोजकांचे अभिनंदन.

**रवी वाघमारे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कुमठा नाका येथे तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर :** शहरातील कुमठा नाका परिसरातील तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. गौस अमजद शेख (वय २६, रा. कुमठा नाका, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. १५ डिसेंबर रात्री राहत्या घरी अज्ञात कारणावरून रुममध्ये लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन बेशुध्दावस्थेत मिळून आला. त्यामुळे सदर बझार पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार व्हि. पी. जमादार यांनी शेख यास खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. तुषार मेढे यांनी गौस यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

**CHANGE IN NAME**

I HERE BY DECLARE THAT MY OLD NAME **TANVIR MOHDDIN SHAIKH** HAS BEEN CHANGED TO NEW NAME **TANVIR MODIN SHAIKH** KINDALY NOTE THE SAME.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः मौजे वैराग ता. बार्शी जि. सोलापूर व परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, डि. सोलापूर सब. डि. ता. बार्शी पैकी मौजे वैराग नगरपंचायत हद्दीतील मिळकत याचा सि.स.नं. ८९२ असून याचे एकूण क्षेत्रफळ ५०.४० चौ.मी. असून याचाच नगरपंचायत मिळकत नं. १५३७ असा असून यासी चतुःसिमाः- पुर्वेस - गोवर्धन यांची जागा, दक्षिणेस - गोवर्धन यांची जागा, पश्चिमेस - गफार तांबोळी यांची जागा, उत्तरेस रस्ता.

उपरोक्त चतुःसिमा पुर्वक वर्णनाची जागा ही सुनील शहाजी काशीद, अनिता कालीदास कोंढारे, सारिका मुकुंद काशीद, साक्षी मुकुंद काशीद, ओमराज मुकुंद काशीद यांचे मालकी वहिवाटीची असून सदरची जागा त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढून सदरच्या जागेबाबत आमचे अशिला श्री. विनय चंद्रकांत गोवर्धन यांचेसोबत खरेदी विक्रीचा ठराव करुन आमचे अशिलाकडून विसारादाखल रक्कम स्विकारुन सदरची जागा आमचे अशिलास कायम खुशखरेदी देण्याचा ठराव केलेला आहे. सदर विद्यमान मालकांनी सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहीत आहे असा भरवसा व विश्वास आमचे अशिलास दिलेला आहे. तथापि, सदर मिळकती बाबत कोणाचा काही दान, गहाण, बक्षिस, पोटगी, भाडेकरार, खरेदीकरार, इसारपावती, वहिवाटहक्क, लायसन्सी, अग्रहक्क असा अथवा तत्सम प्रकारचा अन्य काही हक्क, वाद, दावा वा हितसंबंध असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ दिवसात कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर हरकत नोंदवावी. वरील मुदतीत जर कोणी हरकत नोंदवली नाही तर सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहीत आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल ठरावाप्रमाणे विद्यमान मालकांसोबत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर मात्र कोणाचीही कसलीही तक्रार, हक्क वा हितसंबंध चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे हि जाहीर नोटीस दिली. दिनांक १७/१२/२०२४

**सही/-**
**ॲड उपेंद्र ह. सुमंत**
**(नोटरी भारत सरकार)**
**कसबा पेठ, वैराग ता. बार्शी**
**मो. नं. ९४२३३३२७५८**
**अशिल श्री. विनय चंद्रकांत गोवर्धन**
**तर्फे ॲडव्होकेट**

## जाहीर प्रसिध्दीकरण

## तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात

**अक्षय परमेश्वर यशवद** - **अर्जदार**
रा. असू ता. परंडा जि. धाराशिव विरुध्द
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत अंबाड** - **सामनेवाला**
**ता. माढा जि. सोलापूर**

ज्याअर्थी अर्जदार याने त्यांचे स्वतः अक्षय परमेश्वर यशयद यांचा जन्म दिनाक ०१/०१/२००० रोजी अंबाड ता. माढा येथे झालेला आहे परंतु त्याचा जन्माची नोंद पुर्वीचे ग्रामपंचायत/न.पा. अंबाड येथे केलेली नसलेने अर्जदार यांनी ग्रामपंचायत/न.पा अंबाड येथील रजिस्टरला नोंदवून तसा दाखल मिळणेकमी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्याचे स्वतः अक्षय परमेश्वर यशवद यांचे जन्म घटणेची नोंद धरणे कामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास पुढील नेमलेली तारीख १७/०१/२०२५ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय माढा येथे मांडावी सदर मुदतीत कुठलीही हरकत तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांना वरीलप्रमाणे यांचे जन्म दिनांक ०१/०१/२००० रोजीचे जन्म नोंद धरुन तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल तदनंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही यांनी नोंद घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक १३/१२/२०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली.

**तहसिल कार्यालय माढा**
**क्र. २०२४/कुका (जन्म नोंद)**
**एसआर/ १९० / २०२४**
**दिनांक २२/१०/२०२४**

(शिक्का)

**सही/-**
**तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी**
**दंडाधिकारी माढा**

## जाहीर प्रसिध्दीकरण

## तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात

**पदमीनी परमेश्वर यशवद** - **अर्जदार**
रा. असू ता. परंडा जि. धाराशिव
विरुध्द
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत अंबाड** - **सामनेवाला**
**ता. माढा जि. सोलापूर**

ज्याअर्थी अर्जदार याने त्यांचे स्वतः पदमीन परमेश्वर यशवद यांचा जन्म दिनांक ३१/१२/१९९७ रोजी अंबाड ता. माढा येथे झालेला आहे परंतु त्याचा जन्माची नोंद पुर्वीचे ग्रामपंचायत/न.पा. अंबाड येथे केलेली नसलेने अर्जदार यांनी ग्रामपंचायत/न.पा अंबाड येथील रजिस्टरला नोंदवून तसा दाखल मिळणेकमी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्याचे स्वतः पदमीन परमेश्वर यशवद यांचे जन्म घटणेची नोंद धरणे कामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास पुढील नेमलेली तारीख १७/०१/२०२५ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत / तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांना वरीलप्रमाणे यांचे जन्म दिनांक ३१/१२/१९९७ रोजीचे जन्म नोंद धरुन तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल तदनंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही यांनी नोंद घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक १३/१२/२०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली.

**तहसिल कार्यालय माढा**
**क्र.२०२४/कुका (जन्म नोंद)**
**एसआर/१९१/२०२५**
**दिनांक २२/१०/२०२४**

(शिक्का)

**सही/-**
**तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी**
**दंडाधिकारी माढा**

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः तालुका बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी येथील ग्रामपंचायत हद्दीतील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत गट नं. १८९ याचे क्षेत्रफळ १६२३ चौ.फूट याचे मोजमाप पूर्व पश्चिम- ६६ फूट व उत्तर दक्षिण- २४६ फूट यासी चतु:सिमा- पूर्वेस- ग्रामपंचायत रस्ता, दक्षिणेस- भगवान बसाटे, पश्चिमेस- द्रोणाचार्य बारंगुळे व उत्तरेस- मच्छिंद्र बसाटे. येणेप्रमाणे मिळकत आतील सर्व तदंगभूत वस्तूसह तसेच मौजे नागोबाचीवाडी, ता. बार्शी येथील जमीन गट नं. २५४/१ याचे क्षेत्र हे. ००-२४ आर आकार रु. ००.१२ पैसे अशा वर्णनाची जमिनी आतील सर्व तदंगभूत वस्तुसह.

येणेप्रमाणे वरील वर्णनाची जमीन व ग्रामपंचायत मिळकत ही आमचे अशिल लक्ष्मी गोरख बसाटे, रा. नागोबाचीवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची आहे.सदरील मिळकतीपैकी ग्रामपंचायत मिळकतीचे उताऱ्यास व जमीन गट नं. २५४/१ या जमिनीस पोकळ स्वरुपात मनिषा अनंत साळुंखे यांचे नाव लागलेले असून मनिषा अनंत साळुंखे हे सुभाषनगर, बार्शी, जि. सोलापूर येथे राहण्यास आहेत. सदरच्या मिळकती हया वडिलोपार्जित मिळकत आहेत. तसेच सदर मिळकतीचे अद्यापपावेतो कधीही सरसनिरस मानाने अथवा इतर कोणत्याही कसल्याही पद्धतीने वाटप झालेले ाही. सदरचे संपूर्ण क्षेत्र हे सामाईकच आहे. असे असताना यातील मनिषा अनंत साळुंखे या आमचे अशिलाच्या अपरोक्ष तिचे पोकळ स्वरुपी नावे असलेचा गैरफायदा घेवून सदरची मिळकतीची विक्री अथवा इतर कोणत्याही बेकायदेशीर मार्गाने सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्नात आहे. याची खात्रीशीर माहिती आमचे अशिलास समजलेली आहे.

तरी वरील वर्णन केलेल्या मौजे नागोबाचीवाडी, ता. बार्शी येथील ग्रामपंचायत मिळकत नं. १८९ व गट नं. २५४/१ मधील जमिनीबाबत मनिषा अनंत साळुंखे यांच्याशी कोणीही, कसलाही खरेदीखताचा, साठेखताचा, गहाण खत, दानपत्र, भाडेपट्टा, करारपत्र, साठेखत, अर्जबोजे इत्यादी किंवा अन्य कसलाही व्यवहार करु नयेत. जर का व्यवहार केलेस, सदरचे व्यवहार हे बेकायदेशीर ठरतील व ते व्यवहार आमचे अशिलाचे हिश्यावर बंधनकारक राहणार नाहीत. तसेच जर इतर त्रयस्थ व्यक्तींनी व्यवहार केलेस आमचे अशिल हे मनिषा अनंत साळुंखे व इतर लोकांवर योग्य ती फौजदारी व दिवाणी कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस. दिनांक : १६/१२/२०२४

सही/-
**श्री. एस.एस. ठोंबरे, ॲडव्होकेट,**
रा. सुयश निवास, फुले प्लॉट, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९३७११६२४२५
(अशिल लक्ष्मी गोरख बसाटे तर्फे ॲड.)

Yashoda Shikshan Prasarak Mandal's

**Sojar College of Pharmacy, Khandvi.**

Tal: Barshi, Dist: Solapur. (MS) 413401 Ph: 02184-297000

**ADMISSION NOTICE: 2024-25**

Application are invited from the eligible candidates for

**FIRST YEAR B. PHARMACY**

Admission for the academic year 2024-25 for probable Vacancies after CAP rounds and Institute Level quota Detail schedule of admission process is displayed on college notice board & college website.

**CONTACT**

**Sojar College of Pharmacy, Khandvi,**

PH: (02184) 297000, Mo. 9604397996 / 9420702085 / 9923332316

**E-mail: sojarcop@gmail.com**

**Web Site: www.sojarcop.edu.in**

**PRINCIPAL** **PRESIDENT**

## ग्रामपंचायत विठ्ठलवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत विठ्ठलवाडी ता.माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

### लेखाशिष

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जि.प. शाळा पेव्हिंग ब्लॉक बसविणे | १,००,०००/- | - | १००/- | ३ महिने | खुला |
| २ | जि.प. शाळा पत्राशेड करणे | १,००,०००/- | - | १००/- | | |
| ३ | जि.प. शाळा इतर दुरुस्ती करणे (रॅम्प दुरुस्ती) | ३०,०००/- | - | १००/- | | |
| ४ | खोंडेकर गल्ली गटार करणे | १,८०,०००/- | ० | २००/- | | |

**टीप - १** कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी १७/१२/२०२४ सकाळी ११ पासून **२** भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक २३/१२/२०२४ पर्यंत सकाळी १० ते ५.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय विठ्ठलवाडी **३** निविदा उघडण्याचा दिनांक २४/१२/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता **४** निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील. **५** निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/- ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत विठ्ठलवाडी**
**ता. माढा, जि. सोलापूर**

**सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत विठ्ठलवाडी**
**ता. माढा, जि. सोलापूर**

## महाळुंग श्रीपुर नगरपंचायत, महाळुंग श्रीपुर

### फेर निविदा

**जा.क्र ७३/२०२४** **दिनांक १६/१२/२०२४**

या जाहीर निविदा सूचनेद्वारे सर्व पुरवठादार यांना कळविण्यात येते की, महाळुंग नगरपंचायतीच्या विविध विभागाकरिता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता निविदा मागविण्यात येत आहेत. पुढीलप्रमाणे सविस्तर बाबनिहाय माहिती व निविदा नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. १७/१२/२०२४ ते दि. २४/१२/२०२४ रोजी सायं. ०५:०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील तपशीलप्रमाणे बयाणा रक्कम भरलेल्या निविदा बंद लिफाफा पद्धतीत नगरपंचायत कार्यालयात दि. १७/१२/२०२४ ते दि. २४/१२/२०२४ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील मुदतीनंतर आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत एक व कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेंचा अधिकार नगरपंचायतीकडून राखून ठेवण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | तपशील | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फि |
|---|---|---|---|
| | **वार्षिक फेर निविदा** | | |
| १ | महाळुंग श्रीपुर नगरपंचायतच्या विविध विकास कामासाठी JCB पुरवठा करणे, | २,०००/- | १,०००/- |
| २ | न.पं. कार्यालयासाठी दप्तर छपाई करणे, | २,०००/- | १,०००/- |
| ३ | डिजीटल फ्लेक्स बोर्ड, पोस्टर बैनर, प्रिंटींग चिटकवणे, लावणे इ. पुरवठा करणे. | २,०००/- | १,०००/- |
| ४ | संगणक विभागाकरिता सर्व साहित्य पुरवठा करणे व दुरुस्ती करणे. | २,०००/- | १,०००/- |
| ५ | सांस्कृतिक कार्यक्रमासाठी हार व पुष्पगुच्छ व इतर लागणारे साहित्य पुरवठा करणे. | २,०००/- | १,०००/- |
| ६ | न.प. विविध कार्यक्रमासाठी मंडप, स्टेज, स्पीकर, खुर्च्या इ पुरवठा करणे. | २,०००/- | १,०००/- |

निविदा कालावधी करार केलेपासून एक वर्ष राहील, निविदेतील अटी व शर्तीत कोणताही बदल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांना राहील,

**टीप - अ) लिफाफा क्र.१ मध्ये** पुढील कागदपत्रे जोडावीत. **१)** बयाणा रक्कम भरलेची पावती. **२)** तांत्रिक व आर्थिक क्षमता सिद्ध करणारी कागदपत्रे. **३)** अनुभव पात्रता सिद्ध करणारी कागदपत्रे. **४)** निविदाधारकाच्या वतीने कोणास प्राधिकृत केले असल्यास त्याबाबतचे कुलमुखत्यार पत्र किवा अधिकर्ता अधिकृत असलेचा पुरावा. **५)** संविधेमध्ये पदाधिकाऱ्यांचा सहभाग नसलेचे प्रतिज्ञापत्र. **६)** पॅनकार्डची साक्षांकीत झेरॉक्स प्रत. **७) लिफाफा क्र.२ मध्ये** अक्षरी व अंकात नमूद केलेले दर व योग्य पद्धतीने निविदाधारकाने नमुद केलेप्रमाणे साक्षांकीत केलेल्या मुळ प्रतितील निविदा दर पत्रक द्यावे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**महाळुंग श्रीपूर नगरपंचायत**

## जाहीर प्रकटीकरण

**दि. कि. अर्ज नं. ७८/२०२३ नि.नं. ५**
पुढील नेमलेली तारीख ०४/०१/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्ही. सो. यांचे कोर्टात**
**(मा. जी.एस. पाटील सो.)**

**१) राजेसाहेब केशवराव पाटील,** वय ८६ वर्षे, धंदा- शेती, रा. भोयरे, ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) सौ. कौशल्या राजेसाहेब पाटील,** वय ८६ वर्षे, धंदा- शेती, रा. भोयरे, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणीही नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा कै. युवराज राजेसाहेब पाटील हे दिनांक ३०/०७/२०१४ रोजी मयत झालेले असून यातील अर्जदार ही त्यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. मयत कै. युवराज राजेसाहेब पाटील यांना अर्जदार यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर व जवळचे वारस नाहीत. तसेच यातील अर्जदार यांना त्यांचे मुलांचे पश्चात शासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्याबाबत शासकीय अधिकारी यांनी अर्जदार यांना कै. युवराज राजेसाहेब पाटील यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र आणण्यास सांगितले. त्या कारणाने अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत कै. युवराज राजेसाहेब पाटील यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क, हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रकटीकरणापासून ३० दिवसांचे आत किंवा नेमली तारीख ०४/०१/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावी. मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे, हे जाहीर प्रकटीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे.
तारीख : ०६/१२/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर प्रसिद्धीकरण

**रे. मु. नं. ५९५/२०२४ नि.नं. ०७**
पुढील नेमलेली तारीख ०९/०१/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्ही. सो. यांचे कोर्टात**

**श्री. परमेश्वर गोकुळ सुरवसे,** वय ३१ वर्षे, धंदा- खाजगी नोकरी, रा. मु. खडकलगांव, पो. मांडेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर — **वादी**

**- विरुद्ध -**

**गोकुळ व्यंकट सुरवसे,** वय ५५ वर्षे, धंदा- काही नाही, रा. बेपत्ता — **प्रतिवादी**

ज्याअर्थी, यातील वादी यांनी त्यांचे वडील म्हणजेच यातील प्रतिवादी गोकुळ व्यंकट सुरवसे हे दिनांक ०१/०७/२०१३ पासून बेपत्ता असल्याने व त्याचा शोध घेवूनही आढळून येत नसल्याने प्रतिवादी प्रतिवादी गोकुळ व्यंकट सुरवसे हे कायद्याने मयत (Civil Death) झाला आहे असे जाहीर होवून मिळणेकामी या मे. कोर्टात दावा दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, यातील वादीचे वडील प्रतिवादी गोकुळ व्यंकट सुरवसे हे हयात असल्याबाबत कोणालाही काही माहिती असल्यास दिनांक ०९/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. या वेळेत पुराव्यासह उपस्थित रहावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वादी यांना त्यांचे वडील प्रतिवादी प्रतिवादी गोकुळ व्यंकट सुरवसे हे दिवाणी मयत असल्याचा दाखला देण्यात येईल करीता हे जाहीर प्रसिद्धीकरणा दिले असे.
तारीख : १६/१२/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

# तुकाराम वेर्णेकर यांचे निधन



**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**
दक्षिण कसबा येथील तुकाराम विठ्ठल वेर्णेकर यांचे रविवार (दि.१५)रोजी आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक सून, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रूपा भवानी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

अुत्तम सेवा — मंगळवार दि. १७ डिसेंबर २०२४ — **नोकरीच्या शोधात**

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **जनता सहकारी बँक लि. सोलापूर** ट्रेनी क्लार्क | पदवी (५०%) गुणांसह उत्तीर्ण असावे व संगणक साक्षरता आवश्यक | ३५ पर्यंत | ३१/१२/२४ |
| २) | **दि. न्यू इंडिया एश्योरन्स कं. लि. मुंबई** सहाय्यक (५०० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | ०१/०१/२५ |
| ३) | **राष्ट्रीय संरक्षण व नौदल अकॅडमी** NDA & NA (४०६ पदे) | **NDA** बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | १९ पर्यंत | ३१/१२/२४ |
| ४) | **संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा, CDS** CDS-I 2025 (४५७ पदे) | पदवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | ३१/१२/२४ |
| ५) | **नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ वायरॉलॉजी, पुणे (ॲप्रेंटिस करण्याकरीता)** ॲप्रेंटिस (३१ पदे) | ITI (इले/प्लंबर/ए.सी./पासा/मोटार/कार्पेंटर/आय.टी.) उत्तीर्ण असावे | -- | २६/१२/२४ |
| ६) | **समाजकल्याण आयुक्तालय, पुणे** | **(मुदतवाढ)** | | |
| | १) अधीक्षक- महिला (९२ पदे) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | ३१/१२/२४ |
| | २) अधीक्षक- सर्वसाधारण (६१) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ३) समाजकल्याण निरीक्षक (३९) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ४) वरिष्ठ निरीक्षक (०५ पदे) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ५) लघुलेखक (२२ पदे) | दहावी व टायपिंग-स्टेनो उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| ७) | **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं.** १) तंत्रज्ञ - ३ (८०० पदे) | MAHAGENCO ITI (इले/ वायरमन/मशिनिस्ट/फिटर/इलेक्ट्रॉ/ आय.टी./वेल्डर/इन्स्टू/बॉयलर/स्विचबोर्ड/पॉवर) उत्तीर्ण | ३८ पर्यंत | २६/१२/२४ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌अ‍ॅपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌अ‍ॅप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ८) | **भारतीय सर्वोच्च न्यायालय, SCI** | | | |
| | १) पर्सनल असिस्टंट (३३ पदे) | पदवी व इंग्रजी शॉर्ट हॅन्ड व टायपिंग | ३० पर्यंत | २५/१२/२४ |
| | २) सिनिअर पर्सनल असि(४३ पदे) | पदवी व इंग्रजी शॉर्ट हॅन्ड व टायपिंग | ३० पर्यंत | |
| ९) | **बृहन्मुंबई महानगरपालिका, BMC** | **(मुदतवाढ)** | | |
| | १) कनिष्ठ अभियंता(३८० पदे) | दहावी उत्तीर्ण व डिप्लोमा (सिव्हील/इलेक्ट्रॉ/ऑटो/प्रोडा/इले. पॉवर/इनस्ट्रू/इलेक्ट्रॉ अॅन्ड टेली) व MSCIT | ३८ पर्यंत | ३१/१२/२४ |
| | २) दुय्यम अभियंता (३१० पदे) | B.E (सिव्हील/इलेक्ट्रॉ/ऑटो/प्रोडा/इले. पॉवर) व MSCIT उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| १०) | **बॉम्बे मर्कंटाईल को. ऑप बँक** | | | |
| | १) प्रोबेशनरी ऑफिसर (६० पदे) | पदवी (५०%) गुणासह उत्तीर्ण असावे | ३५ पर्यंत | २५/१२/२४ |
| | २) ज्यु. एक्झिकेटीव्ह असि. (७५ पदे) | पदवी (५०%) गुणासह उत्तीर्ण असावे | | |
| ११) | **बॉर्डर सिक्युरिटी फोर्स BSF** कॉन्स्टेबल GD (२७५ पदे) | **(फक्त खेळाडूसाठी भरती)** पदवी व संबंधित क्रिडा पात्रता | २३ पर्यंत | ३०/१२/२४ |
| १२) | **भारतीय तटरक्षक दल** | | | |
| | असि. कमांडंट GD (११० पदे) | बारावी (गणित/फिजिक्स) व पदवी | २५ पर्यंत | ३०/१२/२४ |
| | असि. कमांडंट टेक्नि (३० पदे) | BE (मेकॅ/मरिन/मेटा/ॲरो/इले/इलेक्ट्रॉ/ टेली/इन्स्ट्रू/पॉवर) उत्तीर्ण | २५ पर्यंत | |
| १३) | **राष्ट्रीय पात्रता परिक्षा, NET** सहा. प्राध्यापक | पदव्युत्तर पदवी (५५%) किंवा ॲपिअर | -- | १०/१२/२४ |
| १४) | **एअरपोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडिया,** सिक्युरिटी स्क्रीनर्स (२७४ पदे) | **AAI** पदवी (६०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | २७ पर्यंत | १०/१२/२४ |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा — १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. — www.uttamseva.org

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. १९६/२०२४**

**१) संतोष मधुकर जगदाळे,,**
रा. घारी, ता. बार्शी, जि. सोलापूर
असल्यास, तर्फे वकील रुपाली डी. तारके) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत, घारी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे आजोबा रा. घारी ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे घारी, ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २१ जानेवारी २००९ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांचे आजोबा यांचा दिनांक २१ जानेवारी २००९ रोजी मौजे घारी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २५ जून २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## हिवाळ्यात घ्या त्वचेची काळजी



मी गेल्या १८ वर्षांपासून ब्युटी पार्लर या व्यवसायात आहे. त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रात देखील माझे योगदान असून संघटनामध्ये पदाधिकारी म्हणून देखील काम करते आहे. हिवाळ्यात महिला, मुली व मुलांनी, पुरुषांनी सर्वांनीच आपल्या स्किनची काळजी घ्यायला हवी. हिवाळ्यात त्वचा कोरडी पडते, काळवंडते, निस्तेज होते. त्वचा मऊ चकचकीत होण्यासाठी या गोष्टी नियमित कराव्यात.

✻ पाणी भरपूर प्यावे. ✻ जास्त गरम पदार्थ खाऊ नयेत.

✻ साबणा ऐवजी फेसवॉशचा वापर करावा.

✻ रोज रात्री झोपण्यापूर्वी कोणत्याही चांगल्या कंपनीचे मॉश्चराझर चा वापर करावा.

✻ त्वचा खूप ड्राय झालेली असेल तर हायड्रेटींग सिरमचा वापर करावा.

✻ बदाम तेलाचा वापर करून मसाज करावा.

✻ कोरफडचा ही वापर अंघोळ झाल्यावर करावा.

✻ दोन चमचे कोरफडचा गर, अर्धा चमचा हळद मिक्स करून चेहरा हात पायांना मसाज करावा किंवा कापसाने लावला तरी चालतो.

✻ स्किन ग्लो करण्यातसाठी ग्लिसरीन असलेले क्रिम प्रोडक्ट वापरावे.

✻ थंडीमध्ये ओठ खूप ड्राय पडतात. त्यासाठी पीठी साखर व मध यांच्याने हलक्या हाताने ओठांवर मसाज करावा.

✻ जास्त उन्हात थांबू नये.



**- माधुरी डहाळे**
माधुरीज् ब्युटी पार्लर, मेकअप आर्टिस्ट
अर्जुन टॉवर, विजापूर रोड

# सकस आहाराचे सेवन करा... त्वचा खुलवा



सोलापूर शहर परिसरात कडाक्याची थंडी पडली असून थंडीमध्ये त्वचा कोरडी पडणे, काळी पडणे अर्थात त्वचेवर टॅन येणे हे प्रकार सर्रास होतात. त्यामुळे थंडीच्या दिवसांमध्ये आपल्या त्वचेची आणि मेकअपची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. त्वचा व्यवस्थित मॉईस्चराईज करणे, तसेच दिवसभर पाणी पिणे, आहाराचे योग्य सेवन करणे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्वचेची निगा राखण्यासाठी आपण अनेक गोष्टी करत असतो. त्यामुळे त्वचेला थंडीच्या दिवसातही पोषण मिळावं आणि त्वचा तजेलदार आणि चमकदार दिसावी यासाठी आपला प्रयत्न चालू असतो. उन्हाळ्याच्या दिवसात चेहऱ्यावर मेकअप राहात नाही आणि थंडीच्या दिवसात मेकअपमुळे त्वचा अधिक कोरडी पडण्याची समस्या असते. आपल्याकडे प्रत्येकाची त्वचा वेगळी असते. त्यामुळे संवेदनशील, कोरडी, कॉम्बिनेशन त्वचा या सगळ्या त्वचेची नक्की कोणत्या प्रकारे थंडीच्या दिवसात काळजी घ्यायला हवी. याच्या काही बेस्ट मेकअप टिप्स सोलापुरातील ब्युटीशियन दिल्या आहेत. शहरातील बहुतांश पार्लमध्ये सध्या ब्राईडसाठी ३० टक्के डिस्काऊंट देत आहेत.

## हिवाळ्यात त्वचेची काळजी घेण्यासाठी घरगुती उपाय



मॉइश्चरायझर वापरा. ज्यामधे शिया बटर, कोकोआ बटर, एलोवरा असलेली क्रीम. मुलायम ओठांसाठी लिप बाम वापरा ज्यामध्ये शिया बटर किंवा कोकोआ बटर आहे. तसेच गोड तेल (गुलाबाच्या पाकळ्यांसह) लावून ओठांना नरम ठेवा. आहारात वीटॅमिन ई आणि सी चे म्हणजेच संत्री, आवळा, बदाम, काजू याचे सेवन करावे.

**ब्राइडल ग्लोसाठी**

हळद, दही, आणि मध यांचे मिश्रण चेहऱ्यावर लावून १५ मिनिटे ठेवा. नंतर धुवा. केशर दुधात भिजवून चेहऱ्यावर लावा. मध आणि लिंबू त्वचेला नजेलदार ठेवण्यासाठी हा उपाय प्रभाती आहे. व्हिटॅमिन सी बेस्क सीरंग लावा. रात्री हलका मॉइश्चरायझर आणि एंटी-एजिंग क्रीम वापरा. वधूच्या त्वचेसाठी लग्नाच्या आधी एक महिना प्री- ब्राइडल स्किन केअर ट्रीटमेंट घ्या. त्वचेवर कोणतेही नवीन उत्पादन वापरण्यापूर्वी त्याची चाचणी करा. अधिक मेकअप टाळा आणि त्वचेचा नैसर्गिक तजेला टिकवून ठेवा.



**- पद्मावती राऊत,**
हेअर स्पा ॲण्ड मेकअप आर्टिस्ट
रूपम ब्युटी लेडीज पार्लर
मंत्री चंडक विहार, होटगी रोड, बालाजी सरोवर .

# हिवाळी लग्नसराई; नववधूंसाठी सेलिब्रिटी ब्रायडल मेकअप



### हिवाळ्यात मेकअपचे महत्त्व

हिवाळ्यामध्ये त्वचा अधिक कोरडी होते. त्यामुळे तुम्ही तुमची त्वचा मॉईस्चराईज करणे गरजेचे आहे. मेकअपमुळे तुमच्या चेहऱ्यावरील कोरडेपणा दूर व्हायला मदत होते. तसेच तुम्ही आठवड्यातून किमान दोन वेळा तरी तुमचा चेहरा स्क्रब करणे आवश्यक आहे. ज्यामुळे तुमच्या चेहऱ्यावरील चमकदारपणा टिकून राहण्यास मदत होते. तुमची त्वचा अधिक मऊ आणि मुलायम करण्यासाठी तुम्ही हिवाळ्यात तुमच्या त्वचेला सूट होईल असा मेकअप करायला हवा. अर्थात त्यासाठी तुम्हाला हेव्ही मेकअप करायची अजिबातच गरज नाही. तुम्ही अगदी नियमित त्वचा मॉईस्चराईज करून लिप बाम लावलात तरीही तुमची त्वचा तजेलदार राहण्यास नक्कीच मदत होते.

हिवाळी लग्नसराई सुरू झाली आहे. वधूला नटवण्यासाठी लग्नात मोठा तामझाम असतो. तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी प्री-वेडिंग फोटोशूट अगोदरपासूनच तयारी सुरू होते. पूर्वी केवळ पार्लरला जाऊन आले की झाले असे होत होते. पण आता मेकअप ही हायक्लास झाला आहे. मेकअप आर्टिस्ट आता स्वत: नवरीला सजवत आहेत. आता लग्नाचा ट्रेंड बदलत आहे. त्याप्रमाणे मेकअप सुद्धा बदलत आहे. बॉलिवूड, हॉलिवूड पद्धतीने मेकअपचा नवीन ट्रेंड येत आहे. सर्वात लोकप्रिय वधू मेकअप आणि केसांचे ट्रेंडची मागणी ग्राहक करत आहेत.

### ग्राफिक लाइनर आणि ग्लिटरी शेड

या मोसमात हिवाळ्यातील नववधूंसाठी ठळक आणि तेजस्वी डोळ्यांच्या मेकअपसह लूक प्ले केला जाऊ शकतो. 'गो बिग अँड गो होम' हा या मोसमातील सौंदर्य मंत्र आहे. दोलायमान रंग, ग्राफिक लाइनर. याशिवाय मेकअप कमीत कमी आणि न्यूट्रल ठेवून लूक संतुलित करा.

### कर्टन बँग्स

या हंगामात लग्नाच्या केसांचा सर्वात लोकप्रिय ट्रेंड म्हणजे कर्टेन बँग्स. तो म्हणतो, कर्टेन बँग्स ही हृदयाच्या आकाराच्या चेहऱ्यासाठी किंवा अंडाकृती चेहऱ्याच्या नववधूंसाठी योग्य हेअरस्टाईल आहे. याशिवाय वधूने आपल्या त्वचेची निगा आणि केसांची काळजी घ्यावी. यासाठी चांगला आहार घ्या आणि झोपही घ्यावी असेही सोलापुरातील मेकअप आर्टिस्ट नी सांगितले.

### रेड लीपस्टीकचा ट्रेंड जास्त

या हिवाळ्यात क्लासिक लिप रेड हा परफेक्ट ब्राइडल मेकअप ट्रेंड जास्त आहे. रेड शेड एव्हरग्रीन असल्याने तुमचा लुकही बदलेल. लाल रंगाव्यतिरिक्त, तुम्ही स्टोनी गार्नेट, मॅट कार्माइन आणि कोरल सारख्या शेड्सनाही जागा द्यावी.

### अंबाडा

हेअरस्टाईलबद्दल बोलायचे तर, अंबाडा या लग्नाच्या सीझनमध्ये एक क्लासिक लूक देईल , जो वेगळा लूक देण्यासाठी सज्ज आहे. यावेळी अंबाडा असलेला ऑफ शोल्डर ड्रेस किंवा ब्लाउज वापरून पहा. आपण खांद्यावर ग्लिटर वापरू शकता.

संकलन - **आरती कुसेकर**

## असे करा... केसाचे सौंदर्य वाढवा



केससंभारामुळे महिलांच्या सौंदर्यामध्ये भर पडते. केसांना आपल्या हव्या तशा पद्धतीने आकार देऊन त्याचा रुबाब वाढवता येतो. यासाठी अनेक आर्टिस्ट काम करतात. घरीसुद्धा आपण केसांचे सौंदर्य खुलवू आणि फुलवू शकतो. त्यासाठी विविध कौशल्याचा वापर करावा लागेल.

✻ **केसांचे आरोग्य:** हेअर स्पा केसांना मुळापासून टोकापर्यंत पोषण देऊ शकते, जे नुकसान, पातळ होणे आणि केस गळणे टाळण्यास मदत करू शकते. ते खराब झालेले केस दुरुस्त करण्यात, हरवलेला ओलावा आणि पोषक तत्वे पुन्हा भरून काढण्यात आणि स्टाइलिंग, रंग आणि रासायनिक नुकसानापासून पुनर्प्राप्त करण्यात मदत करू शकतात.

✻ **स्कॅल्पचे आरोग्य :** हेअर स्पा निरोगी केसांची वाढ सुलभ करण्यासाठी छिद्रे बंद करण्यात मदत करू शकतात. ते तुमच्या टाळूवरील नैसर्गिक तेलांचे प्रमाण नियंत्रित करण्यात देखील मदत करू शकतात, ज्यामुळे तुमचे केस मऊ, गुळगुळीत आणि पोषणयुक्त दिसू शकतात.

✻ **तणावमुक्ती :** टाळूवर मालिश केल्याने तुमचे शरीर आणि मन आराम होऊ शकते.

✻ **केसांचा पोत:** हेअर स्पा केसांचा पोत सुधारू शकतो, ते मऊ आणि नितळ बनवू शकतो.

✻ **कोंडा कमी करणे :** हेअर स्पा तुमच्या टाळू आणि केसांमधील फ्लेक्स काढून कोंडा कमी करण्यात मदत करू शकतात.

✻ **स्प्लिट एंड्स :** हेअर स्पा सुकलेल्या स्ट्रेंड्सवर उपचार करून स्प्लिट एंड्स कमी करण्यात मदत करू शकतात स्नेहा गायकवाड



**- स्नेहा गायकवाड**
- मेकअप आर्टिस्ट, एसजी ब्युटी केअर आणि सलोन
अमोल नगर, रामवाडी हॉस्पिटल जवळ.

## हेड मसाजने रक्तदाबाची पातळी नियंत्रित



उच्च रक्तदाब सारख्या परिस्थितीमुळे आरोग्यास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. दररोज मसाज हा उच्च रक्तदाब शांत करण्यास एक चांगला मार्ग आहे. हेड मसाज केल्याने मन शांत होते व आपल्या रक्तदाबाची पातळी देखील नियंत्रण होते स्मरणशक्ती वाढते, हेड मसाज केल्याने आपली एकग्रता पातळी मोठ्या प्रमाणात सुधारण्यास मदत होते. हेड मसाजमुळे स्मरणशक्ती वाढते आणि मेंदूचे एकूण कार्य सुधारते असे म्हटले जाते डोक्याची मालिश केल्याने रक्तप्रवाह वाढण्यास मदत होते. तणाव कमी होतो. रोजचा हेड मसाज मानसिक आरोग्य वाढण्यास मदत करते दुसऱ्याने हेड मसाज करून दिल्यास आपल्याला आराम वाटतो आणि तणाव कमी होतो.



**- सरस्वती प्रबाळकर**
तृप्ती ब्युटी पार्लर,
अरुणा अपारमेंट श्री खंडोबा मंदिर जवळ
खडक गल्ली सोलापूर बाळे

### ● थंडीत चेहऱ्याला काय लावावे

**पेट्रोलियम जेलीमध्ये अधिक प्रमाणात तेल असतं. त्यामुळे तेलकट त्वचा असणाऱ्यांनी चेहऱ्याला अथवा ओठांना पेट्रोलियम जेली हिवाळ्यात लावणे टाळा. तुमचे ओठ ओलसर ठेवण्यासाठी अर्थात कोरडे न पडू देण्यासाठी तुम्ही हर्बल लिप बाम्सचा अथवा मेडिकेटेड लिप बाम्सचा वापर करा. त्यामुळे तुमचे ओठ कोरडेदेखील पडणार नाहीत आणि काळे देखील पडणार नाहीत.**

### ● फाऊंडेशनपूर्वी वापरा टोनर

**तुमची त्वचा मऊ आणि चांगली राहण्यासाठी मेकअप करताना फाऊंडेशनपूर्वी टोनर लावायला विसरू नका. टोनर तुमच्या त्वचेवरील कोरडेपणा कमी करण्यास फायदेशीर ठरतो. तर फाऊंडेशन तुमच्या त्वचेला अधिक कोरडं करतं. त्यामुळे त्वचा टोन करून मगच तुम्ही मेकअपसाठी फाऊंडेशनचा वापर करा. त्याने त्वचा अधिक चांगली राहण्यास मदत होते.**

### ● पावडरऐवजी वापरा क्रिम

**हिवाळ्यात त्वचा कोरडी राहिल्याने कोरड्या त्वचेच्या व्यक्तींच्या चेहऱ्यावर पाडवर लावल्यास, ती फुटते. त्यामुळे चेहरा अधिक खराब दिसतो. त्यामुळे तुम्ही त्वचेवर हिवाळ्याच्या दिवसात पावडरऐवजी सहसा क्रिमचा वापर केल्यास, चेहरा अधिक तजेलदार दिसण्यासाठी मदत मिळते.**

### ● चेहरा नीट क्लिंन्झ करा

**हिवाळा असो अथवा कोणताही ऋतू असू दे तुम्हाला तुमचा चेहरा व्यवस्थित क्लिंन्झ करणं गरजेचं आहे. यामध्ये इतकी माती अथवा प्रदूषणाने धूळ साचते की, तुम्हाला वेळोवेळी चेहऱ्याची काळजी घेण्यासाठी चेहरा नीट क्लिंन्झ करायला हवा. त्यासाठी तुम्ही चांगल्या कंपनीचं क्लिन्झर वापरा.**

### ● पाणी जास्त प्या

**उन्हाळ्यातच पाणी प्यायचं आणि हिवाळ्यात प्यायचं नाही असं अनेकांना वाटतं. हिवाळ्यात जरी तहान जास्त लागत नसली तरीही शरीराला तितक्याच पाण्याची आवश्यकता असते हे लक्षात ठेवा. त्यामुळे स्वत:ला हायड्रेट ठेवण्यासाठी हिवाळ्यातही तुम्ही किमान तुमच्या शरीराला आवश्यक असेल तितकं आठ ग्लास पाणी पिण्याची गरज आहे. पाणी जास्त प्यायल्याने त्वचा कोरडी पडत नाही. तुमच्या शरीराला आवश्यक ते पोषण मिळून त्वचा तजेलदार राहण्यास मदत होते.**

# थंडीमध्ये केसांची योग्य काळजी घेणे आवश्यक

केस गळणे ही अनेकांमध्ये आढळणारी समस्या आहे. केस अनेक कारणांनी गळू शकतात. काही पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे केस गळू शकतात, तसेच हार्मोन्सच्या असंतुलनामुळे ही केस गळतात. अनुवंशिक कारणांमुळे तसेच काही जनुकीय घटकांमधील बदलांमुळेही केस गळण्याची समस्या उद्भवते. मानसिक ताणामुळे केस गळतात. तसेच ज्या केशरचनांमध्ये केस ओढले जातात अथवा त्यांच्यावर ताण पडतो, अशा केशरचना वारंवार केल्यास केस गळू शकतात. केसांवर लावण्यासाठी रासायनिक पदार्थांचा अती वापर केल्यास केस गळू लागतात. केस गळणे हा एखादे औषध किंवा उपचार पद्धतीचा परिणाम देखील असू शकतो. वातावरणातील बदल, जसेकी ऋतू आणि त्यानुसार बदलणारे तापमान आणि हवेतील आर्द्रता ह्यांचाही केसांवर परिणाम होत असतो आणि प्रदूषणाचाही केसांवर विपरीत परिणाम होतो, ज्यामुळे केस गळू शकतात. तापमान कमी झाल्याने आणि हवेतील आर्द्रता कमी झाल्याने, हिवाळ्यात केस गळण्याची समस्या अनेकांमध्ये उद्भवते. हिवाळ्यात डोक्यावरची त्वचा कोरडी पडते, तिथल्या त्वचेला खाज येते, कोंडा होतो आणि अशा समस्यांची परिणती, केस गळण्यात होते. म्हणूनच थंडीमध्ये केसांची व त्वचेची योग्य काळजी घेणे अधिक महत्वाचे ठरते.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### एसबीआय ग्राहक, म्युच्युअल फंड गुंतवणूकदार, भारतीय मित्र परिवाराचे धरणे

**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

भारतीय स्टेट बँकेतून खाजगी कंपन्यांचे कामे बंद व्हावे आणि दोषींवर कायदेशीर कारवाई व्हावी, अन्यथा भारतीय मित्र परिवार व नागरिक भारतीय स्टेट बँकेतील खाते बंद करतील असे आंदोलनकर्ते तर्फे उप जिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांच्याकडे निवेदन दिल्याचे विजयकुमार अंकम यांनी सांगितले. एसबीआय म्युच्युअल फंड हे स्टेट बँकेची असल्याचे सांगत, एसबीआय म्युच्युअल फंड मध्ये काहीही अडचण निर्माण झाल्यास स्टेट बँक ऑफ इंडिया त्याबाबत दायित्व घेईल असे सांगून स्टेट बँक गुंतवणूकदारांची दिशाभूल करीत आहेत. एसबीआय म्युच्युअल फंड कार्यालयाने योजना सुरू करताना सेबीची परवानगी घेतल्याचे नमूद केले आहे. परंतु तसे नाही. तसेच एसबीआय म्युच्युअल फंड कार्यालय भारतीय स्टेट बँक, बाळीवेस शाखा कार्यालयात उपलब्ध असल्याचे महत्त्वाच्या कागदात उल्लेख केलेला होता. परंतु असं नाही. या प्रकारांमुळे भारतीय स्टेट बँकेचा अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होत आहे. कोणी गुंतवणूकदाराने कमिशन, दंड विषयी अधिक विचारल्यास एकतर त्यांचे पैसे परत करायचे किंवा त्यांच्याकडून तक्रार नसल्याचे बनावट पत्र घ्यायचे. येथील स्टेशन रोड शाखा आणि ट्रेझरी शाखेचे तसे केल्याचे पुरावे आहेत. दरम्यान क्षेत्रीय व्यवस्थापक यांनी स्टेट बँक, अक्कलकोट शाखा, जुळे सोलापूर शाखा आणि तडवळ शाखेमध्ये कोणीही म्युच्युअल फंडाचा अधिकृत कर्मचारी नसताना, या शाखांमधून म्युच्यूअल फंडाचा व्यवसाय दाखवण्यात आले आणि त्या शाखांना लाखांमध्ये कमिशन देण्यात आलेला आहे. भारतीय स्टेट बँकेचे चेअरमन दिनेश खारा एसबीआय म्युच्युअल फंड च्या सेल्स मीटिंग ला दुबई येथे हजर होते, या विषयी अनेक वेळा पत्र व्यवहार करुन देखील एसबीआय अद्याप उत्तर देण्यास टाळा-टाळ करीत आहे. म्हणून एसबीआयच्या व्यवहारांच्या बाबतीत अनेक गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत आहे.



### जंगम समाजाच्या वतीने ग्रामदैवत शिवयोगी श्री सिद्धरामेश्वर मंदिर परिसरात वृक्षारोपण

**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

जंगम समाजाचे जिल्हाध्यक्ष मल्लिकार्जुन हिरेमठ यांच्या वाढदिवसानिमित्त श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराज यांनी स्थापना केलेल्या ६८ लिंगांपैकी ३५ वा लिंग उत्तर मुखी बाळवेस व ३४ वा लिंग मुक्तेश्वर चंडक बाग या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. राष्ट्रीय जंगम समाज संघटनाचे १००८ झाडे लावण्याचा संकल्प आहे. शहरातील हॉस्पिटल, शाळा, आश्रम मंदिर आदी ठिकाणी उद्योजक वैजनाथ देवणीकर, महेश बुरांडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी हिरेमठ मित्रपरिवार यांच्या प्रमुख उपस्थिती शिवानंद बाहेरमठ, सोमेश हिरेमठ, मल्लिनाथ नन्ना, बाबुराव बनसोडे, मुकुंद कांबळे, विकी बनसोडे, सुधीर शिरसागर, निलेश मुळे, महिला अध्यक्ष नीता स्वामी, अश्विनी कळलीमठ, दिपाली स्वामी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला.



### परभणी घटनेच्या निषेधार्थ सांगोला बंद

**सांगोला,दि.१६ डिसेंबर-**

दि.१० डिसेंबर रोजी परभणी शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करून विटंबना केल्याच्या निषेधार्थ बौद्ध व बहुजन बांधवांच्या वतीने सोमवार दि.१६ डिसेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्र बंद पुकारण्यात आला होता. या महाराष्ट्र बंदला पाठिंबा देण्यासाठी सांगोला शहर व तालुक्याच्या वतीने सांगोला शहरात स.७ ते दु.२ वाजेपर्यंत सांगोला बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले होते. सांगोला शहर व तालुक्यातील व्यापारी, नागरिकांनी आपले दैनंदिन व्यवहार बंद ठेवून या बंदला पाठिंबा दर्शवला. यावेळी सांगोला शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासह विविध महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन सांगोला तहसील कार्यालय व पोलीस स्टेशनला निवेदन सादर करण्यात आले. सांगोला शहरासह तालुक्यातील विविध गावातून या बंदला चांगला प्रतिसाद मिळाला. या घटनेचा सांगोल्यातील भीमसैनिकांसह बहुजन सामाजिक कार्यकर्त्यांनी तीव्र शब्दात निषेध करण्यात आला व यातील संबंधीतावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. या बंदला शहरातील विविध राजकीय पक्षासह सामाजिक संघटनांनी पाठिंबा दिला. तहसील कार्यालय व पोलीस स्टेशनला निवेदन सादर केल्यानंतर दैनंदिन व्यवहार सुरळीत झाले.

### थंडीमुळे वळसंग परिसरात भरु लागली हुडहुडी अन् पेटू लागल्या शेकोटी

**वळसंग, दि.१६ डिसेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग परिसरात कडक्याची थंडी पडत असल्यामुळे नागरिकांना हुडहुडी भरत आहे. गेल्या दोन दिवसांपासून दुपारी साडेचारनंतरच थंडी वाढत आहे, ही थंडी रात्रभर कुडकुडायला लावत आहे. दुपारी बारापर्यंत थंडीचा जोर असल्याने नागरिक घरातून बाहेर पडण्यास धजावत आहेत. थंडीपासून बचाव करण्यासाठी नागरिक सायंकाळी आणि सकाळच्या सुमारास शेकोट्या पेटवून शेकून घेत आहेत.

# पोलीस, चोरांच्या गाडीचा अपघात; दोघे पोलीस जखमी

## पोलीस अन् चोरट्यांमध्ये रंगला थरार; शेळ्या चोरलेल्या गाडीचा पाठलाग करताना घडली घटना

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १६ डिसेंबर-**

बोंडले (ता. माळशिरस) येथे शेळ्या चोरून नेत असलेल्य गाडीचा पाठलाग करताना पोलीसांची गाडी व चोरट्यांच्या गाडीची जोरदार धडक झाली यामध्ये दोन पोलिस कर्मचारी जखमी झाले.

१६ डिसेंबर २०२४ रोजी रात्री दोनच्या सुमारास पंढरपूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे चालक वाहक पोलीस कॉन्स्टेबल सुनील लोंढे सरकारी वाहनाने (क्र. एम. एच. १३/ डी. वाय. २४४४) पोलीस कॉन्स्टेबल दादासाहेब सूळ यांच्यासमवेत सातारा रोडवर रात्रीची गस्त करत असताना रात्री दोनच्या सुमारास सातारा नाला येथे गादेगाव (ता. पंढरपूर) रस्त्याने जात असताना चारचाकी कार भरधाव वेगाने पोलीस गाडीला पास झाली. दरम्यान समोरून एक मोटरसायकल चालक येऊन त्याने पोलिसांना भरधाव वेगाने गेलेल्या कारमध्ये चार लोकांनी त्यांच्या घराच्या पाठीमागे बांधलेल्या तीन शेळ्या चोरून नेल्याचे सांगितले.

पोलिसांनी गाडी वळवून सदर कारचा सातारा नाला, बाजीराव विहीर तसेच पंढरपूर-पुणे जाणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर पाठलाग चालू केला व चोरांची कार थांबवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करत चोरांचा पाठलाग सुरू केला. सदर कार वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीत घुसताच पंढरपूर पोलिसांनी वेळापूर व अकलूज पोलीस स्टेशनला फोन करून सदर शेळ्या चोरलेली कारबाबत माहिती देऊन कारचा पाठलाग सुरू ठेवला. सदर कार बोंडले येथे



श्री संत तुकाराम महाराज महामार्गावर अपूर्ण असलेल्या कच्च्या रस्त्याने घुसली. कार भरधाव वेगाने असल्याने बोंडले ते श्रीपूर रोडवरील सचिन पाटील यांच्या घराजवळील रोडच्या कडेच्या मातीच्या ढिगाऱ्यावर जाऊन आदळून थांबली व चोरट्यांनी अंधाराचा फायदा घेऊन गाडीच्या लाईट बंद केल्या. त्यानंतर साधारण वीस ते पंचवीस फुटाच्या अंतरावर पोलिसांची गाडी थांबली. पोलिसांनी डिपर लाईट मारून कारचा शोध घेत असताना व पोलीस कॉन्स्टेबल सुळ हे पीए सिस्टीमवरून गाडीतील चोरांना गाडीतून खाली उतरण्याचे आवाहन करीत असतानाच काही क्षणात आरोपींनी पळून जाण्याच्या उद्देशाने कार स्टार्ट करून भरधाव वेगाने रिव्हर्स घेऊन पोलिसांच्या थांबलेल्या गाडीला जोरदार दोनदा धडक दिली. परंतु पाठीमागे कारला वळण्यासाठी जागाच नसल्याने कार जागेवरच थांबली कारने दुसऱ्यांदा जोरदार धडक दिल्याने पोलीस गाडीतील कॉन्स्टेबल दादासाहेब सूळ यांच्या हाताला झटका बसल्याने त्यांचा हात फ्रॅक्चर झाला. चालक पोलीस कॉन्स्टेबल सुनील लोंढे यांनी चोरांना पकडण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांशी झटपट करून लोंढे यांना ढकलून देऊन सर्वजण पळून गेले. त्यानंतर पंढरपूर पोलिसांनी पाहाणी केली असता मातीच्या ढिगाऱ्यासवर चढलेली कार (क्र. एम. एच. १२/ डी. एम. ८०३५) या कारच्या धडकेत कार व पोलीस गाडीचे नुकसान झाले आहे. तपास पोलीस कर्मचारी नितीन बंगाळे हे करीत आहेत.

### दोन शेळ्या जागीच ठार, एक जखमी

**पोलीस कर्मचारी दादासाहेब सुळ व सुनिल लोंढे यांनाही मार लागून जखमी झाले. धडक दिल्याचा जोरदार आवाज झाल्याने लगतचे ग्रामस्थ गोळा झाले. कारची पाहणी केली असता तीन काळ्या रंगाच्या शेळ्यांपैकी दोन शेळ्या कार मध्येच जागीच मरण पावल्या तर एक जखमी झाली. काही वेळातच वेळापूर पोलीस स्टेशनची जिप आल्याने पोलीस कर्मचारी दादासाहेब सूळ व सुनिल लोंढे यांना अकलूज येथील इनामदार हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.**

# महाकुंभमेळ्यासाठी डॉक्टर सरसावले

## अक्कलकोटमध्ये १०० थाली, शंभर थैली पर्यावरण, धार्मिक गतिविधीकडे सुपूर्द

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ डिसेंबर-**

उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये १४४ वर्षांनी होणाऱ्या महाकुंभमेळला सुमारे शंभर देशातून ४० कोटींहून अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. मात्र या भाविकांना जेवण देताना प्लास्टिक व थर्माकोलच्या ताटांचा वापर होणार असल्याने दररोज १ हजार २०० टन कचरा निर्माण होणार आहे. या कचरा मुक्तीसाठी अक्कलकोट शहर व तालुक्यातून प्रचंड प्रतिसाद मिळत असून अक्कलकोट येथील डॉक्टर मंडळानी सुमारे शंभर थाली, शंभर थैली' अक्कलकोट पर्यावरण धार्मिक गतिविधीचे प्रमुख महेश वागदरे यांच्याकडे दिली आहे.

प्रयागराज येथे मकर संक्रांतीपासून ते महाशिवरात्री पर्यंत महाकुंभमेळा होणार आहे.



या कुंभमेळ्याच्या वेळी होणारा प्लास्टिक कचरा टाळण्यासाठी आणि कचऱ्यापासून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी थाळी व पिशवी देण्याचा स्तुत्य उपक्रम सध्या देशभरात राबविण्यात येत आहे. दरम्यान या ठिकाणी विविध संस्था, संघटनांकडून मोफत भोजनाची व्यवस्था केली जाते. मात्र, जेवण देताना प्लास्टिक व थर्माकोलच्या ताटांचा वापर होणार आहे म्हणून या उपक्रमांतर्गत अक्कलकोटातदेखील निसर्गप्रेमी युवकांचा मोठा सहभाग असून शहर आणि तालुक्यातील हजारो लोक या उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद देत असल्याची माहिती सुशील हिरस्कर यांनी दिली.

बहुतेक ठिकाणी जेवणावळींसाठी आतापर्यंत प्लास्टिक, थर्माकोलच्या पत्रावळी वापरून फेकून दिल्या जातात. यामुळे मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, थर्मो कोलचा कचरा होतो. मात्र अशा प्रकारचा प्लास्टिक, थर्मकोलच्या पत्रावळींचा कचरा पर्यावरणासाठी घातक ठरू नये, यासाठी अक्कलकोट शहर व तालुक्यातून पूर्णम इको व्हिजन या संस्थेतर्फे 'एक थाळी, एक थैली हा उपक्रम राबविला जात असल्यांची माहिती मल्लम्मा पसारे यांनी दिली आहे. यावेळी डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. प्रशांत वाली, प्रवीण लंगोटे, डॉ. पंडित पाटील, डॉ. बसवराज चीनकेकर, डॉ. स्वामीनाथ बिराडे, वीरेंद्र मडचणे, आदित्य मडचाणे, ग्रामविकास जिल्हा मंडळ सदस्य संदीप कटकधोंड, मल्लम्मा पसारे, सुशील हिरस्कर, पर्यावरण समिती तालुका पर्यावरण संयोजक सुनील बिराजदार व सहसायाजोक विद्याधर गुरव, लोकापुरे, डॉ. संजय काली आदी उपस्थित होते.

# सांगोल्यात माझी वसुंधरा अभियान ५.० बूट कॅम्प



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१६ डिसेंबर-**

बचत भवन, पंचायत समिती, सांगोला येथे माझी वसुंधरा अभियान ५.० बुट कॅम्प पार पडले.

यावेळी पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या तांत्रिक तज्ञ मार्गदर्शिका सानिका बागवान, गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, सहा. गटविकास अधिकारी वसंत फुले, विस्तार अधिकारी अमोल तोडकरी, देवराज पुकळे, विस्तार अधिकारी प्रतिभा पवार, विस्तार अधिकारी मिलिंद सावंत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच, प्रशासक ग्राम पंचायत अधिकारी, डाटा ऑपरेटर, बी.आर.सी, सी.आर.सी, एस.बी एम, ब्लॉक कॉडनेटर उपस्थित होते. माझी वसुंधरा बाबत टूलकिट ग्रामीण अभियानाची रचना कार्बन पृथक्करण, हरित वायूचे उत्सर्जन कमी करणे आणि नागरिकांमध्ये शाश्वत जीवनशैलीचा प्रचार करणे या तीन बाबीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. अभियान कालावधी १ जून २०२४ ते ३१ मार्च २०२५ आहे. यामध्ये थिमॅटिक क्षेत्र जल, वायू, भूमी, आकाश व अग्नी असून एम आय एस भरण्यासाठी मार्गदर्शन करून प्रत्येक ग्रामपंचायतने फेसबुक, युट्युब व इंस्टाग्राम हे अकाउंट काढणे गरजेचे असल्याचे सानिया बागवान यांनी सांगितले.

# नीलम नगर येथे आजपासून बौद्धिक व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

श्री बृहन्मठ होटगी मठाचे परम पूज्य गुरुवर्य श्री. ष. ब्र. तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त आकाशवाणी रोडवरील नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संस्थेत मंगळवार दि. १७ ते १९ डिसेंबरपर्यंत सायंकाळी सहा वाजता तपोरत्नं बौद्धिक व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

१७ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता मान्यवरांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार असून अविनाश भारती (संभाजीनगर) हे 'भारतीय संस्कृती व आजची तरुणाई' या विषयावर पहिले पुष्प गुंफणार आहेत. भारती हे महाराष्ट्रातील नामवंत व्यक्ते, युवा कवी, प्रसिद्ध कीर्तनकार असून महाराष्ट्राचे शासनाचे स्वच्छता दूत म्हणून कार्य पाहत आहेत. दि. १८ डिसेंबर रोजी संतोष परंडवाल (मुंबई) हे 'श्रमसंस्कार आणि पालकत्व' या विषयावर दुसरे पुष्प गुंफणार आहेत. दि. १९ डिसेंबर रोजी बार्शीचे प्रा. विशाल गरड हे 'नाते संस्कार आणि समाज' या विषयावर तिसरे व शेवटचे पुष्प गुंफणार आहेत. या बौद्धिक व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नेताजी संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी केले आहे.

# सिंदगी तालुक्यात अवैध दारु अड्ड्यावर छापा

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. १६ डिसेंबर-**

उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी सिंदगी तालुक्यातील मोरटगीजवळ छापा टाकला आणि अवैध दारू निर्मिती युनिट सापडले.

या प्रकरणात रु. ८.५० लाख किमतीची अवैध दारू व इतर माल जप्त करण्यात आला असून याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. बेळगावी उत्पादन शुल्क सहाय्यक आयुक्त, सहआयुक्त, विजयपूर उत्पादन शुल्क उपायुक्त, उपविभागीय उपअधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांनी सिंदगी तालुक्यातील मोरटगी रोडवरील लोयोला इंग्लिश स्कूलच्या मागे



असलेल्या अमोघसिद्ध बसाप्पा हुगर यांच्या जमिनीतील शेडवर छापा टाकला. त्या शेड मध्ये प् ५६१.६० लिटर बनावट दारू व १४० लिटर बनावट दारू बनविण्यासाठी लागणारे इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. तसेच, या प्रकरणात युनिटमधील एक आरोपी आणि हुबळी येथे राहणाऱ्या पाच जणांना अटक करण्यात आली.

याप्रकरणी सिंदगीचे उत्पादन शुल्क निरीक्षक शिवानंद हागूर यांनी गुन्हा दाखल केला. या कारवाईत उत्पादन शुल्क उपायुक्त वीरण्णा बागेवाडी, उत्पादन शुल्क निरीक्षक महादेव पुजारी, राहुल नायक, एम. डी. कबाडे, उपनिरीक्षक बी. एस. नागठाण, डी. व्ही. राजपूत, ए. एम. पत्तार, एन. ए. बारगणी, वडिराज एन. आश्रिता, फरीना वनक्याळ व कर्मचारी एम. बी. मोकाशी, एम. एल. पुजारी, अप्पू (हणमंत्रय) बैरागोंड, बी. एस. इंडी, नागप्पा सातळगाव, भीमा शंकर सागोंडा, ए. एस. गोणसगी, श्रीशैला पुजारी आदी सहभागी झाले होते. पोलिसांच्या या कारवाईमुळे सगळ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# विकासक्षम नागरिकांमुळेच राष्ट्राची प्रगती

## सरसंघचालक डॉ. मोहन भागवत : पुण्यात राज्यस्तरीय दिव्यांग शिबिराचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, खराडी, दि. १६ डिसेंबर-**

भारताच्या विकासासाठी समाजातील सर्व घटकांना सक्षम करणे आवश्यक आहे. देशाचा विकास हा फक्त सेवेपुरता मर्यादित नाही. तर सेवेतून नागरिकांना विकासक्षम बनवायला हवे. अशा विकासक्षम नागरिकांमुळेच राष्ट्राची प्रगती होते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

खराडी येथील ढोले-पाटील एज्युकेशन सोसायटी येथे आयोजित 'भारत विकास परिषद विकलांग केंद्रा'च्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या सांगता कार्यक्रमात ते बोलत होते. यानिमित्त राज्यस्तरीय मोफत दिव्यांग शिबीर पार पडलचे. ज्यामध्ये तब्बल १२०० दिव्यांगांना मॉड्युलर कृत्रिम हात व पाय बसविण्यासाठी मोजमाप घेण्यात येत आहे. सरसंघचालक पुढे म्हणाले, काही अंशी अहंकार ही माणसाला कार्य प्रवृत्त करण्यास आवश्यक प्रेरणा ठरते. परंतू,



त्या पलीकडे येते ती शाश्वत प्रेरणा. ती चिरंतन असते. त्यातून निर्माण होणारा सेवाभाव म्हणजे सेवानिष्ठांची मांदियाळी होय. आपलेपणाचा स्त्रोत एकसारखाच असतो त्यातून लोकोत्तर प्रेरणेने सेवा घडते. सेवा करण्याची प्रवृत्ती सेवितात सुद्धा निर्माण होते. सेवित सुद्धा सेवा करणारे बनतात. हृदयस्थ नारायण आहे तो हे घडवून आणतो.

यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष दत्ता चितळे, सचिव राजेंद्र जोग, केंद्र प्रमुख विनय खटावकर, ढोलेपाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सागर ढोले पाटील उपस्थित होते. कार्यक्रमात निता ढेकणे, शशिकांत बोरसे, अर्जुन सोनावणे, अनिकेत गाडेकर, वैजनाथ गोरख आणि नासिर शेख या दिव्यांगांना अत्याधुनिक मॉड्यूलर पाय प्रातिनिधीक स्वरूपात प्रदान करण्यात आले. मॉड्यूलर फूटबद्दल सुमित भौमिक यांनी तांत्रिक माहिती दिली दिव्यांग केंद्राला आर्थिक मदत करणाऱ्या महाराष्ट्र नॅचरल गॅस, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी, ब्रिज नेक्स्ट, रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज, ऑटो हँगर, वात्सल्य ट्रस्टच्या प्रतिनिधींचा सरसंघचालकांच्या हस्ते गौरव करण्यात आला. विनय खटावकर यांना पहिल्या 'दिव्यांग मित्र' पुरस्काराने गौरविण्यात आले. राहुल सोलापूरकर यांनी सूत्रसंचालन, तर दत्ता चितळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भक्ती दातार यांनी वैयक्तिक गीत सादर केले आणि राजेंद्र जोग यांनी आभार मानले. भारतीय सैन्यात सेवा बजावलेले सैनिक ज्यांनी पॅरॉलॉपिक खेळात विशेष कामगिरी बजावली आहे अशा विजयकुमार कारकी, चार सुवर्ण पदक विजेते व्हिलचेअर बास्केट बॉल चॅम्पियन मीन बहादूर थापा आणि एअरक्राफ्ट्समन मृदूल घोष यांचा सरसंघचालकांनी सन्मान केला.

### गिनिज बुक रेकॉर्डचा प्रयत्न

**दिव्यांगांना एका शिबीरात आत्तापर्यंत ७१० कृत्रिम पाय बसविण्याचा विश्व विक्रम आहे. तो मोडित काढत एक हजार २०० दिव्यांगांना मॉड्यूलर पाय बसविण्याचा विक्रम भारत विकास परिषदेच्या वतीने करण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक नोंदणी झाली असून, मार्च २०२५ मध्ये एक हजार २०० कृत्रिम पाय बसविण्यात येणार आहे. त्यानंतर गिनिज बूक रॅकॉर्डमध्ये नोंद होणार आहे.**

### सेवेमुळेच विश्वास : सरसंघचालक

**समाजात सर्वकाही वाईट चालल्याची भावना निर्माण झाली आहे. पण प्रत्यक्ष वाईटाहून ४० पट अधिक चांगले सेवाकार्य समाजात चालू आहे. त्याचा प्रसार होणे गरजेचे आहे. कारण सेवेमुळेच समाजात शाश्वत विश्वास निर्माण होतो.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# राजकीय डावपेच आखण्यात कमी पडलो : धर्मराज काडादी

**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी पहिल्यांदाच राजकीय भाष्य केले. यावेळी ते म्हणाले, पहिल्यांदाच निवडणूक लढलो, वेळ कमी असताना संपूर्ण ताकदीनिशी निवडणुकीला सामोरे गेलो. परंतु निवडणुकीचे राजकीय डावपेच आखण्यात कमी पडलो. तसेच निवडणुकीमध्ये वापर करणाऱ्यांनी आमचा वापर करून घेतला. शेवटी नशीब लागते, असे म्हणत विधानसभा निवडणुकीत वापर करून घेणाऱ्यांवर नाव न घेता टोला हाणला. दरम्यान, धर्मराज काडादी यांनी विधानसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. निमित्त होते श्री सिद्धेश्वर कृषी व औद्योगिक प्रदर्शन पत्रकार परिषदेचे ! पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना धर्मराज काडादी पुढे म्हणाले की, निवडणूक लढवण्याचा हा निर्णय माझा स्वतःचा होता, कोणी हा निर्णय माझ्यावर लादला नाही. परंतु राजकीय डावपेच आखण्यामध्ये आम्ही कमी पडलो. स्वकीय आणि परकीय यांच्यातील फरक लवकर ओळखता आला नाही. मात्र निवडणूक जिंकण्यासाठी नशीब लागते. त्यामुळे शेवटी नशीब असे म्हणत धर्मराज काडादी यांनी विधानसभा निवडणुकीच्या राजकारणावर पहिल्यांदाच भाष्य केले. ते पुढे म्हणाले, विधानसभा निवडणुकीत आम्ही सर्वस्व पणाला लावले. परंतु वेळ कमी होता. कमी वेळेमध्ये निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. तो शेवटी माझा निर्णय होता. ही निवडणूकीत झालेला पराभव हा कोणा एका मुळे झालेला नाही. त्यामुळे या पराभवाचे खापर कोणाच्याही माथी मारणे योग्य नाही. मात्र निवडणुकीमध्ये करेक्ट कार्यक्रम झाला हे कडादी यांनी मान्य केले. असे त्यांच्या बोलण्यातून आणि बोली भाषेतून दिसून आले. शेवटी विषयांतर होऊ नये आपला सध्या हा कृषी प्रदर्शन आणि गड्डा यात्रा असून त्यावर आता लक्ष केंद्रित असू द्या, असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.



**विधानसभा निवडणुकीत वापर करून घेणाऱ्यांवर हाणला टोला**



## ग्रामीण पोलिस दलास चार पारितोषिके

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर -**

पुणे येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य पोलिस कर्तव्य मेळाव्यात सोलापूर ग्रामीण पोलिस दलास चार पारितोषिके मिळाली. पुणे येथील राज्य राखीव पोलिस गट क्र. २ येथे ७ ते १२ डिसेंबर या कालावधीत महाराष्ट्र राज्य पोलिस कर्तव्य मेळावा पार पडला. या मेळाव्यात सोलापूर जिल्हा पोलिस दलाने पोलिस निरीक्षक रणजित माने यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर परिक्षेत्रीय संघातून सहभाग घेतला होता. या संघाने पोलिस तपास, संगणकाचे आधुनिक तंत्रज्ञान, पोलिस विभागाकडील प्रशिक्षित श्वानाचे कौशल्य व त्याबाबत पोलिसांना असणारे ज्ञान याबाबत स्पर्धा घेण्यात आल्या. या पोलिस कर्तव्य मेळाव्यात सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील पोलिस शिपाई प्रसाद मांढरे यांनी कॉम्प्युटर अवेरनेस या प्रकारामध्ये राज्यात प्रथम क्रमांक मिळविला असून त्यांना सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले. तसेच पोलिस हवालदार जयवंत सादूल यांनी पोलिस फोटोग्राफी या प्रकारात राज्यात तिसरा क्रमांक पटकाविला असून त्यांना रजत पदकाने सन्मानित करण्यात आले. सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील टेरी व जिमी या श्वानांनी कर्तव्य मेळाव्यातील स्पर्धेत सहभाग नोंदवून टेरी श्वानाने बॉम्बशोधक विषयात राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला. त्यामुळे टेरी श्वान व तिचे हॅन्डलर पोलिस हवालदार सिध्दलिंग स्वामी यांना चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच श्वान जिमी व तिचे हॅन्डलर पोलिस हवालदार शिवा सौदागरे यांनीदेखील माग काढणे या विषयात प्रथम क्रमांक पटकाविला. या दोघांनादेखील चषक देऊन गौरविण्यात आले. सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिस दलाच्या या यशाबद्दल पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर, उपअधिक्षक श्रीमती विजयालक्ष्मी कुर्री यांनी अभिनंद केले आहे.

## गस्तीवरील पोलिसांच्या दुचाकीस धडक; दुचाकीस्वारावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर -**

शहरात रात्री गस्तीवर असलेल्या पोलिसांच्या दुचाकीस धडक देऊन दुचाकीवरील पोलिस कर्मचाऱ्यास जखमी करणाऱ्या दुचाकीस्वाराविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला ओ. याबाबत पोलिस शिपाई स्वप्नील संजय मोरे (वय ३५, रा. गवई पेठ, जुना बोरामणी नाका, रविवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमएच १३ ईएच १८५६ च्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ डिसेंबर रोजी सायंकाळी पोलिस शिपाई स्वप्नील मोरे हे त्यांच्या एमएच १३ डब्ल्यूएफ २२७९ क्रमांकाच्या दुचाकीवरून बाळे हद्दीत बीट मार्शल असे गस्ती करीत होते. त्यावेळी बाळे-केगाव सर्व्हिस रोडवरील हॉटेल राजमुद्रा समोर एमएच १३ ईएच १८५६ क्रमांकाच्या दुचाकीवरील चालकाने त्याच्या ताब्यातील दुचाकी निष्काळजीपणे चालवून मोरे यांच्या दुचाकीस समोरून जोरदार धडक दिली. यामध्ये पोलिस शिपाई मोरे यांच्या डोक्यास, हातापायास, ओठाला, गालाला, छातीस गंभीर जखम झाली असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# श्री सिद्धेश्वर कृषी व औद्योगिक प्रदर्शनाचे विशेष आकर्षण बुटकी गाय व म्हैस



## २१ ते २५ डिसेंबरपर्यंत राहणार प्रवेश मोफत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

श्री सिद्धेश्वर देवस्थान यांच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही श्री सिद्धेश्वर कृषी प्रदर्शन भरवता असून यंदा प्रदर्शनाचे ५४ वे वर्षे आहे. या निमित्ताने होम मैदान येथे दी. २१ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०२४ या ५ दिवसाच्या कालावधीत होणाऱ्या कृषी प्रदर्शनात ३०० स्टॉलचे नियोजन करण्यात आले आहे.

कृषी विभाग, आत्मा, जिल्हा परिषद सोलापूर, महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्या विशेष सहकार्याने व स्मार्ट एक्स्पो ग्रुप च्या व्यवस्थापन अंतर्गत भरविण्यात येत आहे. तसेच कृषी संशोधन केंद्र, सोलापूर डाळिंब संशोधन केंद्र. रब्बी ज्वारी संशोधन केंद्र, कृषी विज्ञान केंद्र सोलापूर व मोहोळ विभाग, रेशीम खादी ग्रामोद्योग, पशुसंवर्धन, सामाजिक वनीकरण व राष्ट्रीयकृत बँका, नाबार्ड, कृषी महाविद्यालय, कृषी स्टार्टअप उद्योजक, नया उद्योजक, कृषी यांत्रिकीकरण फळ रोपवाटिकाधारक, साखर कारखाने यांच्या सहभागाने आयोजित केले जाणार आसल्याची माहिती श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीच्या वतीने धर्मराज कडादी आणि गुरुराज माळगे यांनी केले आहे. यावेळी पत्रकार परिषदेस आर.एस पाटील, विजयकुमार बरबडे, एक्सपोचे सोमनाथ शेटे आदी उपस्थित होते.

दरम्यान, शेतकऱ्यांना शेतातील नवीन तंत्रज्ञानाची माहिती, कृषी यांत्रिकीकरण, दुग्धोत्पादनः रेशीम पीक. मधुमिक्षका पालन, फलोत्पादन तसेच कृषी उद्योजक निविष्ठा, नवीन स्टार्टअप व्हर्टिकल फार्मिंग, आधुनिक कृषी अवजारे इत्यादी विषयी सविस्तर माहिती पोहचण्यास सुलभ होईल. या कृषी प्रदर्शनामध्ये सोलापूरचे शान असलेली खिलार बैल व गाय प्रदर्शित केले जाणार आहेत तसेच जगातील अत्यंत दुर्मिळ बुटकी देशी पुंगनूर जातीचे गायी प्रदर्शित केले जाणार आहेत. याकरीता इस्ट गोदावरी आंध्र प्रदेशातून शेतकरी सहभागी होणार आहेत.महाराष्ट्रातील सोलापूर, नाशिक, पुणे बाएक संख्या यांचेकडील शेतकयांनी स्वतः तयार केलेले अंदाजे ५०० प्रकारचे दुर्मिळ देशी बी-बियाणे प्रदर्शित करणार आहार तसेच शेतकऱ्याना विक्रीसाठीही उपलब्ध असणार आहेत. दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत कैट शो व डॉग शो प्रदर्शन होणार असून यावेळी विजेत्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. याची सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० पर्यंत डॉग शो, दुपारी ४.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत कैट शो, सायंकाळी ६.०० वाजता डॉग ॲन्ड कैंट फैन्सी ड्रेस स्पर्धा दि. २३ डिसेंबर २०२४ राज्यस्तरीय देशी गाय, बैल प्रदर्शन स्पर्धा आयोजन व विजेत्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. तसंभ दिनांक २३ डिसेंबर २०२४ रोजी पुष्प प्रदर्शना (फुलांचे प्रदर्शन) चे आयोजन. औद्योगिक प्रदर्शन सोलापूर जिल्ह्यामधीला कृषि व संलग्न, गारमेंट, टेक्सटाईल, टॉवेल इत्यादी उत्पादित मालाचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

### होम मैदानावर भूमिपूजन

होम मैदान येथे श्रीसिद्धेश्वर कृषी प्रदर्शनाचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. भव्यदिव्य स्वरूपात उभारण्यात येत असलेल्या कृषी प्रदर्शनाचे चेअरमन गुरुराज माळगे आणि देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज कडादी आणि इतर सदस्य कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### असे आहे प्रदर्शनाचे आकर्षण

- जगातील सर्वात दुर्मिळ बुटकी पुंगनूर गाय, बुटकी म्हैस (राधा)
- खास बायनाहून आणलेला चायनाचा बोकड, तब्बल ६ किलो वजनाचा कोंबडा
- ३००हून अधिक शेतीविषयक कंपन्यांचा सहभाग
- गारमेंट तसेच टेक्सटाईल विभागाची दालने
- भारतातील विविध कंपन्यांचे ट्रॅक्टर्स व शेती अवजारे, वाहन महोत्सव
- शेतीविषयक प्रक्रिया उद्योग, महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या शेतकऱ्यासाठीच्या सर्व योजनांची माहिती देणारी दालने
- सेंद्रीय शेतीचे विशेष दालन, पशु पक्षी व पुष्प प्रदर्शन
- ५०० हून दुर्मिळ देशी बियाण्यांचे प्रदर्शन व विक्री, दुर्मिळ तांदळाचे बियाणे
- तांदूळ महोत्सव, शेतीविषयक पुस्तक प्रदर्शन
- रिमोट ऑपरेटेड ड्रोनचे लाईव्ह, प्रात्यक्षिक व शेतकरी बांधवांना फवारणी क्षेत्रातील नवीन उद्योग करण्यासाठी उपयुक्त असा ड्रोनके दालन
- शेतीमधील विविध तंत्रज्ञानाची माहिती देणारी दालने लाईव्ह प्रात्यक्षिक
- होम गार्डन किटचे लाईव्ह प्रात्यक्षिक
- भाजीपाला रोपवाटिका व विविध दुर्मिळ अशा प्रजातींचेदालने
- नवीन तंत्रज्ञान पीक स्पर्धा, सौर ऊर्जा विषयक दालने
- दुग्ध व्यवसायासाठीची विविध दालने, गोड्या पाण्यात मोत्यांची शेती संदर्भात माहीती
- जगातील सर्वांत लांब १ फुट लांबीची देशी मिरची
- भारतातील व परदेशातील विविध प्रकारच्या मांजर (केंट्स) शो, स्पर्धा प्रदर्शन, फॅशन शो

# शिवशरणम्मा माऊली ट्रस्टतर्फे अखंड वीणा नामसप्ताह, शिवलीलामृत पारायण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

रविवार पेठ परिसरातील कुचन हायस्कूलजवळील शिवशरणम्मा माऊली ट्रस्टच्या वतीने शनिवार, २१ डिसेंबरपर्यंत मुळेगांव लमाण तांडा, चिंतामणी नगर येथील शिवशरणम्मा कैवल्यधाम मठात अखंड वीणा नामसप्ताह, शिवलीलामृत पारायणचे आयोजन करण्यात आले. या उत्सवात दत्तुबाई इंजामुरी यांच्या नेतृत्वाखाली काकडा व भुपाळी, शिवलीलामृत ग्रंथ पारायण, रामचंद्र स्वामी यांचे प्रवचन, लक्ष्मी शेरला व लक्ष्मी सामलेटी यांच्या नेतृत्वाखाली प.पू. सद्गुरु शिवशरणम्मा माऊली यांचे प्रवचन, जगदेवी कोरे यांच्या नेतृत्वाखाली शरणेश्वर आणि शिवशरणम्मा माऊली यांची महापूजा असे कार्यक्रम होत आहेत, अशी माहिती शामसुंदर येदूर, गोपी चव्हाण, गोविंद राठोड, सदाशिव ईरकर, विशाल राठोड, अकबर शेख, हणमंतू राठोड यांनी दिली.

देवम्माबाई पुंजाल, विमलाबाई सुतार, महादेवी महामुनी, अन्नपुर्णा शिंदे, कलावती सम्मम, जनाबाई इंजामुरी, जगदेवी कोरे, विजया कुरुलकर आणि शिवशरणम्मा माऊली भजनी मंडळांचा भजन कार्यक्रम, हभप युवराज कुरुलकर यांचे कैवल्यवाणी या ग्रंथावर प्रवचन, हभप प्रदीप ननवरे यांचे कीर्तन. देहुकर, हगलूर, कोंडी, विठ्ठल खराडे, गौतम सुतार, राजू शिंदे, वासुदेव बाबडे, बाबा नीळ, अमोल नवले, सोपान पवार, निवृत्ती पवार, गुरुराज नीळ, नारायण कनकी, श्रीनिवास चिलवेरी, किरण श्रीचिप्पा, बालाजी कोटा, बाळू मदनाल, नरेश आरसीद, पांडुरंग जांभळे, संजय केसरे, संजय शिंदे, नागेश शिंदे, ज्ञानेश्वर जांभळे, विष्णू आवताडे, चंद्रभागा कोकरे, ओम श्री मल्लिनाथ, सुरेश तोडकरी, दाजी पवार, सुरज साळुंके, दत्तात्रय सरवदे यांचे हरिजागर तर पांडुरंग शिंदे, ज्योतिबा सावंत यांचे भारुड होणार आहे. संभाजी घुले, ज्योतीराम चांगभले, दाजी पवार, शिवय्या स्वामी, हरिभाऊ कुलकर्णी, विठ्ठल कळकीळे, पप्पू लिंबोळे, अजिंकय मोरे, अप्पू लिंबोळे, सुनील दाते, भानुदास इरशेट्टी, गोपीकिशन कुमठेकर, गणेश आदलिंगे, माऊली क्षीरसागर, सचिन गायकवाड, विनायक नारायणकर, प्रतिक कारंडे, सौरभ बोंगे, कृष्णा भोसले, तुकाराम कोंगारी हे गायन, तबला, पखवाजची साथसंगत करीत आहेत. शनिवार, २१ डिसेंबर रोजी ध्वजारोहण, कै. कृष्णाहरी सिध्दम यांच्या प्रतिमेचे पूजन, सत्यजीत कुरुलकर व उमेश कुरुलकर यांच्या नेतृत्वाखाली प.पू. सद्गुरु शिवशरणम्मा म ाऊली यांची महापूजा व पाळणा कार्यक्रम, श्रीसिध्देश्वर नंदीकोलची पूजा, युवराज कुरुलकर व अभिजीत कुरुलकर यांच्या महाप्रसाद वाटप होणार आहे. याकामी मनोज राठोड, विजय राठोड, सचिन राठोडसह मुळेगाव तांडावासीयांचे सहकार्य मिळत आहे, असेही त्यांनी सांगितले.



## शासकीय तंत्रनिकेतनच्या तीन अभ्यासक्रमांना एनबीए मानांकन प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथील एकूण सहा अभ्यासक्रमांपैकी विद्युत अभियांत्रिकी, अणूविद्युत अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान या तीन अभ्यासक्रम ांना नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशन, नवी दिल्ली समितीकडून तीन वर्षासाठी म्हणजे ३० जून २०२७ पर्यंत मानांकन (ॲक्रेडिटेशन) प्राप्त झाले आहे. शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर मधील विद्युत अभियांत्रिकी, अणूविद्युत अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान या अभ्यासक्रमांना नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशन, नवी दिल्ली समितीने दि. २७, २८ आणि २९ सप्टेंबर, २०२४ या दिवशी भेट देऊन महाविद्यालयाचा दृष्टिक्षेप, शिक्षण प्रणाली, विद्यार्थ्यांच्या परीक्षणाची पद्धती, निकाल, ई. विविध मुद्दयाच्या आधारे प्रत्येक विभागातील कागदपत्रांची तपासणी केली होती. मूल्यांकन प्रक्रिया पार पाडण्यासाठी संस्थेचे प्राचार्य, एनबीए समन्वयक, सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाचे योगदान दिले.तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणेचे सहसंचालक डॉ. डी. व्ही. जाधव यांनी संस्थेला भेट दिली असता एनबीए मानांकन मिळाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले.

# दंड न भरल्यास थेट वाहनजप्ती नको

**विनापरवाना वाहन चालविणे किंवा अल्पवयीन चालक असल्यास वाहनजप्ती राज्य पोलिस मुख्यालयातून आदेश**

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

वाहतुकीचे नियम मोडल्याप्रकरणी जारी करण्यात आलेल्या ई-चलानच्या दंडाची रक्कम भरण्यास चालकाने नकार दिल्यास थेट वाहनजप्ती करू नका, असा आदेश राज्य पोलिस मुख्यालयातून राज्यातील सर्व वाहतूक पोलिसांना देण्यात आला आहे. नियम मोडणाऱ्यांवर कारवाईबाबत अतिरिक्त पोलिस महासंचालकांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

मात्र, विनापरवाना वाहन चालविणे किंवा अल्पवयीन चालक असल्यास वाहनजप्ती करता येईल, असे या आदेशात नमूद करण्यात आले आहे. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाईसाठी २०१९ पासून संपूर्ण राज्यात ई-चलन प्रकल्प सुरू करण्यात आला. वाहनचालक स्वखुशीने दंडाची रक्कम भरण्यास तयार झाल्यास, रक्कम नियमाप्रमाणे स्वीकारून केसचा निपटारा करावा; परंतु वाहनचालक दंडाची रक्कम भरण्यास स्वेच्छेने तयार नसतील, तर अशा प्रकरणात संबंधित अधिकार क्षेत्रातील न्यायालयात खटला दाखल करावा.



वाहनचालकाविरुद्ध विनाविलंब दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करावे. खटल्यासाठी विविध कामकाजाच्या वेळी वाहनचालक विरुद्ध न्यायालयात उपस्थित राहण्याचे टाळत असल्यास न्यायालयाच्या परवानगीने त्याचे वाहन जप्त करावे. विनापरवानगी वाहन जप्तीबाबतची कार्यवाही करू नये, असे आदेशात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

**अशा आहेत मार्गदर्शक सूचना**

राज्यभरातील सर्व वाहतूक पोलिसांसाठी या मार्गदर्शक सूचना असल्याचे अतिरिक्त पोलिस महासंचालकांनी म्हटले आहे. सार्वजनिक ठिकाणी वाहन चालविण्यासाठी चालकाकडे परिवहन प्राधिकरण यांच्यामार्फत दिलेला चालक परवाना, वाहन नोंदणी प्रमाणपत्र तसेच विशिष्ट प्रयोजनासाठी वापरात येणाऱ्या वाहनाच्या चालकाकडे परमिट, परवाना व प्रमाणपत्र सोबत बाळगणे बंधनकारक आहे. तसेच चालकाची वयोमर्याद ही १८ वर्षे व मालवाहतुकीचे वाहनावरील चालकाची वयोमर्यादा ही २० वर्षे पूर्ण असावी. हे नियम मोडताना कुणी आढळल्यास चालकाचे वाहन जागीच ताब्यात घेता येईल, असे या आदेशात नमूद करण्यात आले आहे.



## जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ मंदीरात दत्त जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

शहरातील मुरारजी पेठ परिसरातील जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ मंदीर येथे श्री दत्त जयंती मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली.

शनिवारी १४ डिसेंबर रोजी सायंकाळी ह. भ. प. पंकज महाराज गुंड (डोणगाव) यांचे प्रवचनाचा कार्यक्रम झाल्यानंतर दत्त जन्मानिमित्त गुलालाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे, शिवसेनेचे अमोल शिंदे, माजी नगरसेविका अंजली चौगुले, किरण पवार यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित हजारो भक्तगणांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हे सर्व धार्मिक कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मंदीराचे संस्थापक गोरखनाथ डोंगरे आणि श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यासाचे पदाधिकारी, भक्तगण यांनी परिश्रम घेतले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटरचे शुक्रवारी उद्घाटन

### वालचंद समूहाकडून ब्रेन ड्रेन थांबवण्याचे प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

सोलापुरातील अभियंत्यांचे स्थलांतर थांबवण्यासाठी 'वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' हे सोलापुरातील अग्रगण्य अभियांत्रिकी महाविद्यालय बऱ्याच वर्षांपासून प्रयत्नशील आहे. याचाच एक भाग म्हणून वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि पुण्यातील टेकडी टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरात टेकडी टेक्नॉलॉजीचे इंक्युबेशन आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटरचे उद्घाटन २० डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये होत आहे. या डेव्हलपमेंट आणि इंक्युबेशन सेंटर मध्ये सोलापुरातील माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील अभियंत्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. २००६ मध्ये पुणे येथे स्थापन झालेली टेकडी टेक्नॉलॉजी ही कंपनी पुणे आणि बेंगलोर येथे सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटर आणि अमेरिकेत मार्केटिंग कार्यालयासह जगभरातील ग्राहकांना सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटची सेवा सुविधा देत आहे. या उद्घाटन सोहळ्यासाठी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, वैभव गांधी, पराग शहा, टेकडी टेक्नॉलॉजीचे पार्थ लवाटे, अश्विन दाते, मनाली कुमठेकर, हिमांगी लवाटे आणि महेश कुलकर्णी या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. विजय आठवले यांची उपस्थिती असणार आहे.

# आता सोलापूरचे पालकत्व आमदारांनी घ्यावे!

## यावेळीही जिल्ह्याबाहेरचाच पालकमंत्री येणार; भाजपाच्या स्थानिक आमदारांची भूमिका महत्वाची

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

मागील पाच वर्षांच्या २०१९ ते २०२४ या सत्ता कालावधीत महाविकास आघाडी आणि महायुती ही दोन्ही सरकारे होती. पण सोलापूरला मात्र, पाच वर्षे उपराच पालकमंत्री होता. सक्षम स्थानिक आमदार असतानाही सोलापूरला मंत्रिमंडळात स्थान मिळालेले नव्हते. त्यामुळे सोलापूरचा विकास रखडला म्हणून सोलापूरकर नाराज होते. यंदाच्या नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत सोलापूरकरांनी भरभरून मतदान केल्यानंतरही सोलापूरला मंत्रिमंडळात स्थान मिळालेच नसल्याने सोलापूरकरांची नाराजी आणखीनच वाढली आहे. पण मंत्रिपद न मिळाल्याची खंत झटकून आता भाजपाच्या स्थानिक आमदारांनी वज्रमूठ करत सोलापूर शहर व जिल्ह्याच्या विकासासाठी पालकमंत्र्यांशी समन्वय साधून मुख्यमंत्र्यांपर्यंत विषय तडीस नेऊन सोालापूरच्या रखडलेल्या सर्व विकास योजना तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रत्यन करण्याची गरज आहे. आपसातील वादामुळे सोलापूरचे अनेक वर्षे नुकसान झालेले असल्याने आता तरी भाजपाच्या आमदारांनी एकत्रितपणे काम करणे ही काळाची गरज आहे.

२०१४ ते २०१९ या पाच वर्षाच्या कालावधीत भाजपाने स्थानिक आमदारांना पालकमंत्रीपदाची संधी दिली. तर सोलापूरचे दुसरे आमदार देखील मंत्री झाले. २०१९ नंतर मात्र सोलापूरला मंत्रिपद मिळाले नाही, त्यामुळे स्थानिक पालकमंत्री मिळाला नाही. पहिल्या अडीच वर्षाच्या काळात महाविकास आघाडीचे सरकार होते आणि जिल्ह्याचे पालकमंत्रीपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे होते. राष्ट्रवादी काँग्रेसकडे जिल्ह्यात सहा टर्मचे आमदार असतानाही राष्ट्रवादीने उपरा पालकमंत्री सोलापूरला दिला. विशेष म्हणजे अडीच वर्षात राष्ट्रवादी काँग्रेसने तीन पालकमंत्री बदलले. उपरा पालकमंत्री असल्याने त्यांना सोलापूर विषयीची काहीच तळमळ दिसून आली नाही. याउलट उजनीचे पाणी इंदापूरला पळविण्याचा करेक्ट कार्यक्रम मात्र झाला. पुढील अडीच वर्षे राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आले आणि सोलापूरचे पालकमंत्रीपद भाजपाकडे आले. भाजपाने देखील बाहेरचेच पालकमंत्री दिले तर भाजपानेही दोनदा पालकमंत्री बदलले. सोलापूरच्या विकासाबाबतची तळमळ मात्र दिसून न आल्याची खंत सोलापूरकरांच्या मनात कायम राहिली.

सोलापूरकरांच्या जिव्हाळ्याची उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनि सन २०१८ पासून अद्याप रखडलेली असून कासवगतीने काम सुरु आहे. सोलापूरची विमानसेवा सुरु होण्याचा विषय अवघ्या जगभर गाजला. अखेरीस २३ डिसेंबर २०२४ रोजी सोलापूरच्या होटगी रोड विमानतळावरून विमानसेवा सुरु होण्याचा मुहूर्त देखील जाहीर झाला. पण मुहुर्ताची तारीख जवळ येवूनही प्रत्यक्षात मात्र विमानसेवा दृष्टिपथात नाही. सोलापूर शहरातून होणारे दोन उड्डाणपूल आजही केवळ कागदावरच आहेत. विशेष म्हणजे उड्डाणपूलांचा विषय गेल्या दहा वर्षांपासून सुरु असून या कालावधीत केवळ कागदी घोडेच नाचवले जात आहेत. स्मार्ट सिटी अंतर्गत झालेल्या कामांच्या दर्जाचा विषय गंभीर आहे. जिल्ह्यातील रखडलेल्या उपसा सिंचन योजनांच्या कामाला गती मिळत नाही. अशा अनेक विकासाच्या कामांबाबत स्थानिक आमदारांनी पालकमंत्र्यांकडे तगादा लावण्याची गरज आहे. स्थानिक आमदारांनी मुख्यमंत्री आणि मंत्रालयीन पातळीवर सोलापूर विकासाच्या प्रश्नांबाबत सातत्याने बैठका लावून विकासकामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. केवळ आपल्या विधानसभा मतदारसंघाचा रस्ते विकास यावर लक्ष केंद्रीत करून आता चालणार नाही. जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातील शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी उपलब्ध व्हावे आणि प्रत्येक गावाला पिण्यासाठी पाणी मिळावे, यासाठी आता भाजपाच्या पाचही आमदारांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. सोलापूरच्या रखडलेल्या महत्वाच्या योजना पूर्ण झाल्या तरच विकास होणार आहे. विमानसेवा सुरु झाल्यास सोलापुरात आयटीसह नवीन इतर उद्योग येण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. आयटी उद्योग येण्यासाठी येथे अत्युच्य स्पीडची इंटरनेट सुविधा उपलब्ध करणे गरजेचे आहे. शहरालगतसह जिल्ह्यातील विविध औद्योगिक वसाहतीत सोयी सुविधा पुरेशा असणे गरजेचे आहे. युवा वर्ग शिक्षणासह नोकरीनिमित्त सोलापूर सोडत असून त्यांच्यामागे पालकही सोलापूर सोडत आहेत. मागील दोन जनगणनेमध्ये शहराची लोकसंख्या कमी होत असल्याची आकडेवारी आहे. सन २०११च्या जनगणनेत शहराची लोकसंख्या ९ लाख ५४ हजार इतकी होती. आता नव्याने होणाऱ्या जनगणेनेत किती असणार याची उत्सुकता आहे. सोलापूरला मंत्रिपद मिळाले नाही याचे आत्मचिंतन करून स्थानिक आमदारांनी एकत्रितपणे पालकमंत्री आणि सरकारवर दबावगट निर्माण करणे अपेक्षित आहे. आपलेच सरकार आहे असे म्हणून चालणार नाही तर प्रसंगी आपल्या गावासाठी उठाव देखील अत्यावश्यकच आहे. नूतन पालकमंत्री कोण हे कळाल्यानंतर स्थानिक आमदार काय करतात हे देखील सोलापूरकर बारीक नजरेने पाहणार हे मात्र नक्की.



### नागरिकांचाही दबावगट गरजेचाच

सोलापूरला यंदाही स्थानिक पालकमंत्री नाही, त्यामुळे सोलापूरच्या रखडलेल्या योजना आणि विकास करून घेण्याची जबाबदारी जशी भाजपाच्या आमदारांची आहे. तसेच सोलापूरच्या नागरिकांनीही सरकार आणि पालकमंत्र्यांवर दबावगट निर्माण करण्याची अत्यावश्यकता आहे. मतदान केलेले असल्याने नागरिकांनी न घाबरता लोकशाही मार्गाने पालकमंत्री आणि सरकारला विकासाबाबल जाब विचारला पाहिजे. सोलापूरचा विकास होण्यासाठी आपल्या आमदारांकडून काय प्रयत्न सुरु आहेत यावर देखील नागरिकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. नागरिकांचा दबावगट आमदारांवर आणि आमदारांचा दबावगट पालकमंत्र्यांसह सरकारवर असेल तर निश्चित सोलापूरचा विकास होणार आहे.

## क्राईम वृत्त...




### रिक्षाच्या धडकेने वृध्द महिला गंभीर जखमी

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

दहिटणे येथील कमल नगरात रिक्षाच्या धडकेने वृध्द महिला गंभीर जखमी झाली. गिरजाबाई अर्जुन लोहार (वय ७०) अये जखमी महिलेचे नाव आहे. याबाबत अर्जुन गुरुनाथ लोहार (वय ४२, रा. कमल नगर, दहिटणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात रिक्षा चालकाविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ डिसेंबर रोजी सायंकाळी कमल नगर येथे गिरजाबाई लोहार या राहत्या घरातून फिरण्यासाठी मेन गेट उघडून घराबाहेर गेल्या होत्या. त्यावेळी नवाज हॉटेलकडून आलेल्या भरधाव रिक्षाचालकाने रिक्षा निष्काळजीपणे चालवून गिरजाबाई यांना जोरदार धडक दिली. यामध्ये गिरजाबाई यांच्या डोक्यास, तोंडाला, हाताला जबर मार लागून त्या जखमी झाला. अपघातानंतर रिक्षाचालक पळून गेला आहे. म्हणून जोडभावी पेइ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार साळुंके पुढील तपास करीत आहेत.

### गरम तेल अंगावर पडल्याने तरूण जखमी

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

घरामध्ये जेवण बनवत असताना गरम तेल हातावर पडून तरूण जखमी झाला. राहुल लक्ष्मण बुऱ्हाणपुरे (वय ३१, रा. लष्कर, बेडरपूल, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १५ डिसेंबर रोजी रात्री घरी राहुल हा जेवण बनवत होता. त्यावेळी गरम तेल उजव्या हातावर पडल्याने त्याचा हात भाजल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### काँग्रेस भवनजवळ दुचाकी घसरून एक जखमी

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

शहरातील काँग्रेस भवनजवळ दुचाकी घसरून झालेल्या अपघातात एकजण जखमी झाला. प्रशांत सिद्रामप्पा भावे (वय ४८, रा. पीडब्ल्यूडी क्वार्टर्स, रंगभवन, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १५ डिसेंबर रेजी रात्री प्रशांत भावे हे त्यांच्या दुचाकीवरून विजापूर वेस ते रंगभवन या रस्त्याने जात होते. त्यावेळी काँग्रेस भवनजवळ भावे यांची दुचाकी स्लीप झाली. त्यामध्ये भावे यांच्या तोंडास, हातास मार लागला असून प्रशांत यांना पत्नी रश्मी यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### स्पीडब्रेकरवर दुचाकी आदळून झालेल्या अपघातात तरूण जखमी

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

स्पीडब्रेकरवर दुचाकी आदळून झालेल्या अपघातात एक जण जखमी झाला. महेश व्यंकट बनसोडे (वय ३९, रा. तांदूळवाडी, ता. दक्षिण सोलापूर) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. १५ डिसेंबर रोजी रात्री सायंकाळी महेश बनसोडे हे सैफुल ते तांदूळवाडी असे दुचाकीवरून जात होते. त्यावेळी आयटीआय पोलिस चौकीसमोर दुचाकी स्पीडब्रेकरवर आदळून अपघात होऊन दुचाकीवरून बनसोडे हे पडले. त्यामध्ये बनसोडे यांच्या तोंडास व सर्वांगास मार लागल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### चुलीवर भाकरी बनवताना साडी पेटल्याने वृध्द महिला जखमी

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

चुलीवर भाकरी बनवताना साडी पेटल्याने वृध्द महिला जखमी झाली.गौरव्वा कामू हेळवे (वय ५८, रा. करजगी, ता. अक्कलकोट) असे जखमी महिलेचे नाव आहे. ८ डिसेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास राहत्या घरी चुलीवर गौरव्वा हेळवे या भाकरी बनवत होत्या. त्यावेळी अचानक साडीने पेट घेतल्याने त्यात गौरव्वा या भाजून जखमी झाल्या. त्यामुळे त्यांना मुलगा परशु हेळवे याने उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील १५०० कोटींच्या व्यवहाराची सीआयडी चौकशी करा

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कामगारांची निदर्शने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

तालुका कामगार सुविधा केंद्राचे १५ मार्च २०२४ चे आदेश तात्काळ रद्द करावे किंवा तालुका कामगार सुविधा केंद्रासह बांधकाम कामगारांचे नोंदणी, नुतनीकरण आणि लाभाचे अर्ज दाखल करण्यासाठी पूर्वीप्रमाणे संकेतस्थळावरील कामकाज त्वरीत चालू करावे. लाभाचे अर्ज दाखल करतेवेळेस डब्ल्यु.एफ. सी. सेंटर निवडण्याचे ऑपशन सुविधा कामगारांना उपलब्ध करुन देण्यात यावी आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबईचे सचिव तथा सीईओ विवेक कुंभार यांच्या गृहउपयोगी वस्तू संचाच्या प्रकरणात झालेल्या तब्बल १५०० कोटी रुपयांच्या व्यवहाराची सीआयडी चौकशी करून अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी कामगार संघटना महासंघ सोलापूर जिल्हा अध्यक्ष साथी बशीर अहमद यांनी केली आहे.

संघटनेच्या वतीने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी राज्यात प्रत्येक तालुक्यामध्ये एक तालुका कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत मंडळाचे सचिवांनी १५ मार्च २०२४च्या आदेशान्वये तालुका कामगार सुविधा केंद्र स्थापन केले आहे. ज्या उद्देशाने सुविधा केंद्र स्थापन केले आहे कामगारांना सेवा मिळत नाही. यामुळे कामगारांना आर्थिक व मानसिक त्रास होत आहे.

मंडळाने कोविड-१९च्या काळात विषाणुप्रादूर्भाव वेगाने वाढल्याने मंडळाच्या कामकाजावर निबंध घातले होते. त्याकालावधीत जिल्हा कार्यालयाना भेट देणे कामगारांना शक्य नव्हते. त्यामुळे तालुका सुविधा केंद्र स्थापन करण्याचे तत्कालीन सहकार मंत्री यांनी मंडळास सुचवले होते. मंत्री यांनी सुचविलेल्या विनंतीचा विचार केला गेला नाही. परंतु २०१९ ची अंमलबजावणी २०२४ मध्ये करण्यात आली आहे. केवळ कल्याणकारी मंडळाच्या योजनेत मंडळाचे अधिकाऱ्यांना भ्रष्टाचार करण्याच्या उद्देशाने खाश्रगी कंपनीला सुविधा केंद्राचा आणि भांडे साहित्य वाटपाचा ठेका देण्याच्या उद्देशाने केलेले कृत्य आहे. असा आरोप यावेळी करण्यात आला.

यावेळी संघटनेचे जनरल सेक्रेटरी सिद्धार्थ बोराडे, उपाध्यक्ष अशोक कांबळे, उपाध्यक्ष सायबण्णा तेग्गेळी, एजाज शेख, अश्फाक शेख, महेश गायकवाड, शिवाजी कांबळे, जब्बार पटेल, जाहीर शेख आदींसह कामगार संघटना महासंघाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि कामगार उपस्थित होते.



## ग्रामदैवत सिद्धेश्वर यात्रेच्या कार्यालयाचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या गडयात्रेची चाहूल लागली असून, अवघ्या एक म हिन्यावर येऊन ठेपलेल्या यात्रेची लगबग सुरू झालेली दिसत आहे. यात्रेच्या अनुषंगाने, पंचकट्टा येथे यात्रेच्या कार्यालयात ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराजांचे पूजन करून वास्तूचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी आणि कार्यालयीन संचालक प्रकाश बिराजदार यांच्या हस्ते श्री सिद्धेश्वर देवस्थान शास्त्रीपौरोहित्य पूजाश्री वे मु डॉ शिवयोगीशास्त्री होळीमठ श्री वे मु चिदानंदशास्त्री हिरेमठ स्वामी यांच्या पौरोहित्यामध्ये विधिवत प्रतिमापूजन करण्यात आले. पूजनानंतर आरती करण्यात आली. पंचकमिटी सदस्यांना प्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी देवस्थानच्या सदस्यांना प्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष सिद्धेश्वर बमनी, महादेव चाकोते, काशिनाथ दगू पाटील, मल्लिकार्जुन कळके, गिरीश बुरनाळे, नीलकंठप्पा कोणापुरे, भीमाशंकर पटणे, विश्वनाथ लंबा, गुरुराज माळगे, राजेंद्र घुली, सुरेश म्हेत्रे, मल्लिनाथ मसरे, विलास कारभारी, रतन रिक्के, पशुपतिनाथ माशाळ देवस्थान कार्यालयीन अधिकारी पंडित कस्तुरे, चद्रकांत बिराजदार, सिद्धाराम पाचापुरे, शातलिंग अजुरे आदींची उपस्थिती होती.

## भगवान अय्यप्पास्वामींची महापडीपूजा भक्तीभावात

### कृष्णा यनगंदूल सन्निधानमतर्फे आयोजन; हजारो भाविकांना महाप्रसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

भगवान अय्यप्पास्वामींच्या कडक अनुष्ठानअंतर्गत कन्ना चौक येथील कृष्णा यनगंदूल सन्निधानमतर्फे भगवान अय्यप्पास्वामींच्या महापडीपूजा भक्तीभावात करण्यात आली. आहे. यानिमित्त हजारो भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. सन्निधानमतर्फे केरळचे तांत्रिक गुरु रवी अय्यर यांच्या हस्ते महापडीपूजा (१८ पायऱ्यांची पूजा) आली.

शबरीमलय येथे अय्यप्पास्वामींचे प्रसिद्ध मंदिर आहे. देशभरात अय्यप्पास्वामींचे कोट्यवधी भक्त आहेत. कार्तिक पौर्णिमा ते मकरसंक्रांती या कालावधीत श्री अय्यप्पास्वामींचे भक्त ४१ दिवसांचे कडक अनुष्ठान करतात. याचा प्रारंभ माळधारणेने करण्यात येतो. सोलापुरात श्री अय्यप्पास्वामींचे हजारो भक्तगण आहेत. यापैकी शेकडो भक्त गट स्थापून सामूहिक अनुष्ठान करतात. सोलापुरात असे एकूण १० गट आहेत. या गटाच्या ठिकाणाला सन्निधानम असे संबोधले जाते.

४१ दिवसांच्या अनुष्ठान कालावधीत आपापल्या सोयीनुसार प्रत्येक सन्निधानमतर्फे एक दिवस महापडीपूजेचे आयोजन करण्यात येते. अतिशय वैशिष्ट्यपूर्ण तसेच भव्य अशी ही पूजा असते. अय्यप्पास्वामी प्रतिमेची प्रतिष्ठापना करून १८ पायऱ्यांची पूजा केली जाते. यंदाच्या वर्षी सोलापुरातील पहिली महापडीपूजा दि. १२ डिसेंबर रोजी दाजी पेठ येथील नागनाथ मंदिरात झाली. त्यानंतर दुसरी महापडीपूजा यनगंदूल सन्निधानममध्ये करण्यात आली. यावेळी सलग १८ वर्षे अनुष्ठान केलेल्या श्रीनिवास गुर्रम यांना गुरुस्वामी करण्यात आले. यावेळी विनायक मिठापल्ली यांनी पूजा सजावट तर गोविंद गड्डम यांनी मंडप सजावट केली. यावेळी सन्निधानमप्रमुख जगदीश मादास, दिगंबर शेरला, श्रीनिवास गुर्रम, बालाजी म्हेता, बालाजी आंबट, शुभम कुणगिरी, विलास कुणगिरी, अमर कुणगिरी, नीलकंठ कटके उपस्थित होते. महापडीपूजेनंतर हजारो भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.



**मनोहारी, नेत्रदीपक अशी महापडीपूजा**

महापडी पूजेचे स्वरूप भव्य असते. केरळच्या तांत्रिक गुरु हस्ते ही पूजा करण्यात येते. पूजा ठिकाणी अय्यप्पा स्वामींची मूर्ती प्रतिष्ठापना करून रंगीबेरंगी फुलांची रचनाबद्ध व आकर्षक सजावट करून आरास केली जाते. ही पूजा मनोहरी,नेत्रदीपक अशी असते. कडक अनुष्ठानामुळे निस्सीम भक्तीचा एक वेगळाच माहोल या ठिकाणी अनुभवायला मिळते.

## पत्नीच्या छळप्रकरणी पतीसह चौघांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

पत्नीच्या छळप्रकरणी पतीसह चौघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मेघा घनश्याम गायकवाड (वय २९, रा. विजयलक्ष्मी नगर, नई जिंदगी, मजरेवाडी, सोलापूर) या विवाहितेच्या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती घनश्याम गायकवाड, सासू रेखा, नणंद शिरीषा, चुलत सासू यांची मुलगी उज्वला भिसे (सर्व रा. ९/७ लाल नगर, इचलकरंजी, हातकनंगले, जि. कोल्हापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ सप्टेंबर २०१३ ते २१ मार्च २०२१ या कलावधीत मेघा या सासरी हातकणंगले येथे नांदण्यास होत्या. मेघा सासरी असताना पती घनश्याम व इतरांनी मेघा हिस शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून हाकलून दिले. मेघाच्या मुलीस त्यांच्याकडे ठेऊन घेतले तसेच घरकाम करून घेऊन वेळेवर तिला जेवण न देता त्रास देत घालून पाडून बोलून त्रास देत असत व तुला खल्लास करतो असे म्हणून शिवीगाळ करून शारीरीक व मानसिक आर्थिक छळ केला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार मुजावर पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९७७

**जैसी चंदनाची मुळी । गिंवसोनि घेपे व्याळीं ।**
**नातरी उल्बाची खोळी । गर्भस्थासी ।।**

स्थितप्रज्ञतेला हालविणारे व स्वधर्माचरणापासून माणसाला दूर नेणारे काम-क्रोध हे दोन वैरी आहेत. हे वैरी मानवाच्या देहाबरोबर निर्माण झालेले आहेत. मानवाला ते असे घट्ट चिकटून बसलेले असतात, कि त्यांना बाजुला करणे अवघड असते. मानवतेचा ते कधी व कसा घात करतील हे सांगता येत नाही. मी-मी म्हणणारे या वै-याचे शिकार होतात. हे फार बलशाली असल्याने कमजोर मनाच्या व्यक्तिला तेव्हाच हारवून टाकतात. हे मानवी मनाला घट्ट चिकटून बसले आहेत, हे सांगतांना भगवंत म्हणणात,

**जैसी चंदनाची मुळी । गिंवसोनि घेपे व्याळीं ।**
**नातरी उल्बाची खोळी । गर्भस्थासी ।।**



अर्थात, ज्याप्रमाणे सर्प चंदनाच्या मुळीला वेटाळून घेतात किंवा गर्भात असलेल्या जीवाला गर्भाशयाची खोळ जसी घट्ट आवरण करुन असते. तसे हे काम-क्रोध मानवांमध्ये घट्ट आवरण करुन चिकटून बसलेले असतात. यांना मानवापासून दूर करणे कठीण काम असते. ज्याप्रमाणे बी सालपटासह निर्माण होते, तसाच म ानवी देह कामक्रोधासह निर्माण होत असतो. प्रभेवाचून सूर्य, धुराशिवाय अग्नी, धुळीविना आरसा कधीच आढळत नाही. तसे काम-क्रोधाशिवाय, ज्ञान माणसाच्या ठिकाणी आढळणे कठीण असते ज्ञान हे ब्रम्हरुप असल्याने ते शुध्दच असते. पण बी सालपटाने झाकल्या प्रमाणे, हे ज्ञान कामक्रोधाने झाकले जाते. कामक्रोधरुपी राक्षसांचा पराभव अवघड असला तरीही तो अशक्य नाही. ज्ञान प्राप्तीसाठी कामक्रोधाचा पराभव आवश्यक आहे. या कामक्रोधाचे मूळ स्थान आपली इंद्रिये आहेत. इंद्रियापासूनच कर्माची प्रवृत्ती निर्माण होते, म्हणून प्रथम इंद्रियांनाच वश केले पाहिजे. इंद्रिये वश झाली तर मनाची विषयाकडील ओढ बंद होईल व त्यामुळे बुध्दीची भ्रमापासून मुक्तता होईल. आत्मा हा इंद्रिये, मन आणि बुध्दी यांच्याहून श्रेष्ठ आहे याची जाणीव ठेवून, उच्च बुध्दीच्या सामर्थ्याने मनाचे संयमन करुन, या कामक्रोधांना जिंकले पाहिजे. सुर्यकिरणेच संपली तर मृगजळ कोठून उरणार. तसे कामक्रोध संपले तर देहाचे पारतंत्र्य शिल्लक राहणार नाही. म्हणजेच फक्त आत्मानंदाचे सुख शिल्लक राहील. हा अर्जुन - श्रीकृष्णाचा सर्व संवाद संजय, राजा धृतराष्ट्राला सांगत आहे. अर्जुन प्रश्न विचारीत आहे, त्याचे उत्तर श्रीकृष्ण परमात्मा देत आहेत. या प्रश्नोत्तरीचा आनंद संजय व्यासांच्या कृपेने राजवाडयात बसून घेत आहे. श्रीकृष्ण-अर्जुनाच्या संवादाचा आनंद श्री. ज्ञानेश्वर माऊली आम्हाला सुंदर अशा उदाहरण व स्पष्टीकरणासह अत्यंत सोप्या व गोड भाषेत देत आहेत. अर्जुन जसा ज्ञानलालसा प्रोत्साहित करुन श्रीकृष्णांकडून आनंद घेत आहे, तसा आनंद आपणही माऊलींकडून या सदराच्या माध्यमातून घेत राहू या. यासाठी आपली ज्ञानलालसा वाचनात सातत्याने टिकुन राहायला हवी. आपली ज्ञानलालसा आपणाला आनंदलहरी वाढत असल्याची अनूभूती देत राहील यांत आम्हास शंका वाटत नाही. कारण आनंद हा संत साहित्याचा आधारस्तंभ असतो. त्यामुळे या सदराचा सहवास आपोआप आनंद देत राहील. आम्ही संत वचनांचे काढत असलेले अर्थ हे आमच्या अल्पबुध्दीचे असल्याने चूक भूल श्रोत्यांनी मोठया मनाने पदरात घ्यावी अशी अपेक्षा या प्रसंगी आम्ही करीत आहोत.

**जय जय रामकृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १७ डिसेंबर २०२४ | पेन्शनर्स डे, नागोबा यात्रा |
| विक्रम संवत् २०८०-८१ | पालखी म्हसवड, जि. सातारा |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. द्वितीया - (१०.५६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पुनर्वसु (२४.४३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ब्रह्मा (२१.१०) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (२२.२५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** बुद्धीचे कामे अधिक करू नका. आहारात नियमितता ठेवा. व्यापार मध्यम राहील. व्यक्तिगत समस्या निर्माण होण्याची शक्यता. कुटुंबातील जबाबदारीकडे लक्ष.

**वृषभ :** अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. व्यापारात फायदा होईल. मोठ्या लोकांशी संबंध वाढतील. आर्थिक चिंता सलत राहील. कौटुंबिक तणाव रहाण्याची शक्यता.

**मिथुन :** आपल्या चातुर्याचे आपले अधिकारी कौतुक करतील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. आर्थिक आवक वाढेल. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा.

**कर्क :** व्यवसायात अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. भ्रम ात न राहता स्व:विवेक बुद्धीने काम करा. कौटुंबिक परिस्थिती तणावपूर्ण राहील.

**सिंह :** शुभचिंतकाची भेट झाल्यामुळे आनंदी रहाल. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर मान सन्मान व प्रतिष्ठा मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कन्या :** विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. आशाजनक वातावरण निर्माण होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. प्रवास शक्यतो टाळा.

**तुळ :** कोणत्यातरी प्रसिद्ध व्यक्तिशी संबंध वाढतील. आरोग्य चांगले राहील व्यापारामध्ये विस्तार होईल. स्थावर मालमत्तेची विक्री करतांना घाई गडबड करू नका.

**वृश्चिक :** कौटुंबिक सहकार्य मिळाल्याने आजचा दिवस आनंदी जाईल. पराक्रम व क्षम तेमुळे आपल्याला यश व फायदा होईल. खर्च विचार करून करा. रोजगारात प्रगती राहील.

**धनु :** धार्मिक, शुभकार्याची आखणी कराल. आपल्या लोकप्रियतेचा फायदा होईल. आरोग्य मध्यम राहील. मेहनतीवर विश्वास ठेवा चांगले फळ मि ळेल. कौटुंबिक सुख मिळेल.

**मकर :** चांगल्या व्यक्तींचा संप ठेवा. आर्थिक आवक वाढणार आहे. आपल्यापेक्षा मोठ्या लोकांचा आदर व सेवा करा. आळस सोडून द्या. समाजात आपली पत वाढेल. मानसिक ताण कुटूंबाचा खूप राहील. आर्थिक फटका बसेल.

**कुंभ :** व्यापारातील फायदा, मानसिक प्रसन्नता व उत्साह वाढविल. मुलांच्या भविष्याची काळजी राहील. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**मीन :** रोजगारात परिवर्तन किंवा नवीन संधी येईल.

# रिपाइं आठवले गटाच्या वतीने जोरदार निदर्शने

**परभणी घटनेचे पडसाद सोलापुरात; प्रदेशाध्यक्ष राजा सरवदे यांनी सरकारवर साधला निशाणा**



सोलापूर : सोमवारी सकाळी पूनम गेटसमोर परभणी प्रकरण विरोधात आंदोलन करण्यात आले.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

परभणी येथील घटनेचे पडसाद राज्यभरात तसेच सोलापूर शहरात देखील उमटत आहेत. परभणी मध्ये घडलेल्या संविधान विटंबना घटनेच्या निषेधार्थ सोलापुरात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष राजा सरवदे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढून तीव्र निषेध नोंदवण्यात आला. सोलापुर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून निघालेला हा मोर्चा श्रीसिद्धेश्वर मंदिर, पासपोर्ट कार्यालय, सिद्धेश्वर प्रशालेमार्गे जिल्हा परिषदेच्या पूनम गेट समोर येऊन थडकला.

यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्यावतीने विविध घोषणा देत जोरदार निदर्शने करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे शहराध्यक्ष अतुल नागटिळक यांनी याचा निषेध नोंदवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान संपूर्ण देशाचे असताना त्या संविधानाच्या रक्षणासाठी केवळ आंबेडकरी समाजात रस्त्यावर उतरतो हे दुर्दैव आहे, असे सांगतानाच घटनेची चौकशी करून संबंधित आरोपींना शिक्षा व्हावी अन्यथा रिपाइ यापेक्षाही तीव्र आंदोलन करेल, असा इशारा दिला. याप्रसंगी प्रदेश अध्यक्ष राजा सरवदे, प्रदेश उपाध्यक्ष के.डी. कांबळे, शहर समन्वयक अतुल नागटिळक, शहर समन्वयक शाम धुरी, शहर समन्वयक पवन थोरात, शहर समन्वयक, राजेश उबाळे शहर समन्वयक, सुशिल सरवदे आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते आणि भीमसैनिक उपस्थित होते.

**परभणीतल्या हिंसाचाराची सीबीआय चौकशी करावी**

परभणी येथे मुख्य चौकात असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर असलेल्या, भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याच्या (उद्देशिक) प्रतिकृतीची विटंबना केली. त्यामुळे परभणी शहरामध्ये मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर बौध्द वस्तीत भिमनगर, प्रियदर्शीनगर इत्यादी विभागात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर कोंबींग ऑपरेशन करून बौध्द बांधवांना मोठ्या प्रमाणात मारहाण केली. सोबतच त्यांच्या घराची, मोटार सायकली, कारची पोलीसांनी नुकसान केले. अनेक निष्पाप नागरिकांनापोलीसांनी बेकायदेशीर अटक केल्याचे समजते. यामध्ये विधि विभागाचा पदवीधर भिमसैनिक, दिवंगत सोमनाथ व्यंकटेश सूर्यवंशी याचा पोलीस मारहाणीत, कोठडीत मृत्यू झाला. अनेक महिलांना आणि शालेय, कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर चुकीच्या पध्दतीने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**- राजा सरवदे,**
प्रदेशाध्यक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट.

# चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे रेल्वे महाप्रबंधकांना चादर भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

मध्य रेल्वेचे महाप्रबंधक धरमवीर मीना हे सोलापूरच्या दौऱ्यावर आले असता सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने त्यांचे स्वागत करताना सोलापुरी चादर भेट म्हणून देण्यात आली. सोलापुरी चादरोची रंगसंगती, डिझाईन पाहून ते जणू 'सोलापुरी चादरी'च्या प्रेमात पडल्याचे दिसून आले. सोलापूर रेल्वे स्थानकाच्या प्लॅटपार्म क्रमांक पाचच्या शेजारी तिकीट बुर्कीग काउंटर सुरु करण्यात यावी, अशी मागणी सोलापूरकरांच्या वतीने गेल्या तीन वर्षापासून करण्यात येत होती. महाप्रबंधक मीना यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने त्यास यश आले आहे. सोलापूर-सिकंद्राबाद-सोलापूर इंटरसिटी सुरु करण्यात यावी, अशी मागणी लावून धरण्यात आली असता याबाबत त्यांनी सकारात्मकता दर्शविली.



सोलापूर-नागपूर-विलासपूर-रायपूर आणि सोलापूर-हावडा एकसप्रेस सुरु करण्यात यावी. वंदेभारत सेमी सुपरपास्ट एकसप्रेसचे मुंबई ते सोलापूर वेळेत बदल करावी आदी म ागण्यांचे निवेदन त्यांच्याकडे देण्यात आले. याप्रसंगी 'चेंबर ऑप कॉमर्स'चे राजू राठी, धवल शहा, पशुपती माशाळ, सुकुमार चंकेश्वरा, शैलेश बच्चुवार, संजय कंदले, दयासागर सालुटगी, गिरीश बिंगी, 'डीआरएम'चे नीरज डोलारे, शैलेश परिहार, स्टेशन मास्तर सी.एल. मीना उपस्थित होते.

- ज्येष्ठ नागरिकांना तिकीट दरात सवलत

सोलापूर-पुणे-सोलापूर करिता दररोज सायंकाळी ५ ते ५ यावेळेत नवीन इंटरसिटी सुरु करण्यात यावी, ज्येष्ठ नागरिकांना तिकीट दरात मिळणारी सवलत पूर्ववत सुरु करावी, अशीही मागणी करण्यात आली. टिकेकरवाडी येथे टर्मिनल मंजूर करण्यात आले. हुतात्मा एकसप्रेसची वेळ बदलण्यात आली आणि वन स्टेशन वन प्रॉडकटचे स्टॉल सुरु करण्यात आले. याबद्दल चेंबर ऑफ कॉमर्सने रेल्वे प्रशासनाचे आभार मानले.

# परभणी घटनेतील दोषींवर कारवाई करा

**आडम मास्तर; तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलन करणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

परभणी येथे बंदच्या दरम्यान पोलिसांनी केलेल्या कारवाईत अनेक निरपराध नागरिकांवर जाणूनबुजून अत्याचार करण्यात आले. सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर तातडीने खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक करा, मृताच्या कुटुंबियांना ५० लाख रुपयांची तातडीची मदत जाहीर करा आणि कुटुंबातील एका व्यक्तीला कायम शासकीय सेवेत सामावून घ्या अशी मागणी माकपचे माजी आमदार आडम मास्तर यांनी केली आहे. एका पत्रकाद्वारे त्यांनी सदरची मागणी केली आहे.

दरम्यान, दलित वस्त्यांमध्ये घुसून महिलांसह निरपराध नागरिकांना अमानुष मारहाण करणाऱ्या पोलिसांवर, त्यांना तसा आदेश देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करावी, दलित नागरिकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे त्वरित मागे घ्यावेत, अशीही मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आसून, संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना आणि नंतर दलितांवर करण्यात आलेल्या पोलीस अत्याचारास परभणीचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. राज्य शासन आणि प्रशासनाच्या या जातीय वृत्तीचा माकप निषेध करत असून जनतेने रस्त्यावर उतरून संविधानाच्या मार्गाने आपला संताप व्यक्त करावा, असे आवाहन करत आहे. त्यानुसार माकप ने शेकडो कामगारांना घेऊन १४ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे तीव्र निदर्शने करण्यात आलेले आहे. याबाबत उग्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ही यावेळी देण्यात आला आहे.



# प्रभाकर स्वामी महाराज मंदिरातर्फे दिनदर्शिकेचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

सद्गुरू श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्ट व गुरुमहाराज परिवाराकडून २०२५ सालच्या दिनदर्शिककेचे प्रकाशन करण्यात आले. विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा अध्यक्ष हभप अभिमन्यू महाराज डोंगरे यांच्या हस्ते सम्राट चौक येथील सद्गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात हा प्रकाशनाचा कार्यक्रम झाला.

श्री दत्त जयंतीनिमित्त श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्ट व गुरुमहाराज परिवाराकडून हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साधक नंदकुमार गादेकर होते. याप्रसंगी दिनदर्शिकेच्या निर्मितीसाठी मोलाचे योगदान देणारे भक्त परशुराम व्हटकर यांचा सन्मान करण्यात आला. श्री सद्गुरू प्रभाकर महाराज मंदिरामध्ये वर्षभर विविध प्रकारचे उत्सव, पुण्यतिथी, जयंती असे कार्यक्रम होत असतात. त्यानिमित्त वर्षभर श्री गुरुगीता सप्ताह होत असतात.

पारायण कोणत्या दिनांकाला सुरू होते व कोणत्या दिनांकाला समाप्ती होते याची माहिती या दिनदर्शिकेत देण्यात आलेली आहे, असे ट्रस्टी उदय वैद्य यांनी याप्रसंगी सांगितले. या कार्यक्रमाला मंदिराचे चीफ ट्रस्टी मोहन बोड्डू, मॅनेजिंग ट्रस्ट बाळकृष्ण शिंगाडे, ट्रस्टी उदय वैद्य, वामन वाघचौरे, वसंत बंडगर, सदस्य रवी गुंड, रामभाऊ कटकधोंड, सम्राट राऊत, रमेश देशमुख, मल्लिनाथ व्हटकर आदी उपस्थित होते.

# समविचारी संघटनेचेवतीने परभणी, बीड घटनांचा निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

भाजपा सरकारच्या राजवटीमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला असून सोलापुरातील सर्व धर्मीय समविचारी संघटना एकत्र येऊन परभणी व बीड येथील घटनेच्या तीव्र शब्दात निषेध करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. तसेच जिल्हाधिकारी यांच्यामार्फत संयुक्त राष्ट्र संघाचे सचिव यांच्याकडेही हे निवेदन पाठविण्यासाठी देण्यात आले.



परभणी मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आली. त्यानंतर पोलीस प्रशासनाच्या वतीने कोंबिंग ऑपरेशन मध्ये पोलिसांकडून जबर मारहाण झाल्यामुळे कायद्याची पदवी घेत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी या युवकाचा मृत्यू झाला. त्याची एसआयटी चौकशी करून संबंधित दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच महाराष्ट्राच्या निवडणुकांमध्ये मराठा विरुद्ध ओबीसी, ओबीसी विरुद्ध अल्पसंख्यांक, या सर्वांच्या विरोधात छोट्या जाती व दलित समाजामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारामध्ये झालेल्या जातीयवादी प्रचाराचा दुष्परिणाम होऊन बीडमध्ये संतोष देशमुख या सरपंच असलेल्या युवकाच्या जबर मारहाणीत मृत्यू झाला. त्याचीही एसटी चौकशी करण्यात येऊन संबंधितावर कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी उत्तम नवगिरे, राहुल सावंत, शेखर बंगाळे, श्याम कदम, मिलिंद प्रक्षाळे, रशीद सरदार, एजाज कनुल, प्रवीण चाफाणी, सोहेल शेख आदी विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नाट्य परिषदेच्या सभेत कलावंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेची सन २०२३-२४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा परिषदेच्या स्व. पद्माकर देव सभागृहात संपन्न झाली. ही सभा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी परिषदेचे उपाध्यक्ष विठ्ठल बडगंची व अशोक किल्लेदार सहकार्यवाह व नियामक मंडळ सदस्य सुमित फुलमामडी व प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी परिषदेच्यावतीने पुढील वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांनी दिली.



महाराष्ट्रात नावाजलेली सुशील करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा सलग बारा वर्षे परिषदेने सुरू ठेवली होती. काही कारणास्तव मागील तीन वर्षात या स्पर्धा होऊ शकल्या नाहीत. महाराष्ट्रातून सर्व कलावंतांची याबाबत विचारणा होत आहे. म्हणून ही स्पर्धा पुनश्च सुरू करण्याचा परिषदेचा मानस असल्याचे व त्यासाठी सर्व पदाधिकारी, आजीव सदस्य व कलावंतांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे, असेही आवाहन अध्यक्षांनी केले. मध्यवर्ती मुंबईच्या वतीने नाट्य परिषदांचे आजीव सभासदांना ओळखपत्र देण्याचे ठरले असल्यामुळे सोलापूर शाखेच्या आजीव सभासदांनी आपले फोटो व माहिती परिषदेच्या कार्यालयात जमा करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. याप्रसंगी परिषदेचे उपाध्यक्ष विठ्ठल बडगंची, अशोक किल्लेदार, प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे, सहकार्यवाह व नियामक मंडळ सदस्य सुमित फुलमामडी, सुहास मार्डीकर,कोषाध्यक्ष विद्या काळे कार्यकारणी सदस्य आनंद खरबस, पद्माकर कुलकर्णी, व्यंकटेश रंगम, प्रशांत देशपांडे, उमेश बटाणे, मिलिंद पटवर्धन, संतोष उदगिरी तसेच सुनील गुरव,नसीम पठाण हिरालाल धुळम आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. जोतिबा काटे व सुहास मार्डीकर यांनी केले तर आभार ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी मानले.

**नाट्य स्पर्धेतील गुणवंतांचा सत्कार**

महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या हौशी राज्य नाट्य स्पर्धेमध्ये सोलापूर केंद्रातून सादर झालेल्या व पारितोषिक प्राप्त अशा नाट्य संघांचा व कलावंतांचा सत्कार यावेळी करण्यात आला. यामध्ये अखिल भाविक वारकरी सांप्रदायिक मंडळ सोलापूर या संस्थेचा तसेच अनघ नाट्यमंदिर सोलापूर व श्रुती मंदिर सोलापूर या संस्थांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर दिग्दर्शन द्वितीय पारितोषिक प्राप्त राजेश जाधव, प्रकाश योजना उमेश बटाणे, रंगभूषा रमेश श्रावण, उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक ऋतुराज अरसिद तसेच अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्र मिळवणाऱ्या सुनंदा शेंडगे, अर्चना सलवारू, अरविंद माने, अशोक किल्लेदार, अमृत ढगे आदी कलावंतांचा सत्कार तसेच जगातील सर्वात मोठा, शंभर दिवस चालणाऱ्या नाट्य महोत्सवात सोलापुरातून रसिक ही हिंदी एकांकिका सादर करणाऱ्या नक्षत्र थिएटरचे अध्यक्ष सुमित फुलमामडी यांचा विशेष सत्कार याप्रसंगी करण्यात आला. नाट्य परिषदेच्या वतीने सलग पाच वर्ष व्यंकटेश रंगम यांनी राज्य नाट्य स्पर्धेत सहभाग नोंदवल्याबद्दल त्यांचाही सत्कार याप्रसंगी करण्यात आला.

# ड्रीम फाउंडेशनतर्फे गुरुवारपासून हुरडा महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

ड्रीम फाउंडेशन व बसव संगम शेतकरी गट यांच्या वतीने शेतकरी ते ग्राहक थेट हुरडा पार्टी उपक्रमातर्गत अस्सल सोलापूर हुरडा महोत्सवाचा शुभारंभ गुरुवार दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे, अशी माहिती संयोजक काशीनाथ भतगुणकी यांनी पत्रकार परिषदेत दिली. हुरडा प्रेमींसाठी सवलतीत हुरडा पार्टी सोलापूर शहरात जुळे सोलापूर (श्री सिध्देश्वर भोजनालय, टेरेस गार्डन), सोरेगांव (चाणाक्य गुरुकुल), अक्कलकोट रोड, कुंभारी (हॉटेल त्रिनेत्र प्युवरव्हेज अॅन्ड फार्म), हत्तरसंग कुडल (श्री संगमेश्वर मंदिर परिसर) याठिकाणी सकाळी १० ते सायंकाळी ७ यावेळेत हुरडा व गावरान चुलीवरचे जेवण उपलब्ध असून या महोत्सवात लोकांनी सहभागी होवून हुरडा पार्टीचा आनंद घ्यावा. ग्रुप बुर्कीगसाठी विशेष सवलत असून घरगुती पार्टीसाठी होलसेल दरात हुरडा घेण्यासाठी सतीश पाटील मो. नं ७२१९०९९९५५ या नंबर वर संपर्क साधावा. असे आवाहन काशिनाथ भतगुणकी यांनी केले आहे.

**शुक्रवारी पाक कला स्पर्धा**

राजमाता जिजाऊ भाकरी केंद्र व शिवांश मसाले तर्फे महिला व युवतींसाठी शुक्रवार दि. २० डिसेंबर रोजी पाक कला स्पर्धेचे आयोजन केले आहे. यात सहभागी होण्यासाठी संयोजिका संगीता भतगुणकी (मो. नं ८४८४९५२०२०)यांच्याकडे नोंदणी करावी. स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र भेट वस्तू व रोख पारितोषक देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

## संक्षिप्त वृत्त



### सतिश चव्हाण यांना पुरस्कार प्रदान

**वैराग, दि.१६ डिसेंबर-**

श्री नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ मळेगाव संचलित तुळशीदास जाधव प्रशाला वैराग येथील मुख्याध्यापक सतिश चव्हाण यांना महाराष्ट्र राज्य शाळा कृती समिती यांचे तर्फे कृतिशील मुख्याध्यापक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध व्याख्याते श्रीमंत कोकाटे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार श्री दत्तात्रय सावंत, संस्थापक अरुण (दादा) बारबोले, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष पुजारी उपस्थित होते. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्राचार्य सतीश चव्हाण यांना प्रमाणपत्र ट्रॉफी व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यात मोलाचे योगदान राहिलेले आहे. मुख्याध्यापक सतीश चव्हाण यांना कृतिशील मुख्याध्यापक पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व्ही. बी. पिसाळ, जनरल सेक्रेटरी सखुबाई गडसिंग, खजिनदार ज्ञानदेव आगलावे, उद्योजक लक्ष्मणराव पाचकवडे, उद्योजक सतीश वाघ, सहसचिव हेमंत गडसिंग, उपाध्यक्ष प्रमोद जगताप, संचालक एल. वाय. पाटील, संचालक विलास मिरगणे, प्राचार्य विकास बोराडे, माजी प्राचार्य प्रभाकर गव्हाणे, पर्यवेक्षक चंद्रकांत इंगळे तसेच सर्व संचालक मंडळ, आजी माजी प्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, कुटूंबिय, मित्र परिवार, कळंबवाडी ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.



### दिनदर्शिकेचे थाटात प्रकाशन

**मोडनिंब, दि. १६ डिसेंबर-**

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार गटाचे कट्टर समर्थक उद्योजक उदय माने यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. अजित पवार यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड झाल्यामुळे माने यांनी पवार यांची देवगिरी बंगल्यावर भेट घेऊन त्यांचा पांडुरंगाची मूर्ती देऊन सत्कार केला. उद्योजकउदय माने हे सध्या उदयकिर्ती अर्बन बँकेचे चेअरमन, उदयकिर्ती एंटरप्राइजेसचे मालक, माजी पंचायत समिती सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते म्हणून प्रामाणिकपणे काम करत आहेत. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे, पुण्याचे बिल्डर प्रवीण, सतीश सुर्वे, दीपक सुर्वे, राजू गोमे, गणेश कोळी, आकाश कोळी, दादासाहेब सुरवसे, दादासाहेब चव्हाण, गणेश रणदिवे, सावता माळी, साईप्रसाद काळे, सागर काळे, कुर्मुदास काळे, प्रशांत कदम, नवनाथ कावरे, दीपक व्यवहारे, संजय सुर्वे, जाफर मुलाणी, प्रताप रणदिवे उपस्थित होते.



### साई होमिओपॅथी कॉलेजमध्ये जागतिक मानवी हक्क दिन साजरा

**वैराग, दि. १६ डिसेंबर-**

सासुरे वैराग येथील साई होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालयात जागतिक मानवी हक्क दिनजनजागृतीने साजरा करण्यात आला. यावेळी स्मार्ट सिटी सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.त्र्यंबक डेंगळे पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साई होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य व वैद्यकीय अधीक्षक डॉ.अशोक अनपट होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. स्वादिका देशमुख, प्राध्यापिका, ऑर्गनॉन ऑफ मेडिसीन विभाग यांच्या परिचयाने झाली, ज्यांनी आरोग्य सेवेतील मानवी हक्कांचे महत्त्व आणि त्यापुढील महत्त्वावर अभ्यासपूर्ण विवेचन करून दिवसाची सुरुवात केली. डॉ. सपना मलमे आणि डॉ. कोमल जामदार, साई होमिओपॅथी रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, तसेच महाविद्यालय कर्मचारी विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. डॉ. वर्षा कुंभार यांनी आभार मानले.



### सुळेवाडी येथे विक्रम सुळे मित्र परिवारातर्फे आधार कार्ड शिबीर

**पिलीव, दि. १६ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील विक्रम सुळे मित्र परिवाराच्यावतीने वतीने सुळेवाडी येथील नागरिकांसाठी लोकमंगल सुतेचे लक्ष्मण करे यांच्या विशेष सहकार्याने मोफत आधार कार्ड शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नवीन आधार कार्ड काढणे, आधारकार्डला मोबाईल नंबर लिंक करणे, आधार कार्डवरील नाव, जन्मतारीख, फोटो याची दुरुस्ती करणे, आधार कार्ड अपडेट करणे या सुविधा नागरिकांना पुरविण्यात आल्या. या शिबिराचे आयोजन सुळेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत करणयात आले होते. सदरच्या शिबिरामध्ये सुळेवाडी येथील जवळपास ७६ नागरिकांनी लाभ घेतला.

# वृक्षमित्राने बनविले पाच लाख बीजगोळे

**मोफत वाटपातून वृक्षमित्र आनंद नगरकर करत आहेत वृक्षलागवडीसाठी प्रयत्न**

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. १६ डिसेंबर-**

तुळशीची आठ रोपे वाटून २००८ मध्ये आपल्या कार्याची 'हटके' सुरुवात त्याने केली. आजतागायत त्याचं काम अखंड चालू आहे. पुढे नुसती रोपं वाटण्यापेक्षा सिडबॉल्स (बीजगोळे) चे महत्व जास्त आहे हे लक्षात घेवुन ते बनविण्याचा चंग या अवलियाने बांधला. एक नाही, दोन नाही तर बघता बघता आंबा, चिंच, जांभूळ, पेरू, सीताफळ, रामफळ, शेवगा, चिकू आणि शेवरी... या सहज वाढणाऱ्या झाडांचे सुमारे पाच लाख बीजगोळे या वृक्षमित्राने त्याच्या छोट्याशा घरात तयार केले.

विशेष म्हणजे कुटुंबियांसह स्वत: राबुन तयार केलेली रोपे, बीजगोळे एक रुपयाही न घेता हा अवलीया वृक्षमित्र सर्वांना मोफत वाटप करतो आहे. अशा या अवलीया वृक्षमित्राचे नाव म्हणजे आनंद नगरकर.

शिक्षण होवून देखील सरकारी नोकरी नसल्यामुळे खासगी क्लासेसव्दारे विद्यार्थ्यांना ज्ञानदान करुन प्रपंचाचा गाढा हाकीत आनंद नगरकर वृक्षसंवर्धनासाठी प्रचंड मेहनत घेत आहे. त्याच्या या कार्याला पत्नी हर्षदा व मुलगी शारदा आणि वृध्द वडिलांचा तसेच मोठा भाऊ आणि वहिनीचा देखील मोठा हातभार आहे. आज सुमारे पाच लाखांचा हा आकडा डोळ्याचं पातं लवेपर्यंत वाचला जातो पण... एक ध्यास घेऊन एवढे बीजगोळे तयार करणे म्हणजे नॉट अ जोक.! मात्र याच सारं श्रेय तो स्वत:कडे न घेता आपल्या बरोबरच कुटुंबातील सर्व सदस्य, त्याच्या क्लास मध्ये येणारे सगळे लहानथोर विद्यार्थी यांच्या सहकार्याशिवाय होणे शक्य नाही असे तो आवर्जून सांगतो. वृक्षविक्रीतून काही तरी मोबदला मिळविणे, कोणताही पुरस्कार, प्रशस्तीपत्रक याची अपेक्षा न करता समाजभावनेतून तो हे महान काम करीत आहे. समाज भावनेतून जरी तो काम करीत असला तरी विविध सामाजिक संस्थां आणि व्यक्तींतर्फे सुमारे चाळीसच्यावर विविध पुरस्कारांनी आनंदला सन्मानित करण्यात आलेले आहे. कुठेही, कधीही मित्रमंडळींच्या कार्यक्रमाचे... सत्कार समारंभाचे आमंत्रण 'आनंद' ला आले की आपल्या छोट्याशा पिशवीत... सिडबॉल्सच्या छोट्या पिशव्या आणि घरात तयार केलेली छोटी रोपे घेऊन तो आवर्जून त्या कार्यक्रमाला उपस्थित राहतो. कार्यक्रमाच्या ठिकाणी आयोजकांना तुमचं काय सत्काराचं द्यायचं ते द्या पण... आपल्या वतीने याचही वाटप करा.. तेवढंच अजून एक सामाजिक काम तुमच्या हातून घडू द्या, असं आनंद गंमतीने आयोजकांना म्हणत असतो. ग्रामीण भागातील शाळा, दिंड्यामधील वारकरी भक्त, मित्रांचे, नेत्यांचे, अभिनेत्यांची वाढदिवस, रक्तदान शिबिरे, गणेशोत्सव, हळदीकुंकू, हादगा आदी अनेक कार्यक्रमासाठी अनेक आयोजक त्याच्याकडून बीजगोळे घेऊन जातात. ही एक प्रकारे आपल्या कामाला लाभलेली अनमोल साथच आहे असे आनंद मानतो. हे काम माझं एकट्याचं नाही, आपण सगळे मिळून ते करू या असं तो सांगत असतो.



**मान्यवरांनी केले आनंदच्या कार्याचे कौतुक**

स्पोकन इंग्लीशच्या प्रसाराच्या माध्यमातून जवळपास शंभरच्या आसपास शाळांतून वृक्षसंवर्धन यावर आनंदची प्रबोधनपर व्याख्याने झाली आहेत. विविध राजकीय पक्षांमधील ज्येष्ठ नेते तसेच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून 'आनंद'च्या रोपांचा स्वीकार केला व त्याच्या कार्याला मनापासून शुभेच्छाही दिल्या जातात.

**वृक्षाबद्दलची माहिती किंवा मोफत वृक्षासाठी संपर्क साधा**

आनंद उर्फ वृद्धेश्वर नगरकर, पंढरपूर, (मो. ९९२१५३०६४०) या क्रमांकावर संपर्क साधून वृक्षलागवड आणि संवर्धनाच्या चळवळीत सहभागी व्हा असे देखील आनंद सर्वांना आवर्जून आवाहन करतो.



**आनंदकडून नेलेली ६५ ते ७० टक्के रोपे जगविली**

आजपर्यंत त्याने केलेल्या सुमारे पाच लाख बीजगोळ्यांपैकी उपलब्ध माहितीप्रमाणे सुमारे तीन ते साडेतीन लाख गोळ्यांचे रोपांमध्ये रूपांतर झालेय म्हणजेच सुमारे ६५ ते ७० टक्के वृक्ष लागवड झाली... हे बीजगोळे पावसाळ्याच्या दिवसात टाकल्याने नष्ट होण्याचे प्रमाण कमी आहे. आजपर्यंत त्याने मोफत वाटलेल्या अथवा त्याच्याकडून अनेकजणांनी मोफत घेऊन गेलेल्या हजारो रोपांपैकी ६० टक्के रोपे लोकांनी हौसेने जगवल्याचे आनंद आवर्जून सांगतो.

# अन्नछत्र मंडळात दत्त जयंती उत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ डिसेंबर-**

अवधूत चिंतन श्री गुरुदेवदत्त, सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज की जय...! च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात श्री दत्त जयंती सोहळा शनिवारी सायंकाळी न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वखाली भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

दरम्यान न्यासाच्या परिसरात असलेल्या श्री दत्त मंदिरात मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, विश्वंभर पुजारी यांच्या हस्ते विविध धार्मिक विधी नंतर श्रींच्या जयंतीनिमित्त गुलाल व पाळणा कार्यक्रम हिरकणी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा अलकाताई जन्मेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत व हजारो स्वामी भक्तांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. लक्षवेधी चांदीच्या पाळण्याला व श्री दत्त मंदिराला देखील गुलाबाच्या फुलाने सुशोभित करण्यात आले होते. पाळणा कार्यक्रमाच्या दरम्यान विविध भजनी मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. उपस्थित भक्तांना प्रसाद वाटण्यात आले. याप्रसंगी हिरकणी संस्थेच्या अनुसय्या फुगे, तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, स्वामिनिराजे अमोलराजे भोसले, समर्थ फुगे, सोनाली फुगे, लता मोरे, धनश्री पाटील, स्मिता कदम, पल्लवी कदम, सुवर्णा घाटगे, उज्वला भिसले, छाया पवार, कविता भोसले, सिमा फुटाणे, कल्पना मोरे, सत्यभामा मोरे, राजश्री माने, कोमल क्षिरसागर, शितल क्षिरसागर, स्वप्ना ग्राम व मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, मनोज निकम, प्रा.शिवशरण अचलेर, निखिल पाटील, प्रवीण घाडगे, विजय माने, राहुल इंडे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



## श्री दत्त जयंती उत्सवानंतर रविवारीही अक्कलकोटमध्ये जनसागर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ डिसेंबर-**

शनिवारी दत्तजयंती उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा झाला. दत्तजयंती उत्सवानंतर रविवारीही श्री तीर्थक्षेत्र अक्कलकोटी वटवृक्ष स्वामी मंदिर बुधवार पेठ समाधी मंदिर अन्नछत्र मंडळ, राम गल्ली, गुरुमंदिर, एकमुखी दत्तमंदिर, स्टेशन रस्ता, राजेराय मठ आदी ठिकाणी श्रीच्या दर्शनाकरिता दत्तजयंती उत्सवानंतरही भाविकांचा जनसागर लोटला होता.



यामुळे वटवृक्ष देवस्थान बरोबर आता स्वामीचे बुधवार पेठेतील समाधी मठ दर्शनार्थ दर्शन बारी मल्लीकार्जुन रस्त्याकडे जात असल्याने परिसर ही भविष्यात विकसित करणे गरजेच बनले आहे. श्री वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर अन्नछत्र मंडळ जोशी मठ टिळक गल्ली गुरुमंदिर बुधवार पेठ स्वामी समर्थ समाधी मंदिर राजेराय मठ सर्वच मंदिरात दर्शनार्थ रविवारीही प्रचंड गर्दी झाली होती. यामुळे बुधवार पेठ समाधी मठातील दर्शन बारी मल्लीकार्जुन मंदिराकडे गेली होती. आगामी काही काळात विरीत समाधी मठ परिसरही त्वरीत विकसित करणे गरजेचं होणार आहे.

# कात्राळ येथे मावा बनविणाऱ्या ठिकाणावर पोलिसांचा छापा

**७ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त, पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१६ डिसेंबर-**

कात्राळ येथील शिवारात असलेल्या एका पत्राशेडमध्ये सुगंधी मावा अवैधरित्या बनविणाऱ्या ठिकाणावर मंगळवेढा पोलिसांनी छापा टाकून ७ लाख ४० हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून अरिफ इब्राहिम शेख (वय २०), सागर शरणप्पा अलकुंटे (वय १९), सतीश शरणप्पा बनसोडे (वय १९), सर्व राहणार हाविनाळ, मुबारक महिबूब मुल्ला (वय २४,देवरनिंबर्गी),महिबूब इब्राहिम शेख (वय २२ रा. चडचण) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेली माहिती अशी, कात्राळ येथील एका शेतात असलेल्या पत्राशेडमध्ये काही इसम एकत्र येऊन प्रतिबंधित सुगंधी मावा मशिनव्दारे अवैधरित्या तयार करत असल्याची गोपनीय माहिती पोलिस निरीक्षक महेश ढवाण यांना मिळताच त्यांनी पोलिस उपनिरीक्षक नागेश बनकर,पोलिस उपनिरीक्षक विजय पिसे,पोलिस हवालदार महेश कोळी यांचे पथक खासगी वाहनाव्दारे पाठवून सदर घटनेची खातरजमा केली असता यावेळी पोलिस पथकांना वरील आरोपी एकत्र बसून एका मशिनव्दारे काहीतरी तयार करून पुड्या बांधत असल्याचे निदर्शनास आले.याबाबत पोलिसांनी मशिनव्दारे काय तयार करत आहात? असे विचारले असता आम्ही सुगंधी मावा तयार करत असल्याची आरोपींनी माहिती दिली.पोलिसांनी या घटनास्थळावरून एकूण ७ लाख ४० हजार ४०० रुपये किमतीच्या मशिनसह अन्य सुगंधी मावा बनविण्यासाठी लागणारे साहित्य पोलिसांनी जप्त करून अन्न औषध प्रशासन विभाग सोलापूर यांच्याकडे सादर केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. ही कारवाई कोल्हापूर परिक्षेत्र विभागाचे पोलिस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी,अप्पर पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी केली आहे.



# ओंकार कारखाना तीन हजार दर देणार

**२ हजार ८०० रुपये पहिला हप्ता; चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांची माहिती**

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १६ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखाना २०२४-२५ या वर्षात गळीतास येणाऱ्या उसाला पहिला हप्ता २,८०० रुपये तर उर्वरित हप्ता बैल पोळयासाठी १०० व दिपवाळीला १०० रुपये असा ३,००० हजार रुपये एवढा दर देणार असल्याचे कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी सांगितले.

दिपावलीनिमित्त गळीतास आलेल्या शेतकऱ्यांना मोफत साखर देणार असल्याचे कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी सांगितले. कारखान्याचे संचालक रेखाताई बोत्रे पाटील व प्रशांत बोत्रे पाटील यांच्या मार्गदशनाखाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचा व चांगला दर देणयाचा प्रामाणीकपणे प्रयत्न केला असल्याचे त्यांनी यावेळी सांगीतले. सध्या कारखान्याची गाळप क्षमता वाढविणयात आली आहे तसेच उपपदार्थ निर्मिती सुरु केली असल्याने शेतकऱ्यांना चांगला दर देणे शक्य होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांनी ऊस ओंकार साखर कारखान्यास दयावा, तसेच कारखाना प्रशासन शेतकऱ्यांनची बिले वेळेवर देणार आहे.



ऊस दराबाबत आपली कोणाबरोबर अजिबात स्पर्धा नाही पण शेतकरी, कर्मचारी व वाहतुकदार यांचे हित जोपासण्याचा प्रामाणीकपणे प्रयत्न करणार आहे. ओंकार साखर कारखाना पहील्यापासूनच सर्वांचे हित जोपासत आला आहे भविष्यात सुद्धा सर्वांचे हित हा कारखाना जोपासण्याचे प्रामाणीकपणे प्रयत्न करणार आहे यामुळे सर्वांनी कारखान्यास सहकार्य करणयाचे आवाहन चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी अनुभवली साखर आणि कापसाच्या प्रक्रियेची 'शाळा'

**खांडवीच्या जिजाऊ गुरुकुलची अनोखी शैक्षणिक सहल**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ डिसेंबर-**

तालुक्यातील खांडवी येथील जिजाऊ गुरुकुलने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवी दिशा देत १४ डिसेंबर २०२४ रोजी इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक आगळीवेगळी शैक्षणिक सहल आयोजित केली. या सहलीत विद्यार्थ्यांनी माढा तालुक्यातील म्हैसगाव येथे असलेल्या ओंकार शुगर को-ऑपरेटिव्ह प्रायव्हेट लिमिटेड आणि विठ्ठल टेक्स्टाईल प्रायव्हेट लिमिटेड या दोन उद्योगांना भेट दिली.

विशेष म्हणजे, जिजाऊ गुरुकुलातील बहुतेक विद्यार्थी हे शेतकरी कुटुंबातून आलेले आहेत. त्यांनी आपल्या शेतात पिकवलेल्या उसाची साखर तयार होण्यापर्यंतची प्रक्रिया आणि कापसाचे कपड्यांमध्ये रुपांतर कसे होते, हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी ही सहल आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी ऊस क्रशिंग, साखर निर्मिती, कापसाचे धाग्यात रुपांतर आणि वस्त्रोद्योगातील विविध तंत्रज्ञान यांचा अनुभव घेतला.

सहलीत १५० विद्यार्थी आणि शिक्षकांनी सहभाग घेतला. संस्थापक अध्यक्ष श्री. संभाजी घाडगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य संदेश कदम सर यांनी सहलीचे नियोजन केले. त्यांना सहशिक्षक दयानंद ठोंबरे, शिवाजी माने, सहशिक्षक गणेश वाडेकर, सद्दाम शेख, सौ. मनीषा मोठे, सौ. वैशाली क्षीरसागर आणि सौ. दीपाली कादे यांची महत्वपूर्ण साथ मिळाली. शेतीवर आधारित औद्योगिक प्रक्रियांची माहिती देण्याबरोबरच, विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायाचे मूलभूत कौशल्य रुजवणे हा या सहलीचा मुख्य उद्देश होता. ऊस आणि कापसावर प्रक्रिया होणारी उपकरणे, उत्पादने तयार करण्याच्या पद्धती आणि या मागील व्यवस्थापन यांचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांना करता आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ तंत्रज्ञानच नव्हे तर शेतमालाचे मूल्यवर्धन कसे करता येईल, याचाही धडा घेतला.

साखर कारखान्यातील कामकाज पाहून आम्हाला प्रत्यक्ष अनुभव घेता आला. शेतमालाचा उपयोग कसा केला जातो आणि त्यातून उत्पादने कशी तयार होतात, हे शिकण्याची ही संधी होती, असे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. यावेळी सचिवा वर्षाताई घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, मेजर जे. बी. शिंदे व इतर सहशिक्षक उपस्थित होते.



**हा आहे मुख्य उद्देश**

गुरुकुलचा मुख्य उद्देश केवळ शिक्षण देणे नाही, तर विद्यार्थ्यांना जीवनाचे व्यावसायिक आणि सामाजिक पैलू शिकवणे आहे, असे मत प्राचार्य संदेश कदम यांनी ओमकार शुगर युनिटचे कार्यकारी व्यवस्थापक श्री मकरे सर यांचा सत्कार व आभार व्यक्त करत असताना नमूद केले.जिजाऊ गुरुकुलचा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या विकासाचा नवा आदर्श निर्माण करणारा ठरला आहे, असे मत जिजाऊ गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे यांनी व्यक्त केले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दीक्षाभूमीच्या दर्शनाने नवी ऊर्जा मिळाली : आ. डॉ. बाबासाहेब देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १६ डिसेंबर-**

आ. डॉ. बाबासाहेब देशमुख हे विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी नागपूर येथे असून त्यांच्या आमदारकीच्या कारकिर्दीतील हे पहिलेच अधिवेशन आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी नागपुरातील पवित्र दीक्षाभूमीला भेट देत अभिवादन केले. पवित्र



दीक्षाभूमी येथे भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करण्याचे भाग्य मला मिळाले. यामुळे खूप प्रसन्न वाटत आहे. पवित्र दीक्षाभूमीच्या दर्शनाने नवी ऊर्जा मिळाली असून दीक्षाभूमी सर्वांना निश्चितच प्रेरणा देत राहील अशा भावना आ. डॉ. बाबसाहेब देशमुख यांनी दीक्षाभूमीवर व्यक्त केल्या.



## संक्षिप्त वृत्त...



### परभणीतील 'त्या' पोलिसांवर सदोष मनुष्य वधाचे गुन्हे दाखल करावेत

**मोहोळ, दि. १६ डिसेंबर-**

मानव अधिकार व भ्रष्टाचार निवारण संघटनच्या वतीने परभणी येथील घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. या प्रकरणाची उच्च स्तरिय चौकशी करण्यात यावी संविधानाच्या प्रतिकाची मोडतोड करणारावर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करावेत कोंबींग ऑपरेशन थांबवावे, पोलिसांच्या मारहाणीत भिमसैनिकाचा जिव गेला त्या पोलिसावर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. या मागण्याचे निवेदन मोहोळचे तहसिलदार सचिन मुळीक यांना देण्यात आले. यावेळी रिपब्लिकन श्रमिक बिग्रेडच्या वतीनेही निवेदन देण्यात आले. याप्रसंगी मानव, संजय आठवले, पोपट कापूरे, ॲड. आकाश कापूरे, ॲड. अमर लंकेश्वर, संजय लोंढे, हरी सरवदे आदी उपस्थित होते.



### संतोष सरवळे यांना पुरस्कार प्रदान

**वैराग, दि. १६ डिसेंबर-**

वैराग येथील शारदादेवी प्रशालेचे मुख्याध्यापक संतोष सरवळे यांना महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने कृतिशील मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संतोष सरवळे हे वैराग येथील शारदादेवी प्रशालेत मुख्याध्यापक म्हणुन कार्यरत असून ते उपक्रमशील असल्याने त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने शनिवारी १४ डिसेंबर रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह बार्शी येथे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, माजी नगरसेवक अरुण बारबोले, प्रा. कोकाटे तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष संतोष निंबाळकर, नगरसेवक शाहुराजे निंबाळकर व सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.




### विशाल काटकर यांना उत्कृष्ट विक्रेता पुरस्कार प्रदान

**सांगोला, दि. १६ डिसेंबर-**

सांगोला येथील विनायक ट्रेडिंग कंपनीचे विशाल रमेश काटकर यांना गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेड कंपनीचा २०२४ सालातील उत्कृष्ट विक्रेता पुरस्कार प्रदान करण्यात आला. गोवा येथे गोदरेज ॲग्रोव्हेट लि.कंपनी यांच्यावतीने सीईओ कॅप्टन ए. वाय. राजेंद्र, जनरल बिझनेस हेड ए. एम. ढोले यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन विशाल काटकर यांना गौरविण्यात आले. यावेळी रमेश काटकर, सेल्स मॅनेजर पी.एन.भोपळे, सेल्स ऑफिसर पांडुरंग रणवरे उपस्थित होते. विशाल काटकर यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### पिलीव परिसरात दत्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**पिलीव, दि. १६ डिसेंबर-**



माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात दत्तजयंती मोठ्या उस्हात व भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. सर्व दत्त मंदीरात भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. यावेळी दत्त मुर्तीस अभिषेक, किर्तन, भजन, श्री दत्त जन्माचा पाळणा, फुलाचा कार्यक्रम, आरती करण्यात आली. यामध्ये पिलीव येथील विठ्ठलवाडी येथे पिलीव चौकीनजीक, महादेव मंदीरावर, किरण आर्वे यांच्या घराजवळ, भैस सुळेवस्ती येथे, झिंजेवस्ती येथील कदमवस्ती येथे शिवाजी इंगळेवस्ती येथे श्रीराम गल्ली येथे बचेरी येथे डॉ. निलेश कांबळे वस्ती येथे बचेरी येथील श्रीराम मंदिर येथे तसेच कुसमोड, सुळेवाडी, गावात विविध ठिकाणी दत्तजयंती मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली.

## बार्शीतील १३८ गावांत 'ॲग्रीस्टॅक' योजना राबविणार

### केंद्र शासनाची मोहीम; एकाच प्लॅटफॉर्मवर शेतकऱ्यांना सर्व माहिती मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी/वैराग, दि. १६ डिसेंबर-**

केंद्र शासनाने ॲग्रीस्टॅक' योजनेच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या असून ॲग्रीस्टॅक हे कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने पोहोचण्यासाठी काम केले जाणार आहे. बार्शी तालुक्यातील १३८ गावांत योजना राबविली जाणार आहे. महसूल विभाग आणि कृषी विभागाकडून हे काम केले जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांची सर्व माहिती एकाच प्लॅटफॉर्मवर येणार आहे आणि शेतकऱ्यांना नव्या योजनांचा लाभ घेण्यासाठी फायदा होणार आहे.

केंद्र शासनाने 'ॲग्रीस्टॅक' योजनेच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या असून ॲग्रीस्टॅक हे कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने पोहोचण्यासाठी स्थापित केले जाणारे फाउंडेशन आहे.

पथदर्शी कार्यक्रमातील आशादायक व दूरगामी परिणाम करणाऱ्या या योजनेची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रात कालबद्ध पद्धतीने करण्याचे महाराष्ट्र शासनाने निश्चित केले आहे. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषी व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेताचा आधार संलग्न माहिती संच तयार करण्यात येत आहे. त्यामुळे उपलब्ध आकडेवारीच्या आधारे शेतकरी बांधवांना विविध योजनांचा लाभ वितरित करण्यासाठी सुलभता येईल आणि लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणीकरणाची आवश्यकता राहणार नाही. ही योजना



**शिबिरात सहभागी व्हा : तहसीलदार शेख**

बार्शी तालुक्यातील गावांसाठी मोहीम राबवली जात आहे. सर्व शेतकरी बांधवांनी त्यांच्या गावात आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिरात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत आणि ॲग्रीस्टॅक योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार शेख यांनी केले आहे.

महसूल विभाग, कृषी विभाग आणि ग्राम विकास विभाग यांच्या वतीने संयुक्तपणे राबविण्यात येत आहे.

दरम्यान, ॲग्रीस्टॅक योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना डिजिटल ओळख मिळणार आहे. विविध योजनेच्या लाभासाठी कार्ड उपयुक्त ठरणार आहे. कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे, याकरिता केंद्र शासनाची ॲग्रीस्टॅक योजना राज्यात राबविण्यात मान्यता देण्यात आलेली आहे. ॲग्रीस्टॅक योजनेची माहिती सांगताना तडवळे येथील ग्रामपंचायत कार्यालयात सांगण्यात आली. यावेळी मंडल अधिकारी विठ्ठल मेकाले, कृषी सहाय्यिका अश्विनी पाटील, तलाठी अरविंद कादे, ग्रामसेविका सीताबाई नागरगोजे तसेच शेतकरी उपस्थित होते.

> ॲग्रीस्टॅक योजनेच्या माध्यमातून विविध योजनेचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे सोयीचे होणार असून वेळेत मदत मिळेल. या योजनेची अंमलबजावणी १६ डिसेंबरपासून झाली असून गावोगावी शिबिर घेतली जाणार आहेत. यामध्ये शेतकऱ्यांनी सहभागी होऊन नोंदणी करावी.
>
> **-विठ्ठल मेकाले,**
> मंडल अधिकारी, सुर्डी

## मी वडार महाराष्ट्राचा संघटनेचा मोर्चा स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ डिसेंबर-**

अकलूज येथे गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान झालेल्या लाठी चार्ज प्रकरणी मी वडार महाराष्ट्राचा या संघटनेने केलेल्या सर्व मागण्या मान्य झाल्याने विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र यांच्या कार्यालयावर काढण्यात येणारा मोर्चा स्थगित करण्यात आल्याची माहिती पंढरपूर येथील पत्रकार परिषदेत रवी शिंदे यांनी दिली.

यावेळी मी वडार महाराष्ट्राचा या संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रवी शिंदे, माजी उपनगराध्यक्ष सुधीर धोत्रे, संजय बंदपट्टे, लक्ष्मण बंदपट्टे, नगरसेवक लखन चौगुले, मी वडार महाराष्ट्राचा संघटनेचे जिल्हाध्यक्ष दत्ता भोसले, सुधाकर बंदपट्टे,समाजसेवक संतोष धोत्रे, जिल्हा संपर्कप्रमुख दत्ता विटकर आदींसह वडार समाजातील बांधव उपस्थित होते. अकलूज येथे गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान वडार समाज बांधवांवर बेकायदेशीरपणे लाठीचार्ज हल्ला करणाऱ्या संबंधित पोलिसांवर कठोर कारवाई करण्यासंदर्भात अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. यानंतर कोणतीही




कारवाई न झाल्याने विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र यांच्या कार्यालयावर मोर्चा काढणार असल्याचा इशारा देण्यात आला होता.

याबाबत सोलापूरचे पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी मी वडार महाराष्ट्राचा या संघटनेच्या पदाधिकाऱ्याच्या शिष्टमंडळाला अकलूज येथे वडार समाज बांधवांवर झालेल्या लाटीचार्ज प्रकरणात पोलीस कर्मचारी श्रीकांत निकम, मनोज शिंदे, बकाल, सोमा माने या कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आल्याने तसेच वडार समाज बांधवांकडून करण्यात आलेल्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्याने १७ डिसेंबर २०२४ रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र यांच्या कार्यालयावर काढण्यात येणारा मोर्चा देखील स्थगित करण्यात आला असल्याची माहिती मी वडार महाष्ट्राचा या संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रवी शिंदे यांनी पंढरपूर येथील पत्रकार परिषदेत दिली.

**पंढरपुरात निषेध**

यावेळी परभणी येथे झालेल्या लाठी चार्ज प्रकरणात सोमनाथ सूर्यवंशी या वडार समाजातील कार्यकर्त्याचा मृत्यू प्रकरणी सदर घटनेचा निषेध देखील करण्यात आला.

## बुध्दिबळ स्पर्धेत ध्रुव पाटील, सिद्धांत कोठारी, सानवी गोरे, वेदांत पांडेकर, विवेक स्वामी अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ डिसेंबर-**

चेस क्लब बार्शीच्या सहकार्याने व सोलापूर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने काल दि. १५ डिसेंबर रोजी संत तुकाराम हॉल शिवाजी कॉलेज बार्शी येथे कै. मधुकर विनायक देशपांडे स्मृती चषक या स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी शितोळे बापू, भालके सर उपस्थित होते. स्पर्धेचा बक्षीस समारंभ स्पर्धे चे आयोजक डॉ. मनोज देशपांडे, प्रद्युम्न देशमाने यांच्याद्वारे झाला. परीक्षक म्हणून बावळे मॅडम, नितीन अग्रवाल सर यांनी काम पाहिले. सदरील स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. चंद्रकात उलभगत, सोमनाथ पांडेकर, विद्याधर जगदाळे, दत्ता पाटील , धनाजी लोखंडे, विलास घोळवे, दत्तात्रय गोरे यांनी परिश्रम घेतले. स्पर्धेमध्ये १३९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे- ७ वर्ष वयोगट- विवेक स्वामी, अभिराज पाटील, अद्वैक ठोंबरे, श्रुतिका भानवसे, अर्जुन सातारकर, रत्नेश घाणेगावकर, ईशा पटवर्धन.

९ वर्ष वयोगट- वेदांत पांडेकर, विवान दासरी, पृथा ठोंबरे, प्रथमेश पवार, अजिंक्य कांबळे, उत्कर्षा लोखंडे, मधुरा तोडकरी. १३ वर्ष वयोगट- सानवी गोरे, सार्थक उंबरे, वेद आगरकर, श्रीराम राऊत, क्षितिज सुरवसे, समीक्षा गुजर, रोशनी हाके. १६ वर्ष वयोगट- सिद्धांत कोठारी, सोहम गायकवाड, राघव भांदरगे, सागर पवार, देवदत्त पटवर्धन, प्रगती वैद्य, वेदिका घोळवे. खुला वयोगट- ध्रुव पाटील, शंकर साळुंखे, पवन जलथीपल्ली, विजय पंगुडवाले, दिनेश पाटील, विजय पटवर्धन, चंद्रकांत पवार, भगवान जाधव, शितल विधाते, अनन्या बाळपुरे. ज्येष्ठ नागरिक वयोगट-नंदकुमार सुरू, जयकुमार तोडकरी.

## रातंजन येथे १०१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ डिसेंबर-**

तालुक्यातील रातंजन येथील मानवता बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने अशोक नागटिळक महाराज यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजित केले होते. या रक्तदान शिबिरात १०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

अशोक नागटिळक महाराज यांच्या हस्ते रेबिन कापून शिबिराची सुरवात करण्यात आली. यावेळी १०१ जणांनी रक्तदान केले. यावेळी समाधान बनसोडे मालेगांव सरपंच, ज्योती शहाजी जाधव हत्तीजचे सरपंच, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक नागटिळक, सतीश वाघमारे माजी नगरसेवक, रवी राठोड सरपंच तांडा, रमाकांत जाधव पोलीस पाटील, संस्थेचे सचिव बापू नागटिळक, उर्मिला देशमुख, पोपट जाधव, महादेव काटकर, विजय पवार, निकील काटकर, सिद्राम नागरगोजे, डॉ. धीरज बनसोडे, सागर पारडे, बाळासाहेब जाधव उपस्थित होते.

संस्थेचे उपाध्यक्ष गौतम नागटिळक, महामानव संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भैरवनाथ चौधरी, बापू नागटिळक, विष्णू शिंदे, निलेश गिराम, ओंकार



कांबळे, सुरज रसाळ, गौतम वाघमारे, अरविंद आतकरे, किरण खुरंगळे, गणेश लंगोटे, रणजित जाधव, श्रीराज हजारे, समाधान डवरी, स्वप्निल भालशंकर, रितेश नागरगोजे, सनी काळे, बाळू क्षीरसागर, बाळू नागटिळक, ज्ञानेश्वर चव्हाण, अशोक प्रतिष्ठानचे कार्यकर्ते परिश्रम घेतले. भगवंत ब्लड बँकेचे अभय जगदाळे, अनिरुद्ध देशमाने, राधिका बेले, राधिका ढोंगे, प्राजक्ता नलवडे, रोहिणी शिंदे यांनी रक्त संकलन केले. सूत्रसंचालन भैरवनाथ चौधरी तर प्रस्तावना व आभार गौतम नागटिळक यांनी केले.

## मंगळवेढ्यात भरदिवसा घरफोडी

### कुटुंबीय देवाला गेल्याची संधी साधली; ६ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल पळविला

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १६ डिसेंबर-**

मंगळवेढा शहरातील उजनी कॉलनीत एक कुटुंबीय दत्त जयंतीनिमित्त कार्यक्रम व महाप्रसादास गेल्याची संधी साधून चोरट्यांनी भरदिवसा बंद घराचे कुलूप तोडून कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ६ लाख ४२ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेल्याची घटना भरदिवसा घडल्याने चोरीचा तपास लावणे पोलिसांना एक आव्हान ठरले आहे. दरम्यान अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकिकत,यातील फिर्यादी नितीन विठ्ठल कुंभार (वय३२) उजनी पाटबंधारे विभागात चालक असून ते कुटुंबासह उजनी कॉलनी येथे रहावयास आहेत. दि. १४ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता फिर्यादी व त्यांचे कुटुंब घराला कुलूप लावून उजनी कॉलनीत असलेल्या दत्त मंदिरात दत्त जयंती निमित्त असलेल्या कार्यक्रम व महाप्रसादासाठी गेले होते. कार्यक्रम आटोपून फिर्यादीचे कुटुंब घरी परतले त्यावेळी त्यांना घराचे लावलेले कुलूप दिसून आले नाही व घराचा कोयंडा वाकलेला दिसला. यावेळी फिर्यादी दरवाजा उघडून घरात जाऊन पाहिले असता घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम दिसून आली नाही. गेला माल पुढील प्रमाणे-२ लाख ७५ हजाराचे २.७५ वजनाचे दोन पाटल्या,५० हजार रुपये किंमतीच्या १ तोळा वजनाच्या २ अंगठ्या, २० हजार रुपये किंमतीची ४ ग्रॅम वजनाची अंगठी,१ लाख ४० हजार रुपये किंमतीचे २.८ वजनाचे सोन्याचे गंठण, ७५ हजार रुपये किंमतीचे १.५ वजनाच्या सोन्याची चैन,३५ हजार रुपये किंमतीची ७ ग्रॅम वजनाचे कानातील कर्णफुले व झुबे, ४७ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ६ लाख ४२ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरट्याने चोरुन नेला असल्याचे कुंभार यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने राज्यस्तरीय समूहनृत्य स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१६ डिसेंबर-**

कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात लौकिक प्राप्त केलेल्या शंकरनगर येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने दिनांक २२, २३ व २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत शालेय मुला-मुलींच्या राज्यस्तरीय समुहनृत्य स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी दिली.

शालेय मुला मुलींच्या सुप्त कलागुणांना चालना देऊन ते भावी जीवनात यशस्वी कलाकार बनावेत या उद्देशाने सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी या समुहनृत्य स्पर्धेचे आयोजन केले जाते. प्रताप क्रीडा मंडळाने अनेक नामवंत कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, नृत्य कलाकार निर्माण केले असून आज ते विविध माध्यमातून कार्यरत असून नावलौकिक प्राप्त करीत आहेत. प्रताप क्रीडा मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील यांच्याक मार्गदर्शनाखाली व शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या



अध्यक्षा स्वरूपारांणी मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धा संपन्न होत आहेत.

सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील स्मृतीभवन शंकरनगरच्या बादशाही रंगमंचावर होणाऱ्या या स्पर्धेसाठी एकूण पाच गट असून दिनांक २२ रोजी सकाळ सत्रात गट पहिला इयत्ता १ ते ४ थी (कॅसेट गीत), दुपार सत्रात गट दुसरा इयत्ता ५ वी ते ७ वी ग्रामीण व शहरी कॅसेट गीत (पारंपारिक लोकनृत्य), दिनांक २३ रोजी सकाळ सत्रात गट तिसरा इयत्ता ८ वी ते १० वी ग्रामीण (बॉलीवूड डान्स), व दुपार सत्रात गट ८ वी ते १० वी कॅसेट गीत शहरी (पाश्चिमात्य), दिनांक २४ रोजी दुपार सत्रात गट चौथा इयत्ता ५ वी ते १० वी कॅसेट गीत (प्रासंगिक नृत्य संवाद थीम डान्स), व सकाळ सत्रात गट पाचवा इयत्ता ११वी ते सर्व महाविद्यालयीन गट (प्रासंगिक नृत्य थीम डान्स) या गटांचे सादरीकरण होणार आहे. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, सचिव बिभीषण जाधव, स्पर्धा प्रमुख मुख्याध्यापक संजय गळीतकर, डॉ. विश्वनाथ आवड, दिलीप शिर्के, नामदेव काळे प्रमुख उपस्थित होते.

**प्रत्येक गटास रोख पारितोषिके**

प्रत्येक गटास रोख रकमेची पारितोषिके, प्रमाणपत्र, यासह शहरी व ग्रामीण गटास स्वतंत्र सर्वसाधारण विजेतेपद व फिरते चषक देण्यात येणार आहे.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वडगाव सि., त्रिकोळी येथे मारहाणीच्या घटना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

मुलांना लग्नाची वरात दाखविणाऱ्यास शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली तर दुसऱ्यास मोटारसायकल आडवी का लावली असे म्हणत मारहाण झाल्याच्या घटना घडली आहे. याबाबत माहिती अशी की, धाराशिव तालुक्यातील सिद्धेश्वर वडगाव येथे मुलांना लग्नाची वरात दाखवण्यासाठी गेलेल्या एकास तर उमरगा तालुक्यातील त्रिकोळी येथे मोटार सायकल आडवी का लावली म्हणून अज्ञात व्यक्तींनी शिवीगाळ करत मारहाण केली आहे. विनायक नामदेव पवार, वय ३० वर्षे, रा. दामलानाईक तांडा दाबका (गुं), ता.मुखेड जि. नांदेड व सोबत त्यांचे भाऊ राजु पवार हे बालाजी वाडीकर यांचे शेताजवळ त्रिकोळी शिवारात रोडवरुन मोटरसायकल वळवून घेताना मोटरसायकलवरील चार अनोळखी इसमांनी मोटरसायकल रोडवर आडवी का लावली असे म्हणून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, रॉड, काठी, बेल्ट व चाकूने मारहाण केल्याची फिर्याद विनायक पवार यांनी दिली. यावरुन गुन्हा नोंदवला आहे. आरोपी नामे आण्णा राणबा जाधव, रा. वडगाव सि., ता.जि. धाराशिव यांनी प्रेम म्हेत्रे यांचे घराजवळ वडगाव सिं येथे फिर्यादी नामे दिपक आडगळे, वय २७ वर्षे, रा. वडगाव सि. ता. जि. धाराशिव हे लहान मुलांना लग्नाची वरात दाखवण्यासठी गेले असता नमुद आरोपीने विनाकारण शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, पितळी पुंगीने मारहाण करुन जखमी केले. व जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

### संक्षिप्त वृत्त...



### अंधोरी येथे अँग्रीस्टेक योजनेचा शुभारंभ

**परंडा, दि.१६ डिसेंबर -**

अंधोरी तालुका परंडा येथे ॲग्रीस्टेक योजनेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी तहसीलदार काकडे, तालुका कृषि अधिकारी लांडगे, नायब तहसीलदार जाधव, तलाठी अत्तार, कृषि सहाय्यक गायकवाड व शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### नुतनची शैक्षणिक, ऐतिहासिक सहल संपन्न

**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

येथील नूतन प्राथमिक विद्यामंदीरने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आयोजित केलेली शैक्षणिक व ऐतिहासिक सहल ११ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत पाचाड येथील जिजाऊंचे समाधी स्थळ, राजधानी किल्ले रायगड, महाड येथील चवदार तळे, हरिहरेश्वर मंदिर, श्रीवर्धन येथील समुद्रकिनारा, किल्ले प्रतापगड व महाबळेश्वर येथील पर्यटन स्थळांना भेट देऊन सुखरूप परत आली. सहल यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील संजय जाधव, संतोष माळी, रमेश वागतकर, प्रवीण गोरे, सारिका उमरकर, उषा मिसाळ यांनी परिश्रम घेतले.

### आंबेडकर ग्रंथ पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**जळकोट, दि.१६ डिसेंबर -**

गौतम बुद्ध बुद्ध, फुले, शाहू व आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचारासाठी अलीकडेच प्रकाशित झालेल्या निवडक ग्रंथ किंवा पुस्तकांना ग्रंथ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. साहित्यिक लेखकांनी प्रकाशित पुस्तकाच्या तीन प्रतीसह दि.३० डिसेंबरपर्यंत प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन म.फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था, पुणे यांच्यावतीने करण्यात आले आहे. म.फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था, पुणे यांच्यावतीने दरवर्षी महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्काराने निवडक ग्रंथ किंवा पुस्तकांना सन्मानित करण्यात येते. सन २०२३-२४ साठी संस्थेच्यावतीने प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. साहित्यिक लेखकांनी जानेवारी २०२२ ते डिसेंबर२०२४ दरम्यान प्रकाशित झालेल्या पुस्तकाच्या तीन प्रतीसह दि.३० डिसेंबरपर्यंत प्रस्ताव अध्यक्ष /सचिव म.फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था, शुभकलश सोसायटी सर्वे नंबर ३३ प्लॉट नबर-४९ फ्लॅट (खोली) नंबर-२०३ लेन नंबर-१३ (पी) विद्यानगर, टिंगरे नगर, पुणे-३२ या पत्त्यावर पाठवण्याचे आवाहन म.फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था, पुणेचे अध्यक्ष ॲड.एल.टी.सावंत, सचिव प्रा.राजा सोनकांबळे, उपाध्यक्ष तुकाराम डावरे, शिवाजी डावरे, ग्रंथ पुरस्कार समिती प्रमुख प्रा.डॉ.दिपक गायकवाड यांनी केले आहे.

# धाराशिवजवळील खेड गावानजीक भानामतीचा प्रकार ; लिंबू, बाहूल्या, मिरच्याही सापडल्या

## ▶▶ चारही बाजूस टाकले होते उभे कापलेले हळद-कुंकूने भरलेले लिंबू ....

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

धाराशिव तालुक्यातील खेड गावात भानामतीचा धक्कादायक प्रकार समोर आला असून खेड गावच्या सिमेवर गव्हापासून बनवलेल्या महिलेची प्रतिकात्मक मूर्ती, खिळे टोचलेल्या बाहुल्या, हळद आणि कुंकुवाने भरलेले लिंबू टाकण्याचे प्रकार गेल्या पंधरा दिवसापासून आणून टाकत असल्याचे घटना घडत आहेत. यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



काही लोभासाठी किंवा अदृश्य आर्थिक लाभासाठी नरबळी देण्याच्या प्रकारामुळेच घाबरवण्यासाठी हा प्रकार असल्याची गावकऱ्यात चर्चा रंगली आहे. या प्रकारामुळे शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांनीही शेतात जायचे केले भीतीपोटी बंद केले आहेत. या संदर्भात पोलीस प्रशासनाला कल्पना देऊनही कोणीच फिरकले नसल्याची गावकऱ्यांची तक्रार आहे. नेमका कशामुळे हा प्रकार तपास करण्याची देखील मागणी गावकरी करत आहेत.

गेल्या काही दिवसापासून सुरु असलेला हा प्रकार आजही सुरुच आहे. उभा लिंबू कापून त्यामध्ये हळद व कुंकू टाकून कोपऱ्या कोपऱ्यावर टाकले जात आहेत. याशिवाय विविध प्रकारचे आसुरी नैवेद्यही टाकला जातो. अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून भानामती, करणी-जादूटोणा या सर्व मानवी मनाच्या कल्पना असल्याचे सांगून मनातील भीती दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु तरी देखील असे प्रकार समोर आले आहेत.

गावचे रस्ते नेहमीच गजबजलेले असतात, पण काळ्या जादूच्या या अघोरी प्रकारामुळे आता हे रस्ते, हे गाव सामसूम झाल्याचं चित्र आहे. गावकऱ्यांवर कुणीतरी करणी करत असल्याची भीती गावकऱ्यांच्या मनात बसली आहे.

## क्षयरोगमुक्त भारत : क्षयरोग चाचणीचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

सन २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त भारत अभियानाचा एक भाग म्हणुन केंद्रीय क्षयरोग विभाग,भारत सरकार, नवी दिल्ली यांनी सर्व राज्यांमध्ये सुप्त अवस्थेतील क्षयरोग संसर्गाच्या पुर्व निदानासाठी सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया यांच्यामार्फत क्षयरोग चाचणी मध्ये क्षय रुग्णांच्या संपर्कातील सर्व नातेवाईक/ व्यक्तींना सुरु करण्यासाठी उपलब्ध करुन दिली आहे.

क्षयरोग चाचणीचे जिल्हास्तरीय उद्घाटन नागरी आरोग्य केंद्र १ येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरीदास व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत बनसोडे, निवाशी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी फुलारी यांच्या हस्ते १३ डिसेंबर रोजी करण्यात आले. अतिजोखीमग्रस्त व क्षयरुग्णांच्या सहवासातील नागरिकांची तपासणी करणे गरजेचे आहे. ही तपासणी सर्व सार्वजनीक आरोग्य संस्थेमध्ये मोफत आहे.

ही चाचणी जिल्ह्यातील सर्व ग्रामीण, उपजिल्हा व जिल्हा रुग्णालयात तसेच सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र येथे मोफत स्वरुपात उपलब्ध आहे.

### निलेश माळी याची रग्बी आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१६ डिसेंबर -**

रांजणीच्या साई संगणक शास्त्र महाविद्यालयातील निलेश माळी याची अखिल भारतीय विद्यापीठा अंतर्गत चालू असलेल्या आंतर विद्यापीठ रग्बी स्पर्धेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संघात निवड झालेली आहे. दि.१६ ते १९ डिसेंबर या कालावधीत आंतर विद्यापीठ रग्बी स्पर्धा चंदीगड येथे संपन्न होत आहेत. या स्पर्धेचे प्रशिक्षक म्हणून शरद गवार यांची तर संघ व्यवस्थापक एम.के.साबळे यांची निवड झालेली आहे. या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष कृषिरत्न बी.बी.ठोंबरे, उपाध्यक्ष डी.आर.काळदाते, सचिव ए.बी.ठोंबरे, पी.एस.आवाड, समन्वयक बी.के.भातलवंडे, डॉ.ए.बी.जगताप, प्र.प्राचार्य जगदीश गवळीआदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## एनव्हीपी शुगरच्या प्रथम गळीत हंगामातील तिसऱ्या पंधरवाड्याचे ऊसबिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

### चेअरमन नानासाहेब पाटील यांची माहिती



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

धाराशिव तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा.लि.च्या वतीने प्रथम गळीत हंगामात गाळपासाठी आलेल्या तिसऱ्या पंधरवाड्याचे ऊसबिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांनी संबंधित बँकेत जाऊन आपले ऊसबिल घ्यावे, असे आवाहन कारखान्याचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी केले आहे.

एनव्हीपी शुगरचा चाचणी गळीत हंगाम यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर सन २०२४-२५ मध्ये प्रथम गळीत हंगामातही ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. चाचणी गळीत हंगामात दिलेल्या शब्दाप्रमाणे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी शेतकऱ्यांना पंधरा दिवसांत ऊसबिल देण्याचे दिलेले वचन प्रथम गळीत हंगामातही पूर्ण केले जात आहे. तिसर्या पंधरवाड्यात ०१ डिसेंबर ते १५ डिसेंबर या काळात शेतकऱ्यांनी गाळपास दिलेल्या ऊसाचे बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेले आहे. कारखान्याच्या वतीने दि.१५ डिसेंबर पर्यंत ४०,४६८ मे.टन ऊसाचे बिल पंधरवाडा संपल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात बिल जमा करणारा धाराशिव जिल्ह्यातील पहिला कारखाना ठरला आहे. तसेच यापुढेही शेतकऱ्यांचे ऊस बिल प्रत्येक पंधरवाडा संपल्यावर तात्काळ जमा करण्यात येणार आहे.

ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते दिले आहे, अशा शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन आपले आपले बिल घ्यावे. तसेच ज्यांनी खाते क्रमांक दिलेला नाही अशा शेतकऱ्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.धाराशिव बँकेत जाऊन आपले बिल घ्यावे, असे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी कळविले आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळा समिती नूतन कार्यकारिणीची निवड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या सन २०२४ - २५ या वर्षाकरिता नूतन कार्यकारिणीची निवड बैठक धाराशिव येथे संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या अध्यक्षपदी गौरव अशोकराव बागल यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी अमोल उद्धवराव सिरसट यांची निवड करण्यात आली.

यामध्ये समितीचे नूतन सचिव म्हणून मंगेश निंबाळकर यांची तर कार्याध्यक्ष म्हणून सुनीलराव मिसाळ यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सहकार्याध्यक्ष प्रसाद वीर, संघटक बबलू भोईटे, सहसंघटक सतीश थोरात, कोषाध्यक्ष विशाल गाढवे, सह कोषाध्यक्ष ज्योतीराम जाधव, प्रवक्ता शाहूराज गवाड, सहप्रवक्ता तानाजी खुणे, प्रसिद्धी प्रमुख अमोल साळुंके, सह प्रसिद्धीप्रमुख प्रवीण शित्रे, सोशल मीडिया प्रमुख वाजीद शेख व लिंबराज कुंभार तर कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड.अविनाश गरड यांची एकमताने निवड करण्यात आली.

या बैठकीत प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धेश्वर मते तर प्रास्ताविक ॲड. संजय शिंदे यांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे उपाध्यक्ष शशिकांत खुणे व माजी अध्यक्ष धर्मराज सूर्यवंशी यांनी भूषविले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अमोल पवार यांनी केले. यावेळी समितीचे बहुसंख्य आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### प्राण्यांची निर्दयपणे वाहतुक

**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

गोवंशीय जातीच्या जर्शी गायी वाहनासह अंदाजे २ लाख ५० हजार रुपये किंमतीचे वाहनामध्ये दाटीवाटीने बांधून निर्दयतेने वागणुक देवून त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता जनावरांचे कत्तलीसाठी बेकायदेशीर वाहतुक करत होता. तादूंळवाडी चौकता आला असता आरोपी नामे किरण तायप्पा शिंदे, रा. खंडोबा चौक परंडा ता. परंडा या अटक करण्यात आली. त्यांच्याविरुध्द अंबी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## परभणी घटनेच्या निषेधार्थ आज बेंबळीत पाळण्यात येणार बंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**

परभणी येथे झालेल्या संविधान प्रतिकृती विटंबनेचा आणि परभणी स्थित पोलीस कोठडीत झालेल्या एका भीमसैनिकाच्या हत्येच्या निषेधार्थ तालुक्यातील बेंबळी येथील ग्रामस्थांनी मंगळवारी १७ डिसेंबर रोजी बेंबळी बंदची हाक दिली आहे. बेंबळी भीमनगरातून संविधान संवर्धनाच्या घोषणादेत पोलीस ठाण्यापर्यंत एक रॅली



काढण्यात आली. यात गावातील सर्व जाती - धर्माचे संविधानप्रेमी नागरिक सहभागी झाले होते. पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश पाटील यांना नागरिकांनी एक निवेदन दिले. यावेळी माजी उपसरपंच बाळासाहेब माने, हणमंत जाधव, सलमान शेख, बालाजी माने, अंगुल माने, वैभव होळकर, सुरज माने, बालाजी सगट, दादा वाघे, हणमंत सरवदे, दादा वाळवे, गौतम वाळवे, लारा चव्हाण, अक्षय माने, विनोद होळकर आदींसह शेकडो नागरिक सहभागी झाले होते. दरम्यान परभणी घटनेच्या निषेधार्थ मंगळवारी बेंबळी बंदची हाक देण्यात आली असून यात गावातील सर्व लोकांनी सहभागी व्हावे. संविधानाप्रति आपली निष्ठा व्यक्त करावी असे आवाहन बंदच्या संयोजकांनी केले आहे.

# शिवसेनेचे प्रमुख नेते सावंतांचे मंत्रिपद हुकले नवी जबाबदारी मिळण्याची शक्यता?

## ✻ सुत्रांची माहिती... तुम्ही सावंतांना आमदार करा मी नामदार करतो राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला होता शब्द...

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१६ डिसेंबर -**

हिवाळी अधिवेशनाच्या अगोदर महायुती सरकारचा राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार दि.१५ डिसेंबर रोजी नागपूर येथे पार पडला. ३९ आमदारांना मंत्रिपदाची शपथ घेतली. भाजपच्या वाट्याला मुख्यमंत्री पद आले, असून १६ कॅबिनेट आणि ३ राज्यमंत्रीपदे आली आहेत. शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे हे स्वतः उपमुख्यमंत्री झाले असून त्याच्या वाट्याला ९ कॅबिनेट तर २ राज्यमंत्री मिळाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे प्रमुख अजित पवार स्वतः उपमुख्यमंत्री झाले आहेत. ८ कॅबिनेट तर १ राज्यमंत्रीपद त्यांना मिळाले आहे. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्रिमंडळात अनेक नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे, तर अनेक अनुभवी दिग्ज नेत्यांना मंत्रिमंडळात डच्चू मिळाला आहे.

दरम्यान यातील काही आमदार मंत्रिपद न मिळाल्यामुळे नाराज असल्याची माहिती राजकीय वर्तुळात सुरू आहे. तसेच प्रसार माध्यमातून देखील बातम्या येत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार यातील एक नाव म्हणजे तानाजी सावंत, सावंत हे शिंदेसेनेचे प्रमुख नेते आहेत. धाराशिव जिल्ह्यातील परंडा विधानसभा क्षेत्रातून ते निवडून आले आहे. त्यांनी सलग तीन वेळा आमदार राहिलेले शरदचंद्र पवार गटाचे राहुल मोटे यांचा दोन वेळा निवडणुकीत पराभव केला आहे.

मागील शिंदे सरकारमध्ये सावंतांनी राज्याचे आरोग्यमंत्री तसेच धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम पाहिले आहे. त्याचा अनुभव मोठा आहे. आरोग्यमंत्री असताना त्यांनी राज्यात नवीन जिल्हा रुग्णालय, तालुका रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय उभारणी केली.



स्वखर्चाने शेतकऱ्यांना शेतरस्त्या, नदी खोलीकरण, तरुणांना रोजगारनिर्मिती केली आहे. मागास म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धाराशिव जिल्ह्यायासाठी मोठा निधी खेचून आणत पदाला न्याय दिला होता. मात्र परंडा विधानसभेत झुकते माप दिले,असे म्हणत जिल्ह्यातील इतर नेत्यांनी त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रारी केल्या होत्या.

भाजप व अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांना महायुती असताना सोबत घेऊन काम केले नाही,असे आरोप दोन्ही पक्षांतील कार्यकर्ते, नेत्यांनी त्यांच्यावर केले होते. परंतु असे जरी,असले तरी काल नागपूर येथे पार पडलेला राज्यमंत्री मंडळाचा विस्तार सोहळा यात तानाजी सावंत यांचे नाव नसल्याने ते नाराज आहेत.

मंत्रिमंडळ स्थान न मिळाल्यामुळे सावंत शपथविधी सोहळ्याला राजभवनावर फिरकले नाहीत. जरी अश्या बातम्या प्रसार माध्यमातून समोर येत असल्या तरी सध्या त्यांचा मनात नेमके काय? विचार सुरू आहेत हे स्पष्ट नाही. हे मात्र खरे आहे की तानाजी सावंत यांनी पक्षातील बंडाच्या वेळी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांनी केलेले बंड महाराष्ट्राला यशस्वी करून दावले होते.

मात्र शिंदे सेनेत महत्वाचे नेते समजले जाणारे तानाजी सावंत यांना मंत्रिमंडळ विस्तारत मंत्रिपद न दिल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा रंगली आहे. मराठवाड्यात शिंदेसेनेला दोन मंत्रिपदं मिळतील अशी अपेक्षा नेत्यांना होती.

बीड, लातूर, धाराशिव आणि जवळच असलेल्या सोलापूर या चार जिल्ह्यातून एकच सेना आमदार तानाजी सावंत निवडून आले आहेत. धाराशिव जिल्ह्यातून महायुतीचे दोन आमदार निवडून आले आहेत. तुळजापूर मतदारसंघातून भाजपचे राणाजगजितसिंह पाटील हे निवडून आले आहेत.

तर परंडा विधानसभा मतदारसंघातून शिंदेचे तानाजी सावंत निवडून आले. जिल्ह्यात देखील एक भाजप आणि दुसरे सेना अशी दोन मंत्रिपदं मिळतील असे जिल्ह्यातील नागरिकांना आणि नेत्यांना वाटत होते. तर पुन्हा तानाजी सावंतच यांना मंत्रीपद फिक्स मिळेल अशी चर्चा होती.

मात्र मंत्रिमंडळाच्या संभाव्य यादीत सुरवातीपासून नाव नसणार हे सांगितले जात होते. कालच्या मंत्रिमंडळ विस्तरातून चित्र स्पष्ट झाले असून जिल्ह्याची धुरा दुसऱ्याच्या खांद्यावर नक्की जाणार. आता राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे तानाजी सावंतांची नाराजी कशी दूर करणार हे बघणे गरजेचे आहे. की येत्या काळात त्यांना नवी मोठी काय जबाबदारी देणार हे पाहणे गरजेचे आहे.

terna Knowledge to Empower | COLLEGE OF ENGINEERING
AICTE APPROVED | PCI APPROVED
DR. DBATU , LONERE AFFILIATED

DEPARTMENT OF PHARMACY
AGAINST CAP and INSTITUTE LEVEL ADMISSION NOTIFICATION
FIRST YEAR B. PHARMACY 2024-25
Institute Code 02130

Applications are Invited from eligible and aspiring candidates for admission to **First** Year**, Bachelor of Pharmacy (B. Pharmacy) course** for probable vacant seats if any after CAP rounds administered by DTE, Maharashtra and CET Cell and Institute level seats.

Schedule of Admission Activities

| Sr.No. | Activity | Date and Time |
|---|---|---|
| 1 | Inviting applications for against CAP vacancies If any and Institute level seats | 18-12-2024 to 22-12-2024 up to 02.00 PM |
| 2 | Display of provisional merit list | 22-12-2024 at 03.00 PM |
| 3 | Submission of grievance if any in person at Institute | 22-12-2024 up to 04.00 PM |
| 4 | Display of final merit list and allotment of seats | 22-12-2024 at 05.30 PM |
| 5 | Confirmation of admission in person with fulfillment of all original documents | 22-12-2024 to 23-12-2024 up to 03.30 PM |
| 6 | Cut-off Date for all type of admissions for the Academic Year 2024-25. (Online registration, Document Verification and Confirmation, E-Scrutiny for Admission for Against CAP Vacancy and Institute Level Seats) | 23-12-2024 up to 05.00 PM |

Schedule Subject to change from competent authority and kindly check admission notice board timely for any changes.
Please refer institute website www.coeosmanabad.ac.in for more details and Institute admission board for regular updates.

Contact: 9545314999, 7020096610
TPCT's College of Engineering
Dharashiv (Osmanabad) Campus
www.coeosmanabad.ac.in

SD/-
Dr. Vikramsinha Mane
Principal

# स्थलांतरित ऊसतोड मजुरांच्या ५२ मुलांनी धरला शाळेचा रस्ता

## स्थलांतरित विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी बालरक्षक पथकाच्या प्रयत्नांना यश

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१६ डिसेंबर - तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची बालरक्षक टीम ऊसतोड मजुरांच्या स्थलांतरित मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करत असून दि. १५ डिसेंबर रविवार रोजी सायंकाळी कोपरगाव येथील संजीवनी सहकारी साखर कारखाना ऊसतोडणी परीक्षेत्रात सह बारामती सहकारी साखर कारखाना , अहिल्यानगर जिल्हातील काष्टी ,श्रीगोंदा, बाबळेश्वर , सुपे तसेच सातारा जिल्हातील फलटण येथे जाऊन कन्नड तालुक्यातील पालकांचे व विद्यार्थ्यांचे मनोबल वाढून त्यांना परत शाळेत आणण्यासाठी प्रवृत्त केल्याने ऊसतोडी साठी गेलेल्या विद्यार्थ्यांपैकी तब्बल ५२ विद्यार्थी शाळेत परत आणण्यात या पथकाला यश आले असुन सोमवार रोजी हे विद्यार्थी वेगवेगळ्या शाळेत हजर राहणार आहेत.

या साठी अंबाला शाळेचे शिक्षक कल्याण पवार , हिवरखेडा (गौ.) शाळेचे शिक्षक दिलीप मगर, डी एस राजपूत,किशोर आगळे,ज्ञानेश्वर वाघ,यांनी कामगारांच्या स्थलांतरित मुलांना शाळेत परत आणण्यासाठी ऊसतोड मजुरांची भेट घेतल्या यामध्ये प्रामुख्याने जि. प. शाळा अंबाला,उपळा, गराडा, तांदुळवाडी, वडनेर, मुंडवाडी तांडा,आंबा तांडा,जेहुर तांडा येथील पालकांची समजूत काढून सर्व मुलांना शाळेत परत पाठवण्यासाठी शिक्षकांनी आग्रह धरला या विद्यार्थ्यांना हंगामी वसतिगृहात अथवा नातेवाईकाकडे मुलांना ठेवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. मुलांना शाळेत पाठवण्याचे व शिक्षणात खंड न पडू देण्याचे आश्वासन यावेळी पालकांनी दिले. या साठी जिल्ह्याशिक्षणाधिकारी (प्राथ.) जयश्री चव्हाण, गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बालरक्षक टीम, ऊसतोडणी कामगारांच्या राज्यभरात स्थलांतरित झालेल्या मुलांना शाळेत परत आणण्यासाठी प्रयत्न करत आहे.



सोयगाव शहरात संध्या थंडीचा जोर जास्त जाणवत आहे.तर सोयगाव शहरातील कृषी भूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी अरुण सोहणी यांची हिरवगार भरलेला गहू छायाचित्रात दिसत आहे.

(छायाचित्र - विवेक महाजन,सोयगाव)

## मराठवाड्यासह राज्यात पुरेशी सरकारी; सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू करा

### किसान सभेची मागणी

छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यासह राज्यातील खरिपाचे महत्त्वाचे पीक असलेल्या सोयाबीनला सरकारच्या धोरणामुळे आधार भावापेक्षाही कमी भाव मिळत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची मते मिळावीत यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले सरकार सोयाबीनला ६ हजार रुपये भाव देईल, अशी घोषणा केली होती. सोयाबीन खरेदीसाठीचा मॉईश्चर निकष सुद्धा १५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा करण्यात आली होती. तत्पूर्वी 'मोदी की गॅरंटी' म्हणून जाहीर करण्यात आलेल्या हमीभावाप्रमाणे सोयाबीनला ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल भाव देण्याचे जाहीर करण्यात आले होते.

प्रत्यक्षात मात्र या कोणत्याही आश्वासनाची पूर्तता करण्यात न आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष खदखदतो आहे. केंद्र व राज्य सरकारने तातडीने याबाबत हस्तक्षेप करून दिलेला शब्द पाळावा व किमान ६ हजार रुपये प्रतिक्विंटल प्रमाणे १५ टक्के मॉइश्चर असलेले सोयाबीन खरेदी करणारी केंद्रे प्रत्येक बाजार समितीत सुरू करावीत, अशी मागणी किसान सभेच्या वतीने करण्यात आली आहे. काही ठिकाणी हमीभावाप्रमाणे सोयाबीन खरेदीची केंद्रे सुरू करण्यात आली असली तरी सर्व बाजार समित्यांवर ही केंद्रे नसल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव केंद्रावर सोयाबीन वाहून नेण्यासाठी मोठा खर्च होत आहे. वाहतुकीचा खर्च न परवडल्यामुळे शेतकरी आपले सोयाबीन खासगी व्यापाऱ्यांना ४ हजार रुपये प्रतिक्विंटल प्रमाणे विकत आहेत.

## स्वामी समर्थ केंद्रात दत्त जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१५ डिसेंबर - स्वामी सेवा अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र कन्नड येथे दत्त जयंती साजरी करण्यात आली.

दि.१५ डिसेंबर रोजी सूर्योदयापासून पोर्णिमाला सुरुवात झाल्याने दिंडोरी प्रणित सर्व स्वामी समर्थ केंद्र येथे रविवारी १२ वा. दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी आमदार संजना जाधव यांच्या हस्ते दत्त महाराज व श्री स्वामी समर्थ प्रतिमेची आरती करण्यात आली.

सोमवार पासून सुरुवात झालेल्या या सात दिवसीय सप्ताहात अखंड नाम, जप, यज्ञ गणेश याग, मनोबोध याग, चंडी याग, स्वामी याग, रुद्र याग मल्हारी याग असे यागाचे आयोजन करण्यात येऊन गुरुचरित्र पारायण करण्यात आले यात २४० महिला व ३६ पुरुष सेवेकरींनी सहभाग घेतला होता तसेच दि.१६ डिसेंबर सोमवार रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे, या साठी केंद्र प्रतिनिधी रामकृष्ण मराठे , संजय शिरसागर, कल्याण चव्हाण, गणेश वाघ, गणेश शेजवळ ,नितीन लोंढे महिला प्रतिनिधी मीनाक्षी चव्हाण यांच्यासह सेवेकरी परिश्रम घेत आहे.



## देशमुख हत्येतील आरोपींना कठोर शिक्षा द्यावी यासाठी तहसीलदार यांना निवेदन

तभा वृत्तसेवा

पैठण दि १६ : केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच आणि मराठा सेवक संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे हत्या झाली. हा मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या चळवळीवर आघात आहे. हा चळवळीचा आवाज दाबण्याचा प्रयत्न असून, या प्रकरणातील दोषीवर कठोरात कठोर कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने पैठण तहसीलदार सारंग चव्हाण यांना देण्यात आले आहे.



यावेळी अखंड मराठा समाजाचे संतोष तांबे , अनिल राऊत, पवन शिसोदे, माऊली मुळे, साईनाथ कर्डिले, किशोर सदावर्ते, गणेश पवार, सुभाष नवथर, प्रशांत देशमुख, आशिष औटे, एकनाथ भाकरे, तुषार नाटकर, सोमनाथ बोबडे, जिजासाहेब रोडे, शामराव येवले, ऋषिकेश बोबडे, किरण शिंदे, शेखर देशमुख, नीरज पापुलवार, बाळासाहेब माने, महेश पवार, नवनाथ गोरे, हरीपंडित नवथर, नानासाहेब शेंबडे, अमोल सपकाळ, अरुण काळे, नारायण किरडे, रोहन भुमरे, संभाजी काटे, रवींद्र आमले, जिजा आवटे, अनिल निवारे, दत्तात्रय निवारे, संतोष काळे, महेश दसपुते,महादेव मापारी, जिजा कर्डिले, भरत शेळके, सोमनाथ बल्लाळ, विजय खाटीक, बाळासाहेब पठाडे, विशाल काळे, उद्धव लोहगळे, विजय कर्डिले, पिंटू आरगडे, रामकिसन सकुंडे, भगवान जाधव, शंकर निवारे, विठ्ठल जाधव, बी जगताप, लक्ष्मण बोडले, अंकुश काळे, आदी उपस्थित होते.

## वाळूज रोडवरील पेट्रोलपंपाला ९९ लाखांच्या दंडाची नोटीस

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : नगर रोडवरील नवीन होणार्या पेट्रोलपंपाच्या मालकाने विना रॉयल्टी मुरुम भरती केल्याचे आढळून येताच महसूल विभागाच्यावतीने पंपचालक मालक दिगंबर धर्मा गायकवाड यांना ९९ लाखांचा दंडांची नोटीस बजावत कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविले आहे. याविषयी अधिक माहिती अशी की, वाळूज-नगर रोडवर बजाज कंपनीच्या गेटसमोर भारत पेट्रोलपंपाचे नवीन काम गट नं.१४४ वळदगाव हद्दीत सुरू आहे. हा पंप तयार करताना पंप मालक दिगंबर धर्मा गायकवाड यांनी विना परवानगी १५०० ब्रास मुरुमची भरती टाकल्याचे तक्रारदार विनोद वाकोडे यांनी अप्पर तहसीलदार यांना निवेदनद्वारे निदर्शनास आणून दिले होते, याप्रकरणी तहसीलदारांनी चौकशी करत संबंधित भारत पंपाचे मालक दिगंबर धर्मा गायकवाड यांना नोटीस बजावत कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविले असून, ९९ लाखांचा दंड ठोठावला आहे. या संदर्भात पेट्रोलपंपाचे व्यवस्थापक दयानंद तिगोटे यांना संपर्क साधला असता, त्यांनी सांगितले की, महसूल विभाग आम्हाला जाणून-बुजून त्रास देत आहेत, आम्ही सर्व कामे कायदेशीरपणे केलेली आहेत. त्यामुळे संबंधित विभागाने कोणत्या अनुषंगाने नोटीस बजावली हे मला पहायचे आहे, या संदर्भात मी ॲट्रॉसीटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया करणार आहे. सध्या तरी महसूल विभागाच्यावतीने बजावण्यात आलेली नोटिस आम्हाला मिळाली नाही, नोटीस आल्यावर कायदेशीररित्या उत्तर देणार असल्याचे तरुण भारत शी बोलताना सांगितले.

## मराठा समाजाचा वधु-वर परिचय मेळावा यशस्वी करण्याचा निर्धार

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

येथील प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संचलित मराठा सोयरिक ग्रुपच्या वतीने येत्या २९ डिसेंबर रोजी मराठा समाजातील वधु-वरांचा मोफत परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा यशस्वी करण्याचा निर्धार रविवारी, १५ डिसेंबर रोजी कॅनॉट प्लेस येथे आयोजित एका बैठकीत करण्यात आला.



सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब पाटील काळे यांच्या अध्यक्षतेखाली कॅनॉट प्लेस येथील त्यांच्या कार्यालयात मराठा समाज वधु- वर परिचय मेळावासंदर्भात बैठक घेण्यात आली. यावेळी मेळाव्याची रूपरेषा ठरविण्यात आली. त्यानुसार प्रत्येक तालुक्यांत कार्यकर्ते नेमणे त्यांच्यामार्फत मेळाव्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचविणे, कार्यक्रमासाठी आलेल्यांसाठी भोजनाची व्यवस्था करणे, शक्य तेवढे बॅनर व पॉम्प्लेट लावणे व ते प्रसारित करणे यावर सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यात आला.

मेळावा यशस्वी करण्यासाठी मराठा समाजातील वधु-वरांनी अधिकाधिक बायोडाटा मराठा सोयरिक ग्रुपवर टाकावे. जेणेकरून ते लोकांपर्यंत पोहोचतील. या मेळाव्यात वधु-वरांचे सामुहिक विवाह लावण्याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. मेळाव्यात जेवण देण्याचेही ठरले.

यावेळी मेळावा आयोजक प्रमुख पोपटराव पाटील सपकाळ, जगन्नाथ प्रांजे, वसंतराव औटे, मनोहर वडजे, श्रीमंत उकिर्डे पाटील, डॉ. संतोष हरणे, प्रभाकर गायकवाड, देवानंद गरड यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आर्य चाणक्य मध्ये बँकिंग कार्यशाळा संपन्न

तभा वृत्तसेवा

पैठण दि १६ :- आर्य चाणक्य प्रा, विद्या मंदिरा मध्ये इयत्ता ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी बँकीग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते .या कार्यशाळेचे अध्यक्ष भास्कर कुलकर्णी तर प्रमुख मार्गदर्शिका कुमारी नेहा पैठणकर या होत्या. मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करून कार्यशाळेची सुरूवात करण्यात आली .

प्रमुख मार्गदर्शिका नेहा यांनी विद्यार्थ्यांना बँक म्हणजे काय? बँकेत खाते कसे उघडावे? बचतखाते व चालू खाते म्हणजे ? आर,टी,जी,एस म्हणजे काय? ठेवीचे विविध प्रकार, कर्जाचे प्रकार व त्यावर आकारले जाणारे व्याज डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, पासबुक ,चेक,केवायसी याविषयी प्रात्यक्षिका सह मार्गदर्शन केले. यात विद्यार्थ्यांना पडलेल्या प्रश्नाविषयी सविस्तर माहिती देवून त्यांच्या शंकाचे निरसन केले . या उपकृमा द्वारे विद्यार्थ्यामध्ये आर्थिक साक्षरता हे मूल्य जोपासण्यात आले व विद्यर्थ्याच्या मनातील बँकेविषयी असलेली भिती दूर करण्यात आली.



सदरील कार्यक्रम गणित मंडळा अंतर्गत राखी धोकटे तसेच शुभांगी सदावर्ते यांनी घेतला तर बाळू लाड, धीरज हंडरगुळे व शिखा शहा यांनी यासाठी सहकार्य केले.

## कापूस उत्पादकता वाढीसाठी पंचसूत्रीचा वापर आवश्यक : वाय. जे. प्रसाद यांचा सल्ला

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

भारताच्या एकूण क्षेत्रफळापैकी २५ टक्के कापसाचे क्षेत्र महाराष्ट्रात आहे. परंतु, देशाच्या तुलनेत आपल्याकडे कापसाची उत्पादकता कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानात उभट वाढणारे वाण, जमिनीच्या प्रकारानुसार वाणांची निवड, घन लागवड, सघन लागवड, वाढनियंत्रकाचा वापर, एकात्मिक खत, तण व पीक संरक्षण या पंचसूत्रीचा वापर करावा, असे प्रतिपादन केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक वाय. जी. प्रसाद यांनी येथे केले.



एमजीएमच्या गांधेली येथील कृषी विज्ञान केंद्रात विशेष कापूस प्रकल्पअंतर्गत 'उत्तम कापूस व्यवस्थापन' कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे संचालक वाय. जी. प्रसाद यांनी उद्घाटन केले. 'शेंदरी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून कामगंध सापळा तयार केला आहे. पंजाब राज्यात १८ शेतकऱ्यांच्या शेतावर या तंत्रज्ञानाचे प्रयोग सुरू आहेत. लवकरच हे तंत्रज्ञान महाराष्ट्रात येईल, असे प्रसाद म्हणाले.

यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी अश्विनी पठारे, डॉ. के. ए. धापके यांची प्रमुख उपस्थिती होती. अशोक ठोकळ व यज्ञेश कातबने या युवा शेतकऱ्यांचा केंद्र सरकारचा मिलेनियन फार्मर्स वार्ड मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रल्हाद खैरनार करंजगाव (ता. वैजापूर) या शेतकऱ्याने घन पद्धतीने लागवड केलेल्या कापूस व पंढरीनाथ काचोळे, जवखेडा (ता. कन्नड) या शेतकऱ्याने दादा लाड तंत्रज्ञाने घेतलेल्या कापूस पिकाबद्दल माहिती दिली.

'उत्तम कापूस व्यवस्थापन' तंत्रज्ञानावर काकासाहेब सुकासे, कापूस पिकातील एकात्मिक कीड व्यवस्थापन यावर डॉ. पी. एस. जोशी, डॉ. अजय मिटकरी, पी. बी. धागा यांनी मार्गदर्शन केले. स्वप्नील वाघ यांनी सूत्रसंचालन, तर काकासाहेब सुकासे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आपल्या जीवनात पुण्यवंत व पुण्यवान व्हायचे असेल तर साधू संतांच्या, विचाराच्या आदर्शावर जीवन जगा कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही : अरुणात गिरीजी महाराज

तभा वृतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी .समाजात दिवसेंदिवस व्यसनाधीनता, गैरमार्ग, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि व असामाजिक तत्त्वांचा वापर वाढला आहे. यामुळे समाजाचे दिवसेंदिवस अध:पतन होत आहे. आज संस्कारक्षम मुलगा मिळणे कठीण होऊन बसलेले आहे. प्रत्येक माता-पित्याने आपल्या मुलांना चांगले संस्कार द्यावे. त्यांची असंगतांशी संगत होऊ देऊ नये. देव देश धर्म याची शिकवण आपल्या मुलांना द्यावी जेणेकरून समाजात आदर्श व्यक्ती निर्माण होतील. तसेच आदर्श व संस्कारक्षम मुलांनाच मुलगी द्यावी जेणेकरून आदर्श समाज घडेल. असे सद्गुरु अक्काताई महाराज यांच्या ४० व्या अखंड हरिनाम सप्ताह च्या श्रीक्षेत्र आडगाव खुर्द तालुका छत्रपती संभाजीनगर येथे काल्याचे कीर्तनादरम्यान आपल्या मधुर वाणीतून .भामाठाण येथील अडबंगनाथ संस्थान प्रमुख अरुणा गिरीजी महाराज यानी आलेल्या भक्तांना म्हटले.



तसेच काल्याचे कीर्तन ह.भ.प. स्वामी अरूननाथगिरीजी महाराज यांनी या जगतामध्ये सुखाची अपेक्षा सर्वांना आहे, सर्व सुखासाठी खटाटोप करतायेत परंतु ते सुख आम्हाला प्राप्त करून घ्यायचे असेल तर ते सुख तुकोबाराया सांगतात गोकुळात आहे. त्या सुखाला कुठलंही जातीभेद नाही, कुठलाही अंत नाही, कुठलीही सुरुवात नाही ते आविट सुख केवळ आणि केवळ गोकुळात आहे. असे स्वामी अरूननाथगिरीजी महाराज यांनी काल्याच्या कीर्तनाप्रसंगी निरूपण केले. याप्रसंगी नाथ , आश्रम प्रमुख सद्गुरु आक्काताई महाराज. छत्रपती संभाजी नगरचे खासदार संदिपान भुमरे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती

श्रीक्षेत्र आडगाव खुर्द येथे दिनांक ११ ते १५ डिसेंबर पर्यंत अखंड हरिनाम फिरता नारळी सप्ताह सद्गुरु अक्काताई महाराज यांच्या आशीर्वादाने आणि प्रमुख उपस्थितीमध्ये ,खु आडगाव, ठोंबरे .ग्रामस्थ यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी काल्याचे कीर्तन ह.भ.प. स्वामी अरूननाथगिरीजी महाराज यांच्या अमृतवाणी वाणीतून झाले. तर काल्याचा महाप्रसाद खा. संदीपान भूमरे यांच्या वतीने देण्यात आला. यावेळी सप्ताहमध्ये हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

### कोणत्याही क्षेत्रात सातत्य, संयम टिकवून ठेवल्यास यश हमखास : रोहित देशमुख

## 'युगंधर' च्या कला महोत्सव उत्साहात

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

कोणत्याही क्षेत्रात सातत्य आणि संयम टिकवून ठेवल्यास निश्चित यश मिळते. त्यामुळे आपल्याला जे योग्य वाटते, त्या क्षेत्रात समर्पण वृत्तीने काम करावे. विज्ञान शाखेत शिकूनही कला क्षेत्राचे आकर्षण वाटले आणि आता नाटक, मालिकांमध्ये स्थिरावलो आहे, असे प्रतिपादन अभिनेता रोहित देशमुख यांनी रविवारी, १५ डिसेंबर रोजी येथे केले.

युगंधरा मराठी साहित्य, कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान, युगंधरा प्रकाशन यांच्या वतीने पुस्तक प्रकाशन सोहळा आणि साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. हॉटेल एमएच-२० मध्ये रविवारी झालेल्या कार्यक्रमाला अभिनेते रोहित देशमुख, ज्येष्ठ पत्रकार अरुणकुमार मुंदडा, समरता साहित्य परिषधेचे कार्यवाह नरेंद्र निकुंभ, नाट्य दिग्दर्शक सतीश इंदापूरकर आणि संमेलनाध्यक्ष अरुण देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

साहित्य आणि पत्रकारिता एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोघांनी सक्षमतेने समाजाची बाजू मांडल्यास आशादायक चित्र निर्माण होईल. सकारात्मक वातावरण तयार करण्यात साहित्याचा मोठा वाटा आहे. पूर्वीसारख्या कादंबऱ्यांची लोकप्रियता आता दिसत नाही. मराठी वाचक पुस्तकांककडे वळविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे अरुणकुमार मुंदडा म्हणाले.

२१ पुस्तकांचे प्रकाशन

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते 'प्रित ही बावरी', 'इको ऑफ सायलेन्स', 'निमेश', 'काव्यशिल्प', 'स्वची ओळख' अशा २१ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर साहित्य, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रांतील योगदानासाठी मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या संमेलनात छत्रपती संभाजी नगर सह मुंबई, पुणे, नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, अमळनेर, चाळीसगाव, अकोला, अमरावती अशा राज्यातील विविध भागातील रसिक सहभागी झाले होते. सुनिता कावसनकर यांनी प्रास्ताविक केले. प्रवीणा कन्नडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# संतोष देशमुख हत्याप्रकरणी आ.संदीप क्षीरसागर आक्रमक

## आठवडाभरात योग्य पाऊले न उचलल्यास रस्त्यावर उतरणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

मस्साजोग येथील दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरनातील नराधम आरोपी अजूनही मोकाटच आहेत. अतिशय विदारक प्रकरण असताना यातील आरोपी अटक होत नाहीत. प्रशासनाकडून या प्रकरणात दिरंगाई कशाबद्दल होत आहे? असा सवाल उपस्थित करत मस्साजोग प्रकरणी, नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनादरम्यान आ.संदीप क्षीरसागर यांनी आक्रमक होत विधिमंडळ परिसरात आंदोलन केले.



केज तालुक्यातील मस्साजोग येथील दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून अतिशय अमानवीय, क्रूर दि.९ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आली आहे. अतिशय किरकोळ कारण असताना गुन्हेगारी प्रवृत्ती असलेल्या आणि बीड जिल्ह्यांश सत्ताधाऱ्यांचा राजाश्रय असलेल्या नराधमांनी हे कुकर्म केले आहे. स्व.देशमुख यांचे अपहरण झाले तेव्हा त्यांचे लहान बंधू यांनी केज पोलीस स्टेशन ला जाऊन सदरील घटनेची माहिती दिली तरीही तेथील पोलिसांनी वेळ वाया घालवत कुठलीही कारवाई न करता त्यांना तिथे बसवून घेतले. या वेळेत स्व.देशमुख यांचा जीव वाचला असता. पोलिसांनी जाणीवपूर्वक आरोपीना हे कृत्य करण्यासाठी सहकार्य केले होते काय असाही संशय या प्रकरणात येत आहे. स्व.देशमुख यांची हत्या इतक्या हैवानतेने करण्यात आली आहे कि, त्याची कल्पनाही अत्यंत क्लेशदायक आहे. एवढे गंभीर प्रकरण असतानादेखील याप्रकरणातील मुख्य आरोपी अजूनही मोकाट आहेत. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी महाविकास आघाडीतील आमदारांसह विधिमंडळा परिसरात आंदोलन केले.

वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपासा

स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात वाल्मिक कराड हे मुख्य सूत्रधार असू शकतात. मारेकरी असणारे सर्व आरोपी हे वाल्मिक कराड यांचे निकटवर्तीय आहेत हे स्पष्ट आहे. वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपास केवळ माझी एकट्याची नसून एकंदरीत देशमुख कुटुंबीय, सर्व मस्साजोग गाववासीय आणि जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधी यांची आहे त्यामुळे एकदा वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपासले तर सत्य पुराव्यासह बाहेर येईल असेही आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी म्हटले.

### बांगर कुटुंबियांना संरक्षण देण्याची मागणी

रामकृष्ण बांगर हे बीड जिल्ह्यातील एक संस्थाचालक आहेत. त्यांची संस्था वाल्मीक कराड यांना बळकावयची आहे. त्यामुळे बांगर कुटुंबियांवर गंभीर स्वरूपाचे खोटे गुन्हे दाखल करून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बांगर कुटुंबियांना संरक्षण देण्याची मागणीही आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

# तरुणांवर दाखल केलेले गुन्हे तात्काळ मागे घ्या



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१६ डिसेंबर**

परभणी येथे १० डिसेंबर २०२४ रोजी देशद्रोही समाज कंटकाने भारतीय संविधानाच्या प्रतीकृतीची विटंबना केली आहे. या देशद्रोही कृत्याचा दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला. भारतीय संविधानाच्या प्रतीकृतीची विटंबना करणाऱ्या देशद्रोही समाज कंटकावर भारतीय संहितेच्या देशद्रोही कायद्या नुसार कठोर कारवाई करावी. आणि सीबीआय चौकशी करून यातील मास्टर माईंड चा शोध घेण्यात यावा. तसेच सोमनाथ सूर्यवंशी या आंबेडकरवाद्याचा मृत्यू झाला आहे तो पी सी आर मध्ये होता.तेव्हा अमानवी अत्याचार करणाऱ्या पोलिसांवर तातडीने कारवाई करावी.

याप्रकरणी परभणी जिल्ह्याचे पोलिस अधिकारी व प्रशासनाला जाग यावी यासाठी संविधानिक मार्गाने आंदोलन करणाऱ्या निरपराध नागरिकांना व्देष भावनेतून अमानुष मारहाण केली आहे. त्यांच्यावर देखील कठोर कारवाई करावी. आणि बौद्ध समाजावर व्देष भावनेतून केले जात असलेले कोंबिग ऑपरेशन त्वरित थांबवावे. निर्दोष स्त्रीया, तरुणांवर दाखल केलेले गुन्हे तात्काळ मागे घेऊन त्यांना मुक्त करावे.

सदर देशद्रोही समाज कंटकावर योग्य ती कठोर कारवाई न झाल्यास जिल्ह्यातील संपूर्ण बौद्ध समाज रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल.यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहिल.आशा अषयाचे भारतीय बौद्ध महासभा ता माजलगावच्या वतीने निवेदन देऊंन निषद व्यक्त केला. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष डॉ भागवत साळवे, जिल्हा पर्यटन सचिव शामभाऊ वाघमारे, शहर अध्यक्ष एल आर मस्के,सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते डोंगरे, दयानंद साळवे,माजी सरपंच अभिमन्यु साळवे,बहुजन समाज पार्टी चे एड.अमोल डोंगरे,लिलाताई उजगरे,कालींदाताई बनसोडे, बाबासाहेब सोळके,मोहन काकडे,दत्ता प्रधान,सटवा मस्के सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी उपस्थित होते

# लवाद नामतालिकेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

बहूराज्यीय सहकारी संस्था अधिनियम,२००२ चे कलम ८४ (४) अन्वये सन २०२५-२०२८ या कालावधीसाठी लवाद नामतालिका (-ीलर्ळीीर्ीी झरपलश्र) तयार करण्यासाठी खालील व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व न्यायालयात निवृत न्यायाधिश व सेवानिवृत्त विधी अधिकारी प्रक्टीसिंग डव्होकेटेस,चार्टड अकौन्टंट, कॉस्ट अकौन्टंट, राष्ट्रीय बॅका, ग्रामीण बॅंका, भूविकास बॅंका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका, व्यापारी बॅंका, नागरी सहकारी बॅंका, राज्य सहकारी बॅंका यांच्या सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) सहकार विभागातील उपनिबंधक दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) अशा व्यक्तींची नियुक्ती करताना अधिनियमामध्ये नमूद नसले तरीही खालील प्रमाणे अहर्ता पात्रता असाव्यात.

त्यांच्यावर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नासावेत, शासकीस बॅक सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा. अशी व्यक्ती कोणत्याही काळया यादीत (Biack List) मध्ये समाविष्ठ नसावी. सदर व्यक्ती संबधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणा-या जिल्हयातील रहिवासी असावा (लातूर, उस्मानाबाद, बीड, नांदेड जिल्हयातील) व्यक्ती एकावेळी एकाच विभागातून अर्ज दाखल करू शकतो.

अर्जाचे विहित नमूने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या कार्यालयात दि. १७ डिसेंबर २०२४ ते १६ जोनवारी २०३५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील, अर्ज सादर कण्याची अंतीम मुदत दि. १६ जानेवारी २०२५ पर्यंत आहे. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी पूर्ण करुन दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रारुप लवाद नामतालिका प्रसिध्द होईल.ही प्रारुप नामतालिका यादी संबधित विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात लावण्यात येईल. प्रारुप नामीकेवर हरकती असल्यास vaidhanik8gmail.com या ईमेल आयडीवर पुराव्यासह हरकती दि. २१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सादर कराव्यात. हरकती निर्णय दि. ११ मार्च २०२५ रोजी करुन दि. १८ मार्च २०२५ रोजी अंतीम लवाद नामतालिका प्रसिध्द करण्यात येईल.याबाबतची जाहिर सूचना संबधित कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली असल्याचे लातूर सहकारी संस्थेचे, विभागीय सहनिबंधक, सुनिल शिरपूरकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# धनंजय मुंडे व पंकजा मुंडे या बहीण-भावाने घेतली मंत्रीपदाची शपथ

जिल्ह्यात आनंदोत्सव
**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच मुंडे घराण्यातील दोन राजकीय व्यक्तींनी सोबत मंत्रिपदाची शपथ घेतल्याचा दुर्मिळ योगायोग रविवारी (दि. १५) नागपूर येथील राजभवनावर जुळून आला. धनंजय मुंडे व पंकजा मुंडे या बहीण-भावाने महायुती सरकारमध्ये एकाच दिवशी घेतलेली मंत्रिपदाची शपथ राज्याच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरली आहे. बीड जिल्ह्यावर पुन्हा एकदा मुंडेंचेच वर्चस्व सिद्ध झाले.



जिल्ह्यात आनंदोत्सव

बीड जिल्ह्याच्या वाट्याला दोन कॅबिनेट । मंत्रिपद आल्याने महायुतीच्या कार्यकर्त्यांनी सर्वत्र पेढे वाढत, गुलालाची उधळण व फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला. पंदरा डिसेंबर डिसेंबर ही तारीख बीडकरांच्या आठवणीत । राहणारी ठरणार आहे. कारण पहिल्यांदाच बहीण-भाऊ यांनी सोबत मंत्रीपदाची शपथ घेतली.

# बीड तालुक्यात स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेअंतर्गत ३८ शेतकऱ्यांना मिळाला लाभ-तहसीलदार चंद्रकांत शेळके

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

या योजनेंतर्गत राज्यात शेती व्यवसाय करताना वीज पडणे , सर्पदंश , विंचूदंश , विजेचा शॉक , पाण्यामध्ये बुडून मृत्यू , रस्ता रेल्वे अपघात इत्यादी कारणामुळे शेतकऱ्यांना लाभ दिला जातो .अपघातग्रस्त शेतकऱ्यांना अपघाती मृत्यू झाल्यास दोन लक्ष व अपंगत्व आल्यास एक लाख रुपये लाभ दिला जातो . सदर योजनेत १० ते ७५ वर्षाची अट असून महसूल नोंदीनुसार खातेदार असलेला शेतकरी व वहिती धारक खातेदार म्हणून नोंद नसलेला कोणताही एक सदस्य ( आई- वडील, शेतकऱ्याची पती - पत्नी , मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणताही एक व्यक्ती ) असे एकूण २ जणांना या योजनेचा लाभ देता येतो . अपघातग्रस्त व्यक्तीचा परिपूर्ण कागदपत्रासह प्रस्ताव ३० दिवसाच्या आत तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सादर करावा लागतो . अधिक माहिती करिता कृषी विभागाच्या सर्व क्षेत्रीय अधिकारी , कर्मचारी कृषी पर्यवेक्षक , कृषि सहाय्यक यांच्याशी संपर्क केल्यास ते कुटुंबाच्या वारसदाराला मार्गदर्शन करतील असे आवाहन बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , तालुका कृषी अधिकारी अशोक साळी यांनी केले आहे .

सध्या प्रशिक्षणासाठी गेलेले जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी वेळोवेळी आढावा घेतल्यामुळे , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी , तत्कालीन तहसीलदार तसेच तालुका कृषी अधिकारी यांनी वेळोवेळी प्रस्ताव सादर केल्यामुळे व त्यावर निर्णय घेतल्यामुळे सन २०२३-२४ या कालावधीत ५१ प्रस्तावा पैकी ३८ प्रकरणे मंजूर झालेली असल्याचे तालुका कृषी अधिकारी, बीड श्री.ए.व्ही. साळी व सदर कामकाज पाहणाऱ्या सीमा अस्वले यांनी सांगितले .

# पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांची मंत्रीपदी नियुक्ती झाल्याबद्दल माजलगाव येथे आनंदोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१६ डिसेंबर**

लोकनेत्या नामदार पकंजा गोपीनाथ मुंडे व धनंजय मुंडे यांची मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल माजलगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तोफा, फटाके वाजउण , भारतीय जनता पार्टी महायुतीचा विजय असो , देवेंद्रजी फडणवीस तुम आगे बढो, पंकजा मुंडे, धनंजय मुंडे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ अशा विविध घोषणा देत उपस्थित भाजपाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आनंद उत्सव साजरा केला.



२०१९ नंतर लोकनेत्या पंकजा मुंडे ह्या मंत्री झाल्यामुळे सर्व कार्यकर्त्यांच्या मनामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले , येणाऱ्या काळात बीड जिल्ह्यात भरघोस निधी येईल व विकास होईल , तसेच रेल्वेसह अनेक प्रलंबित प्रश्न सुटतील अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. प्रशांतजी पाटील भाजपा ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर नाना मेंडके , नगरसेवक विनायक रत्नपारखी , बाबासाहेब आगे, कैलास खुरपे ,, दत्ताजी महाजन, हरिभाऊ नवले, सिद्धू राठोड, दत्ता क्षीरसागर, नारायण मेंडके, ईश्वर खुरपे ,तात्या पांचाळ, रामेश्वर चव्हाण, राम शिंदे, बाळू शिरसागर रवि गायकवाड, ऋषिकेश कुलकर्णी, व सर्व उपस्थित भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते.

# मोटारसायकल चोरांची आंतरजिल्हा टोळी अंबाजोगाईत जेरबंद; १९ मोटारसायकल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१६ डिसेंबर**

गुप्त माहितीच्या आधारे बीड जिल्हा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अंबाजोगाईत सापळा लावून मोटारसायकल चोरांच्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश केला. यावेळी चोरट्यांकडून १९ मोटारसायकलसह जवळपास ९ लाख मुद्देमाल जप्त केला.



अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल चोरीच्या गुन्ह्यातील मोटारसायकल वीरसिंग शेरसिंग गोके (रा. सा.बां. कार्यालय जवळ, सदर बाजार रोड, अंबाजोगाई) याने चोरली असून तो चोरीच्या गाड्या विक्री करण्यासाठी चनई रोडवरील सीताफळ संशोधन केंद्राजवळ येणार असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेस मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे पोलीस निरिक्षक उस्मान शेख यांनी त्या परिसरात सापळा रचला. यावेळी पोलिसांना पाहताच पळून जाण्याच्या बेतात असणाऱ्या वीरसिंगला पोलिसांनी पाठलाग करून पकडला. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने घरात लपवलेल्या दहा मोटारसायकल पोलिसांना दाखवल्या. तसेच, त्याने गाडी विकताना फायनान्सची असल्याचे कारण भासवुन कागदपत्र नंतर देतो असे सांगत आठ मोटारसायकल विकल्या होत्या. पोलिसांनी या सर्व १८ मोटारसायकल जप्त केल्या. पोलीस वीरसिंगच्या इतर साथीदारांचा शोध घेत आहेत. ही कारवाई एलसीबीचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली, पीएसआय सुशांत सुतळे, पोलीस कर्मचारी मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, विकास राठोड, विष्णु सानप, देविदास जमदाडे, निलेश ठाकुर, मच्छिंद्र बीडकर, सचिन आंधळे, अश्विनकुमार सुरवसे व चालक नितीन वडमारे यांनी केली.

# भाशिप्र कर्मणेवाधिकारस्ते चे कौतुक आणि अभिमान

आज ११डिसेंबर ,मोक्षदा एकादशी,गीता जयंतीच्या निमित्ताने बीडच्या सावरकर शैक्षणिक संकुलातील प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयात देखील भगवद्गीता मुखवर्गत करून विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी सर्वांनी बारावा अध्याय सामूहिक पठण सादरीकरण करून एका पुस्तकाचा जन्मोत्सव साजरा करणे हे खूपच मोठं वेगळेपण, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे एक वैशिष्ट्यपूर्ण कार्य म्हणावे लागते .भगवद्गीता हा धर्मग्रंथ म्हणजेच राष्ट्रग्रंर्थ म्हणून देखील गौरवला जातोआहे.

केवळ पाठांतर नाही तर सुंदर जीवन जगण्यासाठी चे योग्य कर्म काय आहे ?ते का आणि कसे करावे? जे भगवंतांनी अर्जुनाची संभ्रमित अवस्था दूर करण्यासाठी म्हणून दिलेले ज्ञान, म्हणजेच भगवद्गीता प्रत्येकाच्या जीवनात खूप मार्गदर्शक उपयुक्त आहे याचे धडे अभ्यासक्रमातील शिक्षणाबरोबर रुजवणे हा खूप मोठा मौलिक संस्कार दिला जातो आहे .

परीक्षेत मोठे यश मिळवण्यासाठी त्या -त्या विषयातील संभ्रम दूर करण्यासाठी म्हणून विषय शिक्षक वेळोवेळी ज्ञान देण्यासाठी तत्पर असतात. मुलं -विद्यार्थी शाळा, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून जीवनप्रवासात धर्मग्रंथ, पुस्तके मोठं काम करतात, सर्वांचा सार ज्या भगवद्गीतेत आहे त्याचे धडे बाल वयातच आत्मसात केले तर जीवनात कधीही संभ्रमावस्था येणार नाही, असा उत्तम माणूस, सुजाण नागरिक घडवण्यासाठी विद्यार्थी अवस्थेतच ज्ञानामृत देणारी संस्था म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आणि या मालेतील शिक्षक बंधू बधिनी ,शासन ,प्रशासन मंडळाचे खूप कौतुक आणि अभिमान सर्वांनाच आहे तो आज माझ्या मनातही दाटला.




संस्था, संघटना, मोठंकार्य असो की एकत्रित कुटुंब हे यशस्वी होण्यासाठी कार्यकर्त्यांची एक साखळी आणि स्वयंसेवकत्वाचे गुण अंगी कायम राहिला पाहिजेत तेव्हा ते सर्व यशस्वी होते ,परंतु सत्ता, अधिकार मी पण एकाच्याही मनात आला की ती साखळी कमकुवत होऊ लागते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना म्हणून ,एक देशप्रेमींचे कुटुंब म्हणून जे मोठे कार्य हाती घेऊन यशस्वी करते आहे त्यामागे स्वयंसेवक या वृत्तीचा धाग्याची मजबूत गुंफण घातलेली आहे, हा पुष्पहार भारत मातेच्या पूजेसाठीच आहे हा स्वभाव प्रत्येकाचा आहे. म्हणून शंभरावे वर्षाची यशस्वी वाटचाल सुरू आहे, या पुष्पमालेत आपल्याला राहता येईल का? यासाठी विविध संस्था, संघटना ,सेवा प्रकल्प देशभर कार्यरत आहेत, याच मालेतील मराठवाड्यात शिक्षण क्षेत्रात काही योगदान, काही कार्य करण्याचा संकल्प शिक्षण प्रेमी स्वयंसेवकांनी ७५ वर्षांपूर्वी अंबाजोगाई या छोट्याशा गावातून केला आणि संपूर्ण मराठवाड्यावर लक्षवेधी शिक्षण क्षेत्रात काम उभं राहिलं आहे ते भारतीय शिक्षण प्रसारक संस्था या नावाने.

हजारो नव्हे तर लाखो विद्यार्थी, देशाची पिढी, एक उत्तम माणूस, सुजाण नागरिक म्हणून घडवण्याचे काम होते आहे. संस्था म्हटलं की घटनेप्रमाणे ती एका साखळीत बांधलेली असते त्याप्रमाणे संचालक,अध्यक्ष, कार्यवाह, पदाधिकारी, प्रशासन, कार्यकर्ते सभासद याची गुंफण आहे. संस्था अमृत महोत्सवी वाटचाल करत असताना बाहेरून न दिसणारी ही गुंफण खूप छान विणलेली आहे, त्यामागे केवळ स्वयंसेवक हा एक मजबूत रेशीम धागा आहे, तो धागा दिसणार नाही एवढी घट्ट वीण ठेवणारे संस्थेचे पदाधिकारी, प्रशासन आणि मार्गदर्शक मंडळ सर्वांना घट्ट जोडून ठेवण्याचे कुशल कार्य करत असतात. या पुष्पमालेत राहण्यासाठी पहिले सूई तून धाग्यात येण्यासाठी ज्याप्रमाणे टोचून घ्यावे लागते ,आणि जोपर्यंत आपली शोभा आहे -कर्तुत्व आहे तोपर्यंत इथे राहायचे आणि निर्माल्याप्रमाणे बाहेर पडत नव्या शोभवंत- कर्तुत्व संपन्नतेला जागा करून द्यायची ही पुष्प माला कायम प्रफुल्लित राहण्यासाठी चे अनमोल योगदान देणारी आता चौथी पिढी समोर येते आहे. राष्ट्रासाठी शिक्षण आणि त्या शिक्षण व्रताचा प्रसार करण्यासाठी भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ ही भावना खरोखरच अनमोल आहे.या भारत मातेच्या पूजेसाठीच्या पुष्पमालेत भारतीय शिक्षण प्रसारक संस्था सदैव प्रफुल्लित राहून सेवार्थ राहते आहे,हा कर्मणेवाधिकारस्ते गुण असाच विकसित होत राहावा...

प्रमोद कुलकर्णी (पत्रकार),
अध्यक्ष : शालेय समिती, सावरकर विद्यालय, बीड.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## उज्वल यशासाठी पंचसूत्रीचा कृतिशील अवलंब करावा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-** महाविद्यालयीन तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा शक्ती असते. तरुणाईला योग्य दिशा प्राप्त झाल्यास ते अनेक क्षेत्रात भव्य दिव्य अशी कामगिरी पार पाडू शकतात. उत्तम संभाषण कौशल्य, आत्मविश्वास, प्रचंड मेहनत, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि इंग्रजीवर प्रभुत्व या पंचसुत्रींचा वापर केल्यास आपण विविध क्षेत्रात उज्वल यश संपादित करू शकता असे प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्ते तथा यशदा पुणेचे संशोधन अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी केले.

महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील व्यक्तिमत्व विकास व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपीठावर पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, विलास ढवळे, जी. एन. साळवे आदिंची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन झाले पुढे बोलताना डॉ. जोगदंड म्हणाले की, अलीकडच्या काळात वाचन संस्कृती कमी झाली आहे. ग्रंथ गप्प राहून आपल्याला बोलायला शिकवतात. ग्रंथ वाचनाने आपल्या ज्ञान आणि अनुभवाच्या कक्षा विस्तारत असतात असेही ते म्हणाले आपल्या अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्द, चिकाटी आणि मेहनतीतून आयुष्याला योग्य दिशा द्यावी. प्रवास, वाचन, ज्ञानीजनांची संगत यातून व्यक्तिमत्व समृद्ध होत असते. यावेळी अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन झाले कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापीका, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

### संक्षिप्त वृत्त...

## गवत कापण्याच्या कारणावरून विळतीने केला एकावर हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-** गवत कापण्याच्या कारणावरुन मारहाण केली शिवाय, विळतीने करंगळीनजीक मारुन जखमी केले. ही घटना भोसा शिवारात घडली. याबाबत मुरुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले, फिर्यादी भारत दत्तात्रेय भोसेकर (वय ५१ रा. भोसा ता. जि. लातूर) यांनी आकाश शाहूराज भोसेकर यास शेताचे भांड सुरु आहे, तू इथे गवत कापू नको, असे म्हले असता, तू कोण मला सांगणार? तुझा काहीही संबंध नाही. या शेतात तुझ्या हिस्सा नाही, तू न्यायालयात भांड असे म्हणून इथे बोलायचे नाही, असे म्हणून शिवीगाळ केली. शिवाय, लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन विळतीने करंगळीनजीक मारुन जखमी केले. याबाबत मुरुड पोलिस ठाण्यात आकाश भोसेकर याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास मुरुड येथील ठाण्याचे पोलिस करीत आहेत.

## बनावट चावीने गोदाम फोडले; साहित्य लंपास

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-**
बनावट चावीने गोदामाचे शटर उघडून आतील हार्डवेअरचे साहित्य लंपास केल्याची घटना गंजगोलाई परिसरात घडली. याबाबत गांधी चौक पोलिस ठाण्यात शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले, फिर्यादी रेणुकादेवी चंद्रसेन सिंह (वय ३९ रा. कॉईल नगर, लातूर) यांचे गंजगोलाई परिसरात हार्डवेअरच्या साहित्याचे गोदाम आहे. या गोदामाचे शटर अज्ञात चोरट्यांनी उघडून आता प्रवेश केला. गोदामात ठवेलेले हार्डवेअरसह इतर साहित्य असा एकूण ३४ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. तपास पोलिस उपनिरीक्षक सोनकांबळे करीत आहेत. गेल्या काही दिवसांपासून लातूर शहरासह जिल्ह्यात घरफोडी, दुचाकी पळविणे यासह इतर चोरीच्या घटनांत वाढ झाली आहे.

## भुयारी गटारीचे खोदकाम करताना पाइपलाइन फुटली

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-**
लातूर शहरातील अनेक भागांमध्ये अंडरग्राऊंड ड्रेनेजसाठी खोदकाम केले जात आहे. या खोदकामात कोल्हेनगर परिसरातील पाइपलाइन फुटली. त्यामुळे परिसरात चार दिवसांपासून पाणीपुरवठा बंद आहे. यामुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. लातूर शहरामध्ये विंधन विहीर तसेच हातपंपाद्वारे पाणीपुरवठा नाही. त्यामुळे नळाच्या पाण्यावरच शहरवासीयांना तहान भागवावी लागते. दुसरा मार्ग नाही. त्यातच कोल्हेनगर परिसरात अंडरग्राऊंड ड्रेनेजचे काम करीत असताना पाइपलाइन फुटली. त्यामुळे या भागातील पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. खोदकाम करीत असताना खाली पाणीपुरवठ्याची पाइपलाइन असल्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे पाइपलाइन फुटली आहे. आता दुरुस्ती झाल्यानंतर या भागात पाणीपुरवठा होईल, असे पाणीपुरवठा विभागातून सांगण्यात आले. यंदा पाऊसकाळ चांगला झालेला आहे. त्यामुळे मांजरा धरणात भरपूर पाणीसाठा आहे. आठ दिवसांआड पाणीपुरवठा होतो, पण ड्रेनेजसाठी खोदकाम करताना पाइपलाइन फुटल्याने कृत्रिम टंचाईला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे.

## घरासमोर थांबविलेली दुचाकी पळविली: गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-**
घरासमोर उभी ठेवलेली दुचाकी चोरट्यांनी पळविल्याची घटना लातुरातील शाहुपुरी कॉलनी, राजीव गांधी चौक परिसरात घडली. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
पोलिसांनी सांगितले, फिर्यादी चंद्रकांत अप्पाराव बिराजदार (वय ५९) यांच्या घरासमोर उभी करून ठेवलेली बजाज स्ट्रोक कंपनीची दुचाकी अज्ञात चोरट्यांनी हॅन्डल लॉक तोडून पळविली. सर्वत्र शोध घेतला असता, ती आढळली नाही. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास चालू असल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान दुचाकी चोरीचे सत्र शहर व परिसरात सुरू असून याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

## लातूरमध्ये बंदला चांगला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-**
परभणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केल्याच्या निषेधार्थ तसेच न्यायालयीन कस्टडीमध्ये सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू झाल्या प्रकरणी आज लातूर बंदचे आवाहन संविधानवादी पक्ष-संघटनांकडून करण्यात आले होते.

त्याला प्रतिसाद देत लातूरकरांनी सकाळपासूनच आपआपले व्यवहार बंद ठेवले होते. शिवाजी महाराज चौक, गांधी चौक, गंजगोलाई, राजिवगांधी चौक, तसेच रेणापूर नाका परिसरातील सर्व व्यवसाय बंद ठेवण्यात आले होते. हॉटेल, किराणा दुकान यासह नागरिकांना लागणाऱ्या दैनंदिन साहित्याचे दुकानेही बंद ठेवण्यात आली होते. लातूर शहरातून बाहेर जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस कांही काळ थांबवण्यात आल्या होत्या. मात्र नंतर बस सेवा पुर्व पदावर आली.

आंदोलनकर्त्यांनी भिक्खू पय्यानंद यांच्या नेतृत्वात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते संविधान चौकापर्यंत रॅली काढून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

लातूर शहरात संघटनांनी केलेल्या बंदच्या आवाहनाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. त्यामुळे शहर कडकडीत बंद झाल्याचे दिसून आले. दुपारी ४ वाजेपर्यंत तरी शहरातील मुख्य रस्त्यावरील दुकाने बंद होती. शहरातील शाळा, महाविद्यालय, व्यापारी संकुल बंद करत व्यापा-यांनी देखील प्रतिसाद दिला तर कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी मोठा फौज फाटा देखील तैनात केला होता.

## लोकअदालत : तडजोडीत पक्षकारांना मिळाले १५ कोटी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-**
जिल्हा विधि सेवा प्राधिकरण व जिल्हा व सत्र न्यायालयात प्रलंबित व वादपूर्व प्रकरणे निकाली काढण्यासाठी जिल्हा न्यायालयात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधि सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष व्ही. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनात झालेल्या लोकअदालतील ६६४ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. तर एक कौटुंबिक वादाच्या प्रकरणात पती, पत्नीचा वाद मिटल्याने त्यांचा संसार नव्याने फुलला आहे.

राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र विधि सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशान्वये लोकअदालत घेण्यात आली. यात मोटार अपघात, नुकसानभरपाई प्रकरणे, कौटुंबिक न्यायालय, भू-संपादन, कौटुंबिक हिंसाचार प्रकरणे, लवाद, हिंदू विवाह कायदा अंतर्गत प्रकरणे व न्यायालयात प्रलंबित तडजोड पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे तसेच वादपूर्व प्रकरणांमध्ये सर्व बँकांची वसुली दावे, वित्त संस्था, बीएसएनएलची वसुली प्रकरणे ठेवण्यात आली होती. ३६ पॅनलवर न्यायाधीश व विधिज्ञांनी काम पाहिले.

जिल्हा न्यायाधीश आर. बी. रोटे, पी. टी. गोटे, डी. बी. माने, जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष शरद इंगळे व पदाधिकारी, महाराष्ट्र बार कौन्सिलचे सदस्य अॅड. अण्णाराव पाटील आदींनी सहकार्य केले.

## मनपातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-**
मनपातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामात सुसूत्रता येऊन कामाची गती वाढावी यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांच्या सूचनेवरून एक दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आले. पुण्यातील यशदाच्या तज्ञ प्रशिक्षक व व्याख्यात्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

मनपामध्ये नव्याने ८१ पदांची भरती करण्यात आलेली आहे.तसेच अनेक अधिकाऱ्यांना पदोन्नतीने बढती देण्यात आली आहे.या सर्वांच्या कामात सुसूत्रता यावी, कौशल्य विकास व्हावा व कामकाजाची गती वाढावी यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी यशदाचे डॉ.बबन जोगदंड यांनी बदलते जग, बदलते प्रशासन बदलांना तयार व्हा या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच कार्यालयीन पद्धती व विभागीय चौकशी यासंदर्भात माहिती दिली. हसत खेळत तणाव मुक्ती या संदर्भात व्याख्याते अशोक देशमुख यांनी संवाद साधला. नाशिकचे संदीप सावंत यांनी माहितीचा अधिकार या संदर्भात मार्गदर्शन केले. संगीतातून तणावमुक्ती या विषयावर व्याख्याते संतोष बोराडे यांचे मार्गदर्शन झाले. या प्रशिक्षणामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांचा कामात सुधारणा होऊन कामकाजाला गती येणार आहे. मनपा अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे व उपायुक्त कांचन तावडे यांनी प्रशिक्षक व व्याख्यात्यांचे स्वागत केले.

## ऊर्जा बचत प्रत्येकांचे कर्तव्य : डॉ.कोमल गोमारे



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-**
वैज्ञानिकांच्या योगदानाला उजाळा देण्यासाठी त्यांच्या जयंतीच्या औचित्याचा उपयोग भविष्यातील पिढ्यांना विज्ञानाच्या क्षेत्रात प्रेरित करण्यासाठी होतो.यामुळे विज्ञान व तंत्रज्ञानाला प्रोत्साहन मिळविण्यास मदत होते आणि लोकांना वैज्ञानिक प्रयत्नांचे महत्त्व समजून त्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. ऊर्जा बचत करणे प्रत्येक नागरिकांचे आद्य कर्तव्य आहे, उज्ज्वल समाजासाठी आवश्यक पाऊले उचलण्याची खरी गरज आहे,असे प्रतिपादन डॉ. कोमल गोमारे यांनी केले.

राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त विविध शाळांमध्ये प्रतिज्ञेच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांनी राबवावा, यासाठी प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच दि.१४ डिसेंबर २०२४ हा दिवस राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिवस म्हणून साजरा केला जातो.याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे ऊर्जा संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देणे हा आहे,या संबंधित विद्यार्थ्यांनी बनवलेल्या भित्तिपत्रकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी एकत्रित प्रतिज्ञा घेण्यासाठी त्यामागची पार्श्वभूमी प्रा. बळवंत सूर्यवंशी यांनी सांगितली.या ऊर्जा संवर्धन प्रतिज्ञा व कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.संध्या वाडीकर, एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे डॉ.सुनील कराड, डॉ.दिनेश भुतडा, डॉ. नाथराव जाधव आणि डॉ.रोहिणी शिंदे, डॉ.रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच वैज्ञानिक एडवर्ड लॉरी टाटम यांच्या ११५ व्या जयंतीनिमित्त घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमात ऊर्जा बचतीबाबत डॉ.कोमल गोमारे यांनी मराष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना ऊर्जा बचतीचेही महत्त्व सांगितले. त्यांनी ऊर्जा संसाधनांची मर्यादा लक्षात घेऊन त्यांचा उपयोग काळजीपूर्वक करण्याचे कर्तव्य विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

## २७ पैकी १६ बॅरेजमध्ये १०० टक्के पाणी साठा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-**
लातूर जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात एकुण सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. त्यामुळे मांजरा, तेरणा व रेणा या तीन्ही नद्यांवरील धरणांचे दरवाजे उघडून पाणी नदीपात्रात सोडण्यात आले. परिणामी या तीन्ही नद्यांवरील एकुण २७ बॅरेजेस पैकी १६ बॅरेज पुर्णक्षमतेने भरले आहेत. या तीन्ही नद्या दुथडी भरुन वाहत आहेत.



मांजरा नदीवर वांजरखेडा, टाकळगाव, वांगदरी, कारसा पोहरेगाव, साई, नागझरी, शिवणी, खुलगापूर, बिंदगीहाळ, डोंगरगाव, धनेगाव, होसूर व भूसणी अशा १५ ठिकाणी बॅरेज बांधण्यात आले आहेत. या १५ बराजपैकी साई, नागझरी, शिवणी, खुलगापूर, बिंदगीहाळ, होसूर आणि भूसणी हे सात बॅरेज पुर्ण क्षमतेने भरलेले आहेत.

लासरा बॅरेजमध्ये ४१.८० टक्के, बोरगाव अंजनपुर बॅरेजमध्ये ०.००, वांजरखेडा बॅरेजमध्ये ९९.९७ टक्के, टाकळगाव बॅरेजमध्ये ७४.९० टक्के, वांगदरी बॅरेजमध्ये ९९.२९ टक्के, कारसा पोहरेगाव बॅरेजमध्ये ९६.७७ टक्के, डोंगरगाव बॅरेजमध्ये ९९.९७ टक्के तर धनेगाव बॅरेजमध्ये ८३.३५ टक्के पाणीसाठा आहे.

तेरणा नदीवरील सात बॅरेज पैकी राजेगाव, किल्लारी, लिंबाळा, गुंजरगा, औराद शहाजानी व तगरखेडा या हे सहा बॅरेज पुर्णक्षमतेने भरलेले आहेत. तर मदनसूरी बॅरेजमध्ये ७५.२० टक्के पाणीसाठा आहे. रेणा नदीवरील घनसरगाव व रेणापूर व खरोळा हे तीन्ही बॅरेज शंभर टक्के भरले आहेत.

तेरणा नदीवरील किल्लारी कुमठा बराजमध्ये १६.७४ टक्के तर सोनखेड बराजमध्ये १६.४० टक्के पाणीसाठा आहे. मांजरा, तेरणा व रेणा नदीवरील एकुण २७ बराजमध्ये ६९.६६६ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा म्हणजेच ८९.८७ टक्के पाणीसाठा आहे.

## हातभट्टी अड्ड्यांवर छापा; सहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-**
जिल्ह्यातील हातभट्टी, दारू अड्डे आणि गुटख्यावर पोलिसांनी छापा मारला. यावेळी ५ लाख ९८ हजार रुपयांचा गुटखा तर २७ हजारांची हातभट्टी दारू जप्त केली आहे. याबाबत त्या त्या पोलिस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. लातूर शहरासह जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध व्यवसायावर जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांनी कारवाईचे आदेश दिले. त्यांच्या आदेशावरून विवेकानंद चौक ठाण्याच्या हद्दीतून एका स्विफ्ट डिझायर कारमधून गुटख्याची वाहतूक केली जात आहे, अशी माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. या माहितीवरून पथकाने कारवाई करत गुटखा, सुगंधित पानमसाला आणि कार (एम.एच. ०४ जी.झेड. ४६५४) असा एकूण ५ लाख ५८ हजार ४८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अधिक चौकशी केली असता, असलम अकबरखा पठाण (वय ३९, रा. साईरोड, नवरत्न नगर, लातूर), आसिफ बशीर सय्यद (वय ३३, रा. सोहेलनगर, लातूर) याच्यासह कार जप्त केली आहे. याबाबत विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तर विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत देशी-विदेशी आणि हातभट्टी दारू अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा मारला.

## १२ लाखांचे चंदन; साडेपाच लाखांचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-**
पोलीस अधीक्षकांचे विशेष पथक व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि. १५ डिसेंबर रोजी विविध ठिकाणी कारवाई करीत औसा येथून १५२ किलो चंदन व वाहनासह १२ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यातील दोघांना पाठलाग करुन पकडले तर एकजण पळून जाण्यात यशस्वी झाला. तर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लातूर शहरातील विवेकानंद चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५ लाख ५८ हजार ४८५ रुपयांचा प्रतिबंधीत गुटखा जप्त केला.




पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याकरिता विशेष पथकाची निर्मिती करून मोठ्या प्रमाणात अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे सुचित केले आहे. त्या अनुषंगाने अप्पर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाचे पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख यांचे मार्गदर्शनात दि. १५ डिसेंबर रोजी मध्यरात्री विशेष पथकाला मिळालेल्या माहितीवरून बार्शी येथून औसाकडे जाणा-या हायवेवर एमएच १४ एएम ६६७७ या गाडीचा पाठलाग करून औसा येथे पकडण्यात आले. गाडीची तपासणी केली असता गाडीत वृक्षतोड करण्यासाठी प्रतिबंधित व संरक्षित चंदनाची साल काढून तासलेला चंदनाचा गाभा व लाकडे मिळून आली.

या पथकाने १५२ किलो चंदन व वाहनासह १२ लाख ८ हजाराचा मुद्देमाल जप्त केले. या गाडीतील अशोक दिलीप कदम वय ३० वर्षे रा. येळंब ता. बार्शी व मारुती जेटीबा पवार वय ५० रा. इंदिरानगर औसा या दोघांना ताब्यात घेतले तर तानाजी सुरवसे रा. सावरगाव तालुका बार्शी हा पळून गेला. विशेष पथकाचे पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख यांचे फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन औसा येथे आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात विशेष पथकाचे पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अंगद कोतवाड, पोलीस अमलदार युसुफ शेख, चालक पोलीस अमलदार दीपक वैष्णव,प् ोलीस स्टेशन औसाचे पोलीस अमलदार वाडकर, सूर्यवंशी यांनी केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि. १५ डिसेंबर रोजी लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी कार्यवाही करत लाखो रुपयांचा गुटखा व हातभट्टी देशी-विदेशी दारूची अवैध विक्री करणा-यावर कारवाई केली आहे. यामध्ये पोलीस ठाणे विवेकानंद चौक हद्दीमधून एमएच ०४ जी. झेड ४६४ या क्रमांकाच्या कारमधून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ तंबाखूजन्य पदार्थाची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी वाहतूक करीत असलेला गुटखा व सुगंधित पानमसाला, वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार, असा एकूण ५ लाख ५८ हजार ४८५ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित पानमसाला, तंबाखूचा मुद्देमाल मिळून आल्याने तो मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी असलम अकबरखॉ पठाण वय ३९ वर्षे रा. साई रोड लातूर, आसिफ बशीर सय्यद वय ३३ रा. सोहेलनगर लातूर यांना ताब्यात घेतले. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे विवेकानंद चौक चे पोलीस करीत आहेत.

## किती शाळांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले याची उत्सुकता

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १६ डिसेंबर-**
विद्यार्थी सुरक्षेबाबत शाळेत तक्रार पेटी, सीसीटीव्ही कॅमेरे तसेच विद्यार्थी सुरक्षा समितीचे कामकाज शिक्षण विभागाने दिलेल्या सूचनेप्रमाणे झाले पाहिजे, याबाबत मुख्याध्यापकांनी दक्षता घेण्यासाठी गटशिक्षणाधिकाऱ्यांना गेल्या १० डिसेंबर रोजी कळविण्यात आले होते. तसेच प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही दोन दिवसांत करण्यात यावी, यासंदर्भातही जिल्हा परिवहन समिति बैठकीत सूचना करण्यात आली होती. गेल्या पाच दिवसांत किती शाळांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले, याची उत्सुकता ताणली जात आहे.

### शाळांनी हलगर्जीपणा केल्यास कारवाई करण्याची मागणी

बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शाळांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. शाळांनी विद्यार्थिनी, विद्यार्थ्यांची सुरक्षा कोणत्या दृष्टीने करायची, याची एक नियमावली शिक्षण विभागाने जाहीर केली होती. तसेच प्रत्येक शाळेने त्यावर अंमलबजावणी करावी, अशा सूचना काढल्या होत्या. लातूर जिल्ह्यातील बऱ्याच शाळांनी या सूचनांकडे साफ दुर्लक्ष केल्याचे उघड झाल्याने प्राथमिक, माध्यमिक शिक्षण विभागांनी १० डिसेंबर २०२४ रोजी पार पडलेल्या जिल्हा परिवहन समिती बैठकीत आढावा घेऊन शाळांच्या हलगर्जीपणाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली होती. जिल्ह्यातील प्रत्येक शाळेने दोन दिवसांत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही दोन दिवसांत करावी, अशी सूचना जिल्ह्यातल्या सर्व पंचायत समित्यांच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना काढल्या होत्या. या बैठकीस पाच दिवस झाले.

किती शाळांनी यावर कार्यवाही केली, हे अद्याप कळू शकलेले नाही. शाळांच्या या सूचनेकडे दुर्लक्षच दिसत असल्याची चर्चा शिक्षकांत आहे. अधिकाऱ्यांचे शाळा ऐकत नाहीत, असे एकंदरीत चित्र असल्याचे म्हटले जात असले तरी ज्या शाळा कार्यवाही करणार नाहीत, त्यांच्यावर अधिकाऱ्यांनी कारवाई करावी, अशी पालकांतून मागणी होत आहे.